मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद १९३६
जुलै-सप्टेंबर २०१४ / खंड ३८ अंक २


- [illegible] मोजमाप: ए...
- स्वराज्यातील आदर्श आर्थिक ...
- बेकारीचे साहित्यातील संदर्भ: एक चिकित्सा
- सी. रंगराजन समिती: दारिद्र्याचा अंदाज
- जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम
- केंद्रिय अर्थसंकल्प: शेती व ग्रामीण विकास
- ब्रिक्स् बँक - भारताला संधी
- जागतिक आर्थिक संकटाचा परिणाम
- जलस्वराज्य प्रकल्प व ग्रामीण विकास
- महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन वास्तवता
- अर्थसंकल्प २०१४-१५ व कृषि क्षेत्र
- मानव अधिकार आणि शेतकऱ्यांची स्थिती
- जागतिकीकरणानंतर बँकींगसमोरील आव्हाने
- भारतातील दारिद्र्याचा अभ्यास
- धुळे शहरातील नागरिकांची गुंतवणूक प्रवृत्ती
- अंदाजपत्रकीय खर्चाचा तपशिल




लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक **अर्थसंवाद**

जुलै-सप्टेंबर २०१४ / खंड ३८ अंक २

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

**अविनाश रामलाल निकम**

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१२-१५)

प्रशांत काटोले

अशोक खाचणे

राहुल म्होपरे

अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद..........................................११५
माधव दातार, मुंबई
समाजवादाच्या नव्या वाटा?..............................११७
श्रीराम जोशी, जळगाव; विनोद मोरे, डोंगरकठोरे
औष्णिक विद्युत केंद्रातील मजुरांची स्थिती.................१२४
पांडुरंग कडुकर, मुंबई
दारिद्र्याचे मोजमाप: एक संक्षिप्त आढावा.................१२९
नारायण टाक, सासवड
स्वराज्यातील आदर्श आर्थिक अर्थनिती....................१३६
तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर
बेकारीचे साहित्यातील संदर्भ: एक चिकित्सा...............१४२
पांडुरंग कल्याणकर, फुलंब्री
सी. रंगराजन समिती: दारिद्र्याचा अंदाज....................१४८
मृणालिनी तापस, नागपूर
जागतिकीकरणाचा विकसनशील अर्थव्यवस्थेवरील परिणाम१५५
संजय रुपे, संतोषकुमार यादव, कोल्हापूर
केंद्रिय अर्थसंकल्प २०१४-१५: शेती व ग्रामीण विकास...१६४
अब्दुलरऊफ शेख, अकोला
ब्रिक्स् बँक - भारताला संधी.............................१७०
शामराव वायसे, नंदुरबार
जागतिक आर्थिक संकटाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम....१७५
अनघा पाठक, प्रमिला पाटील, कोल्हापूर
जलस्वराज्य प्रकल्पातील लोकसहभाग व ग्रामीण विकास..१८१
महंमदरफीक मुलाणी, शारदानगर
महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन वास्तवता..................१८७
मारुती सूर्यवंशी, कराड
अर्थसंकल्प २०१४-१५ व कृषि क्षेत्र......................१९४
गजानन भारती, अमरावती
मानव अधिकार आणि भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती....१९८
दिनकर टकले, परतूर
जागतिकीकरणानंतर बँकींग क्षेत्रासमोरील आव्हाने.........२०४
मुरलीधर गायकवाड, मुरुड जंजिरा
भारतातील दारिद्र्याचा अभ्यास ......................... २१०
कारभारी दिवटे, हेमंत जोशी, धुळे
धुळे शहरातील नागरिकांची गुंतवणूक प्रवृत्ती..............२१६
धर्मा धुंडे, वारणानगर, अंदाजपत्रकीय खर्चाचा तपशिल....२२१

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१४-१५**

**अध्यक्ष**

श्रीराम देविदास जोशी (जळगाव)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

**सदस्य**

रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजू शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
बालाजी शिंदे (परभणी)
विद्या पाटील (धुळे)
रामेश्वर भिसे (अकोला)



**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१३-१४ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवाद....

## नियोजन आयोगाचा अखेर ?

सोविएत रशियानं १९२८ नंतर नियोजनाच्या माध्यमातून वेगानं विकास केला. दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादाच्या जोखडातून अनेक आफ्रिकन देश मुक्त झाले, आशियाई देशही मुक्त झाले. या देशांपुढे दारिद्र्याचा प्रश्न होता. मागासलेपणाचाही प्रश्न होता. साहजिकच नियोजनाच्या माध्यमातून या देशांनी आर्थिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. भारतानं देखील आर्थिक विकासासाठी नियोजनाचं तंत्र स्वीकारलं. स्वातंत्र्यपूर्व काळातही आर्थिक नियोजनाचा विचार पुढे आला होता. १९३४ मध्ये सर विश्वेश्वरैय्या यांनी प्लॅनड् इकॉनॉमी फॉर इंडिया हे पुस्तक प्रकाशित केलं. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना १९३७ मध्ये झाली. लगेचच मुंबईतल्या उद्योजकांनी औद्योगिकरण वेगानं वाढावं यासाठी बॉम्बे योजना आणली तर एम.एन.रॉय यांनी शेती क्षेत्रासाठी पिपल्स योजना आणली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० मध्ये एका सरकारी ठरावानं नियोजन आयोग स्थापन झालं. रोजगार वाढ, उत्पादन वाढ, धोरणात्मक मार्गदर्शन, लोकांचं जीवनमान उंचावणं, देशातील साधनसंपत्तीचा विकासासाठी योग्य तो वापर करणं या उद्देशानं हा आयोग स्थापन झाला. तत्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू नियोजन आयोगाचे प्रथम अध्यक्ष झाले तर गुलझारीलाल नंदा हे आयोगाचे पहिले उपाध्यक्ष ठरले. नियोजनाचा स्वीकार केल्यानं काही महत्त्वाचे फायदे अर्थव्यवस्थेला मिळतात. बाजार यंत्रणेच्या ताब्यात अर्थव्यवस्था गेली तर त्यातून आर्थिक विकासाचा वेग बऱ्यापैकी असला तरी सामाजिक न्याय दुर्लक्षित होत असतो. नियोजित अर्थव्यवस्था ही मुक्त अर्थव्यवस्थेच्या तुलनेनं साधनसामग्रीचा प्रभावी वापर करते. त्यामुळे नियोजन आयोगाचं स्थान स्थापना काळापासून खूपच महत्त्वाचं राहीलं. देशाच्या विकासासाठी अर्थव्यवस्थेचं नियोजन करणं त्यासह साधनसंपत्तीच्या परिणामकारक वापरासाठी त्याचं नियोजन करणं या जबाबदाऱ्या नियोजन आयोगाकडे देण्यात आल्या. नियोजन आयोग अथवा नियोजन मंडळानं (Planning Commission) पंचवार्षिक योजनांच्या सहाय्यानं अर्थव्यवस्थेच्या विकासाचा मार्ग निवडला. भारतीय नियोजन हे लोकशाही स्वरूपाचं आहे. १९५१ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती व वाहतुक क्षेत्राला अग्रक्रम देण्यात आला. १९५६ मध्ये प्रारंभ झालेल्या दुसऱ्या योजनेत औद्योगिकरणावर भर देण्यात आला. १९६५ ला तिसरी योजना पूर्ण झाल्यानंतर रुपयाचं अवमूल्यन, भारत-पाक युद्ध, वाढती महागाई या कारणानं १९६६ पासून लागोपाठ तीन वर्षे एक वर्षीय योजना आणल्या गेल्या. पुढे १९९१ पासून स्वीकारलेल्या जागतिकीकरणाच्या काळातही योजनांचं महत्व वाढतच राहिलं. सर्व पंचवार्षिक योजना काळातील क्षेत्रानुसार वृद्धीची तुलना केली असता आठव्या पंचवार्षिक योजना काळात (१९९२-९७) शेती क्षेत्राचा वृद्धीदर

सर्वाधिक ४.६८ % होता. तर उद्योग क्षेत्राचा सर्वाधिक वृद्धीदर १०.५०% व सेवा क्षेत्राचा सर्वाधिक वृद्धीदर ९.९०% अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२००७-२०१२) होता. आता आपण १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यावर आहोत. २०१७ पर्यंत या योजनेचा कालावधी आहे. या सर्व योजनांकडे पाहिलं तर असं लक्षात येतं की, या सर्व योजनांचे अग्रक्रम, उद्दीष्टे, आर्थिक तरतूद तसेच यश-अपयशात वेळोवेळी खूपच बदल झाले आहेत. फक्त गेल्या ६३ वर्षात बदललं नाही ते म्हणजे नियोजन आयोगाचं स्वरूप होय. मात्र या नियोजन आयोगाच्या जागी एका नवीन सल्लागार व मार्गदर्शक संस्थेची निर्मिती करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील लाल किल्ल्यावरून आपल्या जाहीर भाषणात स्वातंत्र्यदिनी केली आहे. इतकेच नव्हे तर या बाबत त्यांनी तज्ज्ञांकडून सूचनाही मागवल्या आहेत. या बाबत २४०० पेक्षा अधिक सूचना येवून त्याद्वारे अपेक्षा व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर नियोजनातील संबंधित काही तज्ज्ञांची सभा घेऊन त्याबाबत चर्चा केली. ही संभाव्य संस्था पंतप्रधानांच्या नेतृत्त्वाखाली काम करणार, हे स्पष्ट आहे. यामध्ये अर्थतज्ज्ञ, उद्योगपती, बुद्धीवंत आणि सामाजिक क्षेत्रात काम करणारे प्रतिनिधी व सरकारच्या प्रतिनिधींचा समावेश असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या बाबतची पार्श्वभूमी पाहिली तर तत्कालिन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी नियोजन आयोगास बदलत्या काळानुसार अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन आयोगातर्फे नव्या पद्धती व नवा दृष्टिकोन अंमलात आणला जात आहे काय या बाबत विचारणा केली होती. त्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळेपर्यंत केंद्रात सरकार बदललं. नियोजन आयोगाशी संलग्न मूल्यमापन कार्यालयाने दिलेल्या अहवालात नियोजन आयोग मोडीत काढून त्या ऐवजी पर्यायी संस्था निर्मितीची शिफारस केली. हा अहवाल पंतप्रधान मोदी यांना प्राप्त झाला. देशाच्या आर्थिक नियोजनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी या पर्यायी संस्थेकडे देण्याचा विचार विनिमय झाला. त्यासह देशातील साधनसंपत्तीचे वितरण, धोरणात्मक मार्गदर्शन, केंद्र राज्य आर्थिक संबंध, सरकारच्या विविध कल्याणकारी योजना हे काम या संस्थेकडे असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. या नवीन संस्थेचे अपेक्षित स्वरूप पाहिल्यास आज तरी योजना आयोगासारखेच वाटते आहे. जर स्वरूप बदलायचे नसेल तर योजना आयोग विसर्जित करून नविन नावाची संस्था आणण्यामागे नेमका हेतू कोणता असावा ? या बाबत संभ्रम व्यक्त होत आहे. सरकार बदललं म्हणजे सत्ताधारी राजकीय पक्ष विविध कल्याणकारी योजनांची आधी सरकारने दिलेली नावं बदलतात, तोच तर हा प्रकार नाही ना अशी शंका व्यक्त होत आहे. तर काही तज्ज्ञांच्या मते जुना माल मात्र नविन लेबल असल्याचा हा प्रकार आहे, असा आरोप होत आहे. तरी देखील नियोजन प्रक्रियेत या संस्थेची भूमिका देशात सर्वाधिक महत्त्वाची राहणार आहे. नविन संस्था अस्तित्वात येतांना जर तिचे स्वरूप अधिक अर्थक्षम, अधिक कार्यक्षम, अधिक व्यापक होणार असेल तर कोणाचा या संस्थेच्या निर्मितीस विरोध असल्याचे काही कारण असणार नाही.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारूदत्त गोखले यांनी सलग दहा अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं त्या बद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

अविनाश रामलाल निकम
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# समाजवादाच्या नव्या वाटा ?

**माधव दातार, मुंबई,**
एफ/५३, मेकर कुंदन गार्डन,
जुहू रस्ता, सांताक्रुझ (पश्चिम)

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या/चौथ्या दशकापासून पत्रकारितेत कार्यरत असलेले कै. पां. वा. गाडगीळ मार्क्सवादी विचारांचे होते असे म्हणणे काहीसे कठीण असले तरी कार्ल मार्क्स यांचे विचार व तत्वज्ञान मराठी वाचकांपर्यंत पोचवण्याचे महत्वाचे काम त्यांनी सातत्याने केले. आज गाडगीळ यांचे सर्व लिखाण आता सहजासहजी उपलब्ध होत नसले तरी त्यांच्या काही पुस्तकांच्या मथळ्यांवरूनही त्यांच्या अशा लिखाणाचे स्वरूप स्पष्ट होईल. सोशलिझम अथवा सुलभ समाजवाद, मार्क्सचा भौतिकवाद, फॅसीझम अथवा संघटित भांडवलशाही, समाजवादाची वाटचाल, कॅपिटल- एक सारग्रंथ या त्यांच्या पुस्तकांनी त्याकाळी सामान्य मराठी वाचकाला समाजवाद, मार्क्सवाद या विषयांचा - बहुदा प्रथम परिचय झाला असावा. सोशलिझम अर्थात सुलभ समाजवाद या १९३८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाद्वारे भांडवलशाहीत संपन्नता शक्य होत असली तरी त्याचवेळी विषमता वाढत असल्याने समानतेचा मुद्दा पुढे आणणारी समाजवादी विचारसरणी कशी महत्वाची बनते ते सुलभ मराठीत त्यांनी वाचकांना समजावून सांगितले. मार्क्सचा भौतिकवाद या पुस्तकात गद्यात्मक भौतिकवादाचा सुलभ परिचय करून देतांना वेदांत तत्वज्ञान व लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य यांचा तुलनेसाठी उपयोग केला आहे. फॅसीझमबद्दल लिहितांना व्यक्तिनिष्ठ, अनिर्बंध भांडवलशाहीची एक प्रतिक्रिया समाजवाद (ज्यात खासगी मालमत्तेचा हक्क नाहीसा होतो) तर दुसरी प्रतिक्रिया फॅसीझम (ज्यात लोकशाहीचा लोप होतो) असे त्यांचे विवेचन नावीन्यपूर्ण होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात कोणत्या पद्धतीचे परिवर्तन हवे / व्हावे याची चर्चा भारतीय स्वातंत्र्यलढा सुरू असतांनाही सुरू होती. पहिल्या महायुद्धानंतर रशियात समाजवादी क्रांती झाल्यामुळे तोवर अस्तित्वात असलेल्या - उत्पादन साधनांची खासगी मालकी व बाजारपेठा यावर आधारित - भांडवली व्यवस्थेस एक नवा व चांगल पर्याय या स्वरूपात समाजवाद वा साम्यवाद यांचा नव्याने विचार सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धात

प्रथम साम्यवादी रशिया ब्रिटनच्या विरोधी भूमिकेत दिसला तरी नंतर फॅसीस्ट जर्मनीविरूद्ध साम्यवादी व भांडवली देश एकत्र लढत असल्याचे चित्र दिसले. या पार्श्वभूमीवर समाजवाद, भांडवलशाही, फॅसीवाद यांची चर्चा जगात सर्वत्र झाली तशी ती भारतातही झाली. मराठीत झालेल्या या चर्चेत कै. गाडगीळ यांचा महत्वाचा वाटा होता.

भारताबरोबरच अनेक आफ्रिकन व आशियाई देश स्वतंत्र झाल्याने या देशातील आर्थिक / राजकीय परिवर्तनाच्या संदर्भात समाजवादी व्यवस्था व भांडवलशाही यांचे गुण दोष व अविकसित देशांनी कोणता मार्ग स्वीकारावा किंवा स्विकारणे योग्य ठरेल हा त्या काळी महत्वाचा विषय होता. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताने लोकशाही व नियोजन यांचा उपयोग करत स्विकारलेला मिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग जगभर कुतूहलाचा विषय होता. स्वातंत्र्योत्तर भारतात सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या कामगिरीचे मूल्यमापन करतांना संथ विकास ही लोकशाही स्वातंत्र्याची अटळ किंमत असते असा मुद्दा नेहमी मांडला जाई. कै. गाडगीळ यांनी ही अशी मांडणी केलेली आढळते.

जागतिक पातळीवर भांडवलशाही का समाजवाद ही चर्चा सतत चालू असे. पण १९६० नंतर सोविएत युनियन मधील परिस्थितीबाबत व्यापक असमाधान व्यक्त होऊ लागले. सोविएत युनियन मधील व्यवस्था समाजवादी आहे का हा प्रश्न दबत्या आवाजात का असेना पण डाव्या वर्तुळातही विचारला जाऊ लागला. नंतर १९८९-९० या काळात प्रथम पूर्व युरोपीय व नंतर सोविएत युनियन मधील साम्यवादी राजवटी कोसळल्यानंतर या चर्चेचे स्वरूप एकदम पालटले. एकतर भांडवलशाहीच्या समर्थकांनी हा भांडवलशाहीचा कायमस्वरूपी विजय मानून ÷इतिहासाचा अंत' झाला आहे असे घोषित केले. समाजवादी विचारसरणीच्या - विशेषतः साम्यवादी पक्षाची बांधिलकी मानणाऱ्या निरीक्षकांनी प्रथम या घटनेबद्दल मौन पाळले व नंतर हा समाजवादाचा पराभव आहे, पण भांडवलशाहीचा विजय नाही अशी भूमिका घेतली. सोविएत युनियनचा पाडाव झाल्यानंतर शीतयुद्ध संपले व अमेरिकेचा एकछत्री अंमल सुरू झाल्याने भांडवलशाहीचा विजय अधिकच गडद बनला. २००७-०८ नंतर अमेरिकेच्या ÷प्रगत' वित्तीय संस्थात उगम पावलेल्या पेचप्रसंगाने भांडवलशाहीचे दुबळेपण कायम झाल्याचे स्पष्ट झाले व सरकारी हस्तक्षेप आवश्यक बनला.

या घटनेनंतर समाजवाद का भांडवलशाही ही चर्चा परत नव्याने सुरू झाली व आता भांडवलशाही व्यवस्था संकटात असल्याने ही चर्चा अधिक समतोल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच पूर्व युरोप व सोविएत युनियनमध्ये बाजारव्यवस्थेचे पुनरागमन झाले असले आणि चीनमधील कम्युनिस्ट पक्षाचे अधिपत्य कायम राहिले असले तरी निर्यातीला प्रोत्साहन देत परकीय भांडवलाचा व तंत्रज्ञानाचा उपयोग करत चीनने वेगवान आर्थिक प्रगती साधली असल्याने समाजवाद कशाला म्हणायचे याचा व भांडवली व्यवस्थेतील स्थित्यंतराचा - प्रक्रियेतील अनेकविध संभाव्यता स्पष्ट झाल्याने - नव्याने विचार करण्याची गरज जाणवते. केवळ चीनच नव्हे तर इतर अनेक आशियाई देशांनी (द.कोरिया, सिंगापूर, तैवान,

थायलंड, इंडोनेशिया) प्रगतीचा जो मार्ग पत्करला त्यात बाजारपेठांचे महत्वपूर्ण स्थान होते. या पार्श्वभूमीवर समाजवाद या कल्पनेचे नेमके स्वरूप काय व भांडवलशाहीतील पेचप्रसंगाचे स्वरूप, जलद आर्थिक विकासात खाजगी मालकी व बाजारपेठांचा सहभाग या मुद्द्यांचा विचार या गाडगीळ यांच्या अभ्यास विषयांच्या संदर्भात निश्चित समर्पक ठरेल असे वाटते. समाजवादाच्या नव्या वाटा हा शब्दप्रयोग समाजवाद हे एक ध्येय किंवा गंतव्य स्थान व जलद आर्थिक विकासाचा भांडवलशाहीमार्गास एक संभाव्य पर्याय असा दोन्ही संदर्भात विचारात घेता येईल, असा विचार करतांना वास्तवातील समाजवादी देशातील प्रत्यक्ष अनुभव हा घटक विशेष महत्वाचा ठरतो. या अनुभवानूसार एकतर समाजवाद एका निराळ्या स्वरूपात विचारात घेणे गरजेचे बनले असू शकेल असा नव्या वाटेचा एक अर्थ असू शकतो किंवा ध्येयरूपात समाजवाद कायम राहिला असला तरी ती व्यवस्था अस्तित्वात आणण्याचा निराळा मार्ग समोर येणे किंवा नवीन मार्ग आवश्यक वाटणे या अर्थाने देखील नवी वाट असा शब्द प्रयोग होऊ शकेल. ध्येय तेच पण त्यापर्यंत जाण्याचा निराळा पर्यायी मार्ग किंवा ध्येयच बदल्याने अटळपणे बदललेली वाट हे दोन्ही अर्थ या संदर्भात महत्वाचे ठरतात.

**समाजवाद, स्वप्नील व शास्त्रीय:**

वर्तमानातील दैन्य, दारिद्रय, उपासमार, बेकारी, अज्ञान यासारख्या सर्व गंभीर समस्या सुटल्या असतील अशी एक आदर्श समाजव्यवस्था म्हणून समाजवाद ही कल्पना निदान गेली दोनशे वर्षे आपल्या समोर आहे. भांडवली विकासाची सुरूवात झाल्याबरोबर पारंपरिक जीवनपद्धतीला धक्के बसण्यास सुरूवात होऊन औद्योगिकीकरण, नागरीकरण, विषमता या समस्या ठळक स्वरूपात पुढे आल्या. या समस्या जिथे नसतील त्या आदर्श व तो पर्यंत स्वप्नवत राहिलेल्या व्यवस्थेस समाजवाद असे संबोधले गेले. सेंट सायमन या फ्रेंच तत्ववेत्यास काम करणारे (कामगार, शेतकरी, कारागीर व व्यावसायिक) व ऐतखाऊ (जमीनदार, सावकार इ.) यातील संघर्ष महत्वाचा वाटला व यातून सामाजिक स्थित्यंतरास चालना मिळेल असे त्यांचे प्रतिपादन असे. चार्लस फूरियर यांनी फ्रेंच राज्यक्रांती पासूनच्या अपेक्षांची पूर्तता न होता संपन्नतेत दारिद्रय निर्माण होण्याबाबत संताप व्यक्त केलेला आढळतो. रॉबर्ट ओवेन यांनी इ.स. १८०० न्यू लानार्क येथे एक कापडाचा कारखाना सुरू केला ज्यात ५०० कामगार होते व तो १८२९ पर्यंत यशस्वीपणे चालला. या कारखान्यातील कामगार व त्यांचे कुटुंबीय अशा २५०० लोकांची वसाहत एक आदर्श व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न होता. प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत कामाचे तास कमी (दहा) ठेवूनही हा कारखाना नफ्यात चालला. एकदा ४ महिने कारखाना बंद ठेवावा लागला तरी कामगारांना मजुरी देणे थांबविले नव्हते. या वसाहतीत कामगारांच्या मुलांसाठी शाळा चालविली जाई जेथून घरी जाण्यास मुले नाखूष असत. फ्रेडरिक एंगल्स यांनी या सर्व पूर्वसूरींचा उल्लेख स्वप्नाळू समाजवादी असा केला व समाजवादाची पर्यायी व त्यांच्या मते शास्त्रीय कल्पना मांडली. स्वप्नाळू समाजवादी मुख्यत्वे आदर्श व्यवस्थेचे चित्र रंगवत तिचे गुणगान करत असतील तर शास्त्रीय समाजवाद मात्र भांडवली व्यवस्थेत अटळपणे निर्माण होणाऱ्या वर्ग संघर्षातून

सतत पेचप्रसंग निर्माण होत राहतील व त्यातून कामगार वर्ग संघटित ताकदीच्या जोरावर कम्युनिस्ट पक्षाच्या मार्गदर्शनाखाली सत्ता हस्तगत करेल व समाजवादाची मुहूर्तमेढ रोवली जाईल असे प्रतिपादन करत असे मार्क्स व एंगल्स यांचे विवेचन भांडवलशाहीतील पेचप्रसंग त्याची अनिवार्यता व त्यातून नवीन व्यवस्थेचा जन्म या बाबत आहे. नविन व्यवस्था कशी असेल, तिची कार्यपद्धती कशी असेल या बाबत फारसे विश्लेषण केलेले आढळत नाही.

स्वप्नाळू समाजवादी एक ध्येय म्हणून समाजवाद कसा योग्य किंवा आदर्श व अस्तित्वात असलेल्या भांडवली व्यवस्थेला चांगला पर्याय आहे यांचे वर्णन करतात तर शास्त्रीय समाजवादाचे मुख्य विश्लेषण समाजवादाकडे संक्रमणाचा मार्ग कोणता असेल व त्याची अटळता यावर केंद्रीत झालेले आढळते. आदर्श व्यवस्थेचा विचार करतांना उत्पन्न वाटपात समानता असणे, निवारा, शिक्षण, आरोग्य सेवा सर्व नागरिकांना उपलब्ध होणे, सर्वांना रोजगार उपलब्ध असणे व त्यात सातत्य असणे अशा काही घटकांचा समावेश करता येतो. भांडवलशाहीत बहुसंख्य जनतेस पशुवत जीवन जगावे लागते. समाजवादी व्यवस्थेत सर्व सामान्य जनतेच्या सर्व समस्या जरी सुटल्या नाहीत तरी कष्टकरी जनतेस फक्त मानवीय समस्यांचा सामना करावा लागेल.

क्रांतीच्या अटळतेचे विश्लेषण करतांना वर्ग विग्रह, वाढते शोषण व घटता नफा या घटकांना महत्व प्राप्त होते. १९१७ साली प्रथम समाजवादी क्रांती झाली त्यानंतरच्या घडामोडींवरून भांडवली व्यवस्थेतील पेचप्रसंगाचे स्वरूप, त्याची कारणे व या संकटातून बाहेर येण्याचा क्रांती हा एकमेव मार्ग असणे, क्रांतीचे राष्ट्रीय स्वरूप आणि एका देशातील समाजवादी व्यवस्थेचे जागतिक बाजारव्यवस्थेशी असणारे नाते या बाबत विविध शक्यता अनुभवास आल्याने याबाबत भिन्न मते अस्तित्वात आहेत.

### पर्यावरण संवर्धन व संतुलन:

वैयक्तिक किंवा खाजगी मालकी हक्क व तांत्रिक प्रगतीमुळे मोठे, सामूहिक स्वरूप धारण करणारी आधुनिक उत्पादन पद्धत यातील विरोधाभास नष्ट होण्यासाठी खाजगी मालकी संपवून सामुहिक मालकी प्रत्यक्षात आणण्याचा मार्ग आवश्यक आहे असे साम्यवादी विचारसरणीत प्रतिपादन करण्यात येते. पण पर्यावरण संवर्धन व संतुलनाच्या संदर्भात साधनांच्या सामुहिक उपयोगाचे महत्व अधिक स्पष्ट होते. विविध नैसर्गिक साधनांचा उपयोग सामुहिक पद्धतीने केला तर पर्यावरण संवर्धनास मदत होते. जागतिक लोकसंख्या वाढ व आर्थिक विकासाचा वाढलेला वेग यामुळे नैसर्गिक साधनांचा उपयोग आता प्रचंड वाढलेल्या वेगाने होत असतांना सामुहिक प्रयत्नांची गरज वाढली असली तरी तसे प्रयत्न होण्यातील अडचणी कायम आहेत. अशा सामुहिक प्रयत्नांची चर्चा होतांना आधुनिक तंत्राचा वापर करून अनेक विकसित देशांना आजवर नैसर्गिक साधनांची नासधूस केली असल्याने आता जो निर्बंध आणायचे त्यांचा भार विकसित व अल्प विकसित देशांत कसा वाटला जावा या मुदयावर सहमती होणे कठीण ठरले असा अनुभव आहे.

पण एक उद्दिष्ट म्हणून काहींना समाजवाद कितीही आवश्यक अपरिहार्य वा

आकर्षक वाटला तरी समाजवादाकडे संक्रमण कशा पद्धतीने होईल हा प्रश्न महत्वपूर्ण बनतोच, शिवाय समाजवादी म्हणवणाऱ्या देशात १९९० पासून बाजारपेठांचा प्रभाव वाढला असल्याने केंद्रीय नियोजन कितपत प्रभावी ठरेल हा प्रश्न नव्याने विचारला जात आहे. ज्या देशांनी एकेकाळी समाजवादी व्यवस्था राबवली त्यात आता भांडवली व्यवस्थेचे अधिकृत किंवा अनधिकृत पद्धतीने पुनर्वसन होत असतांना भांडवली पेचप्रसंगातून अटळ निश्चिततेने समाजवाद स्थापन होत नाही असा अनुभव आहे.

**भांडवली व्यवस्थेतील स्थित्यंतरे:**

तिच्या सुरूवातीच्या अवस्थेत भांडवली व्यवस्थेचे स्वरूप प्रागतिक असले तरी कालांतराने कामगार व भांडवलदार यांच्यातील वर्ग संघर्ष तीव्र स्वरूप धारण करतो व पेचप्रसंगाची स्थिती निर्माण होते. या स्थितीत क्रांती हाच मार्ग शिल्लक राहतो असे मार्क्स व एंगल्स यांचे प्रतिपादन होते. पण आजवर जिथे समाजवादी राजवटी निर्माण झाल्या तेथे प्रगत भांडवलशाही नव्हती. हे रशिया व चीन बाबत खरे आहे. पूर्व युरोपीय देशांत मुख्यतः सोविएत प्रभावामुळे नियोजित अर्थव्यवस्था स्विकारली.

भांडवली व्यवस्थेचे समाजवादी व्यवस्थेत स्थित्यंतर होतांना औद्योगिक कामगारांची संख्या वाढू लागते व त्यामुळे हा नवीन वर्ग क्रांतीदूताची महत्वाची भूमिका बजावेल असे मार्क्स यांचे विवेचन होते. सोविएत युनियनमध्ये प्रथम क्रांती झाली पण तिथे औद्योगिकरणाचा वेग क्रांती झाल्यानंतरच्या काळात वाढला. तर चीनमध्ये क्रांती झाली त्यात शेतकरी वर्गाने क्रांतीदूताची भूमिका बजावली असल्याचे आढळते. शिवाय विकासाच्या प्रक्रियेत प्रथम शेती क्षेत्राचे महत्व कमी होत जाते व उद्योगक्षेत्राचे महत्व वाढते असा अनुभव असला तरी त्यानंतरच्या काळात सेवा क्षेत्राचे महत्व वाढते हा अनुभव देखील सार्वत्रिक आहे शिवाय जागतिकीकरणाच्या प्रभावशाली नवीन पद्धतीने उत्पादन संघटन होऊ लागल्यावर एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उत्पादन न होता ते विविध ठिकाणी विखुरले जाते त्यामुळे मोठ्या प्रमाणात एकत्र आलेल्या कामगारांचे संघटन व महत्व वाढत नाही.

प्रगत भांडवली व्यवस्था असलेल्या अमेरिका, ब्रिटन, जपान किंवा फ्रान्स देशात समाजवाद आला नाही. पण तेथे केन्सीय विचारसणीच्या प्रभावाने असेल पण सरकारने अर्थव्यवहारात अधिक जबाबदारीची कृतीशील भूमिका घेत कामगार व इतर दुर्बल घटकांच्या हिताचे कायदे व प्रकल्प हाती घेतले व १९३० च्या जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवहारात कायम तेजी राहील असे उपाय योजले. याचा परिणाम दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पंचवीस वर्षात जागतिक भांडवली व्यवस्थेत कोणताही पेचप्रसंग निर्माण न होता राष्ट्रीय उत्पन्न वेगाने वाढले. उलट पक्षी, १९६० च्या दशकापासून सोविएत अर्थव्यवस्थेतील समस्या क्रमाने गंभीर बनत गेल्या. या व इतर विविध कारणांनी सोविएत युनियन व पूर्व युरोपीय देशांनी आपला साम्यवादी/ समाजवादी मार्ग बदलून खासगी व बाजारपेठांचे पुनरूज्जीवन करत विकासाचा भांडवली मार्ग पत्करला. तर चीनमध्ये राजकीय परिवर्तन झाले नसले तरी १९७८ पासूनच विविध धोरणात्मक बदल क्रमाने अंमलात आणून स्पर्धात्मक बाजार, परदेशी तंत्रज्ञान व भांडवल यांचा वापर करत या

देशाने विकासाचा नवा मार्ग चोखाळला. या संदर्भात उत्पादन साधनांची मालकी व उपयोग समाजवादी व्यवस्थेतील प्रोत्साहने (Incentives) या बाबत चर्चा झाली व अजूनही होते.

**साम्यवादी व्यवस्थेतील समस्या:**

समाजवादी व्यवस्थेत शोषण होत नसले तरी उत्पादन वाढ होण्यासाठी वाढावा (Surplus) निर्माण होणे गरजेचे असते. या दोन व्यवस्थातील फरक वाढाव्याचा उपयोग कसा होतो यात असतो किंवा असावा. साम्यवादी व्यवस्थेत वाढाव्याचा उपयोग समाजाच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून केला जाईल. जे भांडवली व्यवस्थेत शक्य होत नाही. पण वास्तवातील समाजवादी व्यवस्थांसमोर कार्यक्षमता कशी राखायची हा प्रश्न निर्माण होत (झाला) होता. विविध वस्तु किंवा उत्पादन घटकांच्या बाजारपेठा अस्तित्वात नसतांना सोविएत व्यवस्थेत विविध वस्तुंचे उत्पादन / वितरण कसे होईल हा प्रश्न १९३० च्या काळात प्रामुख्याने अर्थशास्त्रज्ञात चर्चिला गेला होता व पुरेशी माहिती गोळा करता आली तर समाजवादी व्यवस्थेत नियोजन मंडळास बाजार किंमती कोणत्या असाव्यात हे ठरवता येईल यावर त्यांचे एकमत झाले. पण विकासाच्या पुढील टप्प्यावर जीवनावश्यक वस्तुंचे महत्व कमी होऊन चैनीच्या वस्तुंचे महत्व वाढले तसे ग्राहकांच्या आवडी निवडी व त्यातील सतत होणारे बदल आणि उत्पादनाचे नियोजन यांचा मेळ घालणे उत्तरोत्तर कठीण होत गेले. कार्यक्षमता कायम राखत कामगार, व्यवस्थापक यांना कसे कार्यप्रवृत्त करता येईल हा नियोजित व्यवस्थांसमोरचा कायम गहन प्रश्न असतो. उत्पादन साधनांची खाजगी मालकी समाप्त झाली म्हणजे त्यांच्या आपोआपचे सामाजिक हितासाठी उपयोग होईल असे प्रथमतः वाटले असेल तरी ते प्रत्यक्षात उतरवणे खूप कठीण असते असा व्यापक अनुभव आहे. साम्यवादी/ समाजवादी देशात नवा शोषक वर्ग निर्माण झाला असा आरोप करण्यात आला. एवढेच नव्हे तर सोविएत युनियनमधील व्यवस्थेला समाजवादी म्हणता येईल का व या व्यवस्थेतून असा प्रश्न विचारला गेला. मात्र समाजवादी समजल्या जाणाऱ्या व्यवस्थेत बाजारपेठीय व्यवस्थेचे पुनरागमन झाले यावरून बाजारपेठीय व्यवस्थेचा विजय झाला, सामुहिक मालकी, केंद्रीय नियोजन व कामगार वर्गाची एकाधिकारशाही यावर आधारित समाजवादी व्यवस्था हा भांडवलशाहीचा पर्याय होऊ शकत नाही असे काहींनी मानले तरी अमेरिकेतील उगम पावलेल्या २००८-०९ च्या जागतिक वित्तीय पेचप्रसंगाने प्रगत भांडवली व्यवस्था सदैव स्वनियंत्रित राहू शकत नाहीत. तिला शासकीय पाठिंबा व नियंत्रणे यांची गरज भासते हे पुनः एकवार सिद्ध झाले. अमेरिकेतही वाढती असमानता, विशेषतः अकुशल वा निम कुशल कामगारांच्या वेतने / उत्पन्न यांत निर्माण झालेली अवरूद्धावस्था याबाबत व्यापक असमाधान, रोष आहे. Occupty The Wall Street सारख्या चळवळी प्रगत भांडवली व्यवस्थेत बाजारव्यवस्थेला पुरक सामुहिक धोरण, कृती यांची गरज दर्शवते.

**समाजवदाच्या भिन्न वाटा:**

ज्या व्यवस्थेत सर्व व्यक्तींना विकासाच्या संधी समान (किंवा समानशील) पद्धतीने उपलब्ध असतील, जिथे शिक्षण, आरोग्य या मुलभूत सोयी सर्व नागरिकांना सहज प्राप्य

असतील, जाती, धर्म, प्रदेश किंवा लिंग भेद यामुळे कोणाच्याही विकासाचा मार्ग अडणार नाही अशी व्यवस्था प्रत्यक्षात आणणे हे आपले सामाजिक ध्येय मानता येईल का ? हे साध्य करतांना उत्पादन घटकांची मालकी हा घटक महत्वाचा ठरत नसेल तरीही तो घटक ध्येयरूप समजणे कितपत योग्य ठरेल. या व्यवस्थेला समाजवाद म्हणता येते का याबाबत मतभेद झाले तरी समाजवादी व्यवस्था जे साध्य करू पहाते ते वरील उद्दिष्टांपेक्षा फारसे भिन्न नसेल तर समाजास या उद्दिष्टांपर्यंत कसे पोचवायचे हा मुख्य प्रश्न बनतो. त्याला समाजवाद म्हणायचे का नाही हा महत्वाचा वाटला तरी निराळा मुद्दा आहे. पण विकासाची समानसंधी (आजच्या परिभाषेत Inclusive Development समानशील विकास) पुरवणारी ही व्यवस्था प्रत्यक्षात आणतांना बाजार व्यवस्था व सरकारी हस्तक्षेप किंवा नियोजन यांचा एकत्र वापर करण्याच्या भिन्न पद्धती संभवतात. जपान, कोरिया किंवा चीन या सर्व देशांनी जलद विकासाचा विशिष्ट मार्ग स्विकारला. बाजारपेठ व सरकारी हस्तक्षेप यांचा परस्परपूरक पद्धतीने वापर करण्यात त्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या प्रगतीचे महत्वाचे कारण मानता येते. या बाबत अजून फारसे यश मिळाले नाही अशा देशांना विकासाच्या या विविध वाटा मार्गदर्शक ठरतील. या अनुभवाचा उपयोग आपल्या देशात समानशील विकास साध्य करतांना होतो का नाही हे ठरवते महत्वाचे आहे. देशोदेशींच्या या भिन्न प्रयत्नांना समाजवादाच्या वाटा म्हणायचे का नाही मुद्दा दुय्यम महत्वाचा ठरतो, तसा तो ठरावा. निदान पां. गाडगीळ यांनी निश्चित तसेच मानले असते. मराठी अर्थशास्त्र परिषद आणि परभणी जिल्ह्यातील मानवत येथील के.के.एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३० एप्रिल २०१४ रोजी पत्रपंडित पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यान संपन्न झाले. प्रमुख वक्ते मा.माधव दातार (मुंबई) यांनी समाजवादाच्या नव्या वाटा या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.


संदर्भसूची :

१) पां.वा. गाडगीळ, *सोशलिझम अर्थात सुलभ समाजवाद*, वादविवेचन माला पुणे, १९६८
२) पां.वा. गाडगीळ, *फॅसीझम अथवा संघटित भांडवलशाही वाद*, विवेचनमाला पुणे, १९३९.
३) पां.वा. गाडगीळ, *मार्क्सचा भौतिकवाद वाद*, विवेचन माला पुणे, १९४०
४) पां.वा. गाडगीळ, *समाजवादाकडे*, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई १९४७
५) पां.वा. गाडगीळ, *समाजवादाची वाटचाल*, व्हिनस प्रकाशन पुणे, १९६१
६) दातार माधव, *समाजवाद, बाजारपेठा आणि शासनसंस्था*, हा बाळ प्रकाश (संपा) समाजवादास आव्हान एकविसाव्या शतकाचे, एस.एम.जोशी शताब्दी समिती, २००५ या पुस्तकातील लेख.
७) Engels Fredrick, *Socialism : Utopian and Scientific*, Progress Publishers, 1970
८) Li Mingi, *Is there an alternative (to Socialism) ?* Science and Sdociety, January, 2013
९) Stiglitz Joseph E, *Whither Socialism*? MIT, 1994.

# औष्णिक विद्युत केंद्रातील राखेवर काम करणाऱ्या मजुरांची आर्थिक स्थिती

**श्रीराम दे. जोशी**, जळगाव,
(अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद)
अर्थशास्त्र विभागप्रमुख, मू.जे. महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६.

**विनोद झामा मोरे**, डोंगर कठोरे,
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन,
महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ८००७४१०८२७

अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग व व्यापार या प्रमुख क्षेत्रांच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक ठरतो. यासाठी नियोजनकारांनी पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणला देशाच्या ग्रामीण व शहरी भागातील विविध उद्योगधंद्यांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा महत्वपूर्ण ठरतात. आर्थिक विकासासाठी निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधांमध्ये ऊर्जा निर्मितीच्या साधनांचा विकास, वाहतूक व दळणवळण सुविधाचा विकास विज्ञान व तंत्रज्ञान, आरोग्य व शिक्षण, बँका इत्यादींचा समावेश होतो.

आर्थिक प्रगती आणि ऊर्जा वापर यांची नेहमी सांगड घातली जाते आर्थिक विकासाच्या दृष्टीने ऊर्जा ही एक अत्यंत महत्वपूर्ण पायाभूत शक्ती आहे. जगातील विकसित देशांच्या विकासात ऊर्जा स्त्रोताचे योगदान खूप मोठे आहे. या उलट ज्या देशांकडे ऊर्जा स्त्रोतांचा अभाव आहे त्या देशांचा आर्थिक विकासाचा वेग मंद आहे. देशाचा जलद गतीने विकास होण्यासाठी ऊर्जेच्या स्त्रोतांचा पर्याप्त वापर होणे आवश्यक असते. विद्युत शक्ती देशाच्या आर्थिक विकासाचा आधार असून ती व्यापारी तसेच व्यापारेतर उपयोगांसाठी अत्यावश्यक आहे. विद्युत शक्तीचा उपयोग उद्योग, कृषी आणि वाहतूक या क्षेत्रामध्ये व्यापारी दृष्टीने होतो. तर व्यापारेतर उपयोगामध्ये घरगुती दिवाबत्ती, स्वयंपाक पाणी, रेफ्रि जरेटर, वातानुकूलित उपकरणे यासारखी यांत्रिक साधने यांचा अंतर्भाव होतो. लोकसंख्येची

वाढ आणि रोजच्या जीवनात आधुनिक साधनांचा वाढता उपयोग यामुळे दिवसेंदिवस घरगुती उपयोगासाठी वीजेची मागणी वाढत आहे. वीजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी भारतात औष्णिक विद्युत प्रकल्प, नैसर्गिक वायुजन्य प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प, अणु ऊर्जा प्रकल्प व अक्षय ऊर्जा या स्त्रोताच्या माध्यमातून वीज निर्मिती केली जाते. भारतात व महाराष्ट्रात विविध स्त्रोताद्वारे वीज निर्मिती क्षमतेत वाढ होत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात औष्णिक विद्युत प्रकल्पातून वीज निर्मिती होत आहे. औष्णिक विद्युत निर्मिती करीता पाणी, कोळसा व इंधन हे घटक महत्त्वाचे आहेत.

दीपनगर येथे औष्णिक विद्युत केंद्राची स्थापना करण्यामागे हेतू असा की, वीज निर्मिती करीता पाणी हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. दीपनगर वीज केंद्रातील पाण्याची गरज तापी नदीवरील हतनूर धरणातून भागविली जाते. वीज निर्मितीत महत्वाचा घटक म्हणजे कोळसा. हा कोळसा वेस्टर्न कोल फि ल्ड वणी, उमरेड, कुसमंडा खाणीतून घेतला जातो. भुसावळ हे मध्य रेल्वेचे प्रमुख जंक्शन स्टेशन आहे. मध्य रेल्वेची रेल्वे लाईन दीपनगरला लागून गेल्यामुळे वीज निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कोळशाची वाहतूक करणे सुलभ आहे.

दीपनगर औष्णिक विद्युत केंद्राच्या स्थापनेमुळे राज्याच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली आहे. दीपनगर हे राज्याच्या नकाशावर एक मोठे ऊर्जा निर्मिती केंद्र गणले जाते. तसेच जळगांव जिल्ह्याच्या शेती व कारखानदारी विकासात फार मोठा हातभार लागलेला आहे. या केंद्रामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची नवीन संधी ही मिळाली आहे. त्यामुळे परिसरातील भागाची सुधारणा होऊन व्यापारास नवीन चालना मिळाली आहे. या केंद्रामुळे आजूबाजूच्या परिसरातील आर्थिक व सामाजिक स्थितीवर निश्चित फार मोठा परिणाम झालेला आहे. भारतात असलेल्या विद्युत केंद्रापैकी ७०% विद्युत केंद्र हे कोळशावर चालणारे असल्यामुळे हे सर्वात जास्त कोळसा वापरणारे क्षेत्र आहे. भारतातल्या ८२ औष्णिक विद्युत केंद्रातून जवळ जवळ ७०% एवढी वीज निर्मिती केली जाते. या प्रकल्पातून २०१२ मध्ये जवळपास १७५ टन राख निर्माण होईल. अशा प्रकारे कोळशाच्या वाढत्या वापराचा परिणाम म्हणजे सतत वाढत जाणारी व त्यापासून तयार होणारी राख (फ्लाय ॲश) ही होय. कोळसापासून वीज निर्मिती करत असतांना या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर राख तयार होते. ती राख हटवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो.

दीपनगर वीज निर्मिती प्रकल्पामुळे निर्माण होणारे राख मिश्रीत पाणी या केंद्रापासून १४ किलो मिटर अंतरावर राखेचा बंड (ॲश पॉण्ड) मध्ये पाईप लाइनच्या माध्यमातून सोडली जाते. या राखेचा वापर विटा बनविणे व सिमेंट मध्ये सुध्दा केला जातो. ज्या बंडात ही राख सोडली जाते त्या ठिकाणाहून सदरची राख औष्णिक विद्युत केंद्रातर्फे वीटभट्टी व्यावसायिक व राख विक्रेते यांना मोफत दिली जाते. या राखेची अनेक ठिकाणी वाहतूक केली जाते. या राखेवर काम करणाऱ्या मजुरांची आर्थिक व सामाजिक स्थितीत कसे बदल झाले याचे अध्ययन प्रस्तूत शोध निबंधात केले आहे.

**अध्ययनाची उद्दीष्टे :**

१) औष्णिक विद्युत केंद्रातून निर्माण होणाऱ्या राखे वरील काम करणाऱ्या मजुरांची आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) औष्णिक विद्युत केंद्रातून निर्माण होणाऱ्या राखेवरील रोजगार निर्मितीचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक आकडेवारी वर आधारलेले आहे. प्राथमिक तथ्य मुलाखत अनुसूचीच्या साह्याने नमुना म्हणून निवडलेल्या उत्तर दात्याकडून संकलित केले आहे. औष्णिक विद्युत केंद्रातून बाहेर पडलेली राख ज्या ठिकाणी साठविली जाते तेथील बंडात काम करणारे मजूर व राख वाहतूकी वरील मजूर यांची आर्थिक व सामाजिक परिणाम पाहण्यासाठी नमुना निवडलेला आहे.

वेल्हाळा बंडात राख साठवलेल्या ठिकाणी राख भरण्याचे व वाहतूक करण्याचे काम करणाऱ्या ६०० मजुरांपैकी १०% म्हणजे ६० मजुरांची नमुना म्हणून निवड केली आहे. ज्या ठिकाणी राख साठवतात त्यास स्थानिक भाषेत ठिय्या असे संबोधण्यात येते राख वाहतूक ज्या ट्रॅक्टरद्वारे केली जाते त्या ट्रॅक्टरवर साधारणतः पाच मजूर असतात व एक ट्रॅक्टर चालक असतो. ही राख उचलण्याचे काम दिवस व रात्री अशा दोन पाळी मध्ये केले जाते. म्हणजेच एका ट्रॅक्टरवर १२ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला दिसतो. तसेच ज्या ठिकाणी साठा केला जातो. त्या ठिकाणाहून विटभट्टी व्यावसायिक त्याच्या गावी असलेल्या विटभट्टीवरती तसेच राख विक्रेते व्यावसायिक ही राख बाहेरील जिल्ह्यातील विटभट्टी व्यावसायिकांना विकतात. तो वाहून नेण्यासाठी ट्रकचा वापर केला जातो. हे ट्रक भरण्यासाठी वेगळे मजूर ठेवण्यात आलेले असतात. प्रत्येक ठिय्या वरती सहा मजुराचा एक समूह ट्रक भरतांना दिसतो. या परिसरात ट्रक भरण्याचे काम करणाऱ्या मजुरांमध्ये पावरा आदिवासी समाजाचे मजूर जास्त प्रमाणात दिसून आलेत. हे मजुर ठिय्या जवळच छोट्या छोट्या झोपड्या करुन त्या ठिकाणी वास्तव्य करतांना दिसतात. या ट्रक भरणाऱ्या मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.

प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी बंडामध्ये ५० ट्रॅक्टर आढळून आले. एका ट्रॅक्टरवर दोन पाळी मध्ये १२ प्रमाणे ६०० मजुरांना या ठिकाणी राख उचलण्याच्या कामाचा रोजगार दीपनगर वीज निर्मिती केंद्रातून फेकल्या गेलेल्या राखे पासून मिळालेला आहे. या व्यतिरिक्त ट्रकमध्ये राख भरणारे २०० मजूर आहेत.

तसेच सिमेंट कंपनीसाठी सुध्दा राखेची वाहतूक केली जाते. औष्णिक विद्युत केंद्रातील राख ब्लंकर मार्फत टँकर मध्ये भरुन सिमेंट कारखान्यात केली जाते व सिमेंट तयार करतांना या राखेचा त्यामध्ये २० मे ३० टक्के वापर केला जातो. केंद्रापासुन ते नाशिक, नशिराबाद येथील सिमेंट कारखान्यापर्यंत टँकरच्या साहाय्याने राखेची वाहतूक केली जाते. या वाहतुकीसाठी २२ टँकरचा वापर केला जातो. एका टँकरवर एक चालक व सहाय्यक (क्लिनर) असतो. व हे काम सुध्दा दोन पाळी मध्ये केले जाते असून एका टँकरवर दोन पाळीत ४ व्यक्ती प्रमाणे ८८ व्यक्तींना या राख वाहतुकीतून रोजगार मिळतो.

राख वाहतूक उद्योगामुळे बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. एकंदर ८८८ मजुरांना प्रत्यक्ष रोजगार

उपलब्ध झाला आहे. औष्णिक विद्युत केंद्रात निर्माण होणाऱ्या राखेवर काम करणारे मजुर या सर्वांवर औष्णिक विद्युत केंद्रामुळे परिणाम होतो.

१) मजुरांचे कामाचे दिवस:

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी २५ मजुरांना सरासरी २५० दिवस राखेवर काम मिळते तर ३५ मजुरांना वर्षभरात सरासरी ३१० दिवस काम मिळते. थोडक्यात पाहणी केलेल्या राखेवरील मजुरांना सरासरी २८५ दिवस रोजगार उपलब्ध झाला आहे.

२) मजुरांची सरासरी मजुरी :

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी २४ (४०%) मजुरांना सरासरी रु.७५ मजुरी मिळते तर ३६ (६०%) मजुरांना रु.१५० मजुरी मिळते. सर्व मजुरांचा एकत्रित विचार केला तर सरासरी मजुरी रु.१२० प्रती दिवस मिळते.

३) मिळणाऱ्या मजुरीत किमान गरजांची पूर्तता:

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी २० (३३%) मजुरांच्या मते कुटूंबांच्या किमान गरजा रोजच्या मिळणाऱ्या मजुरीत पूर्ण होतात. तर ४० (६७%) मजुरांच्या मते आपल्या कुटूंबाच्या किमान गरजा मिळणाऱ्या मजुरीत पूर्ण होत नाहीत. थोडक्यात पाहणी केलेल्या मजुरांना मिळणाऱ्या मजुरीत त्यांच्या कौटूंबिक किमान गरजा पूर्ण होतात का या बाबत चर्चा केली असता असे लक्षात आले की बहुतेक मजुरांच्या किमान गरजा मिळणाऱ्या मजुरीत पूर्ण होत नाहीत.

४) बचत प्रवृत्ती:

पाहणी केलेल्या मजुरांपैकी केवळ ६ म्हणजेच १०% मजूर बचत करतात उरलेले मजूर मिळणाऱ्या उत्पन्नातून बचत करु शकत नाहीत. अत्यल्प उत्पन्न असल्याने त्यांच्या किमान गरजाच कशा तरी भागवल्या जातात.

६) विमा योजनेचा लाभ:

पाहणी केलेल्या मजुरांना विमा सुरक्षा मिळते का असे विचारले असता सर्वांनीच विमा सुरक्षा मिळत नाही असे उत्तर दिले. या असंघटीत मजुरांना विमा सुरक्षा मिळणे गरजेचे आहे.

७) कामाच्या ठिकाणी मुलभूत सोयी:

पाहणी केलेल्या मजुरांना कामाच्या ठिकाणी मुलभूत सोयी उपलब्ध आहेत का? असे विचारले असता सर्वांनी कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सोयी उपलब्ध नाही असे मत नोंदविले आहे. तसेच प्रत्यक्ष पाहणी केली त्यावेळी ही बाब प्रकर्षाने निदर्शनास आली.

८) मजुरांना सरकारी योजनांचा लाभ:

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी फक्त ०७ मजुरांना सरकारी योजनाचा लाभ मिळालेला दिसतो. या सर्व ७ मजुरांना शासकीय घरकूल योजनेतून घरे मिळाली आहे. उरलेल्या मजुरांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही. थोडक्यात, शासकीय योजनेचा लाभ मिळणारे अत्यल्प मजूर असून त्यांना केवळ घरकूल योजनेचा लाभ मिळाला.

९) मजुरांना स्वस्त दुकानातून वस्तू:

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी २६ (४३.३%) मजुरांना स्वस्त धान्य दुकानातून वस्तू मिळतात. तर उरलेल्या ३४ (५६.७%) मजुरांना स्वस्त धान्य दुकानातून वस्तू मिळत नाही. ज्यांना स्वस्त धान्य दुकानातून वस्तू मिळतात त्यात फक्त गहू व तांदुळ यांचाच समावेश आहे. थोडक्यात पाहणी केलेल्या मजुरांपैकी निम्म्यापेक्षा कमी मजुरांना स्वस्त धान्य दुकानातून वस्तू मिळतात.

१०) मुलांना शिक्षणास सरकारी योजनेचा लाभ:

अध्ययनासाठी पाहणी केलेल्या ६० मजुरांपैकी २१ (३५%) मजुरांच्या मुलांना शिक्षणासाठी सरकारी योजनेचा लाभ मिळतो. तर ३९ (६५%) मजुरांच्या मुलांना शिक्षणासाठी सरकारी योजनेचा लाभ मिळत नाही. असे पाहणी करीत असतांना लक्षात आले. थोडक्यात शिक्षणासारख्या मुलभूत गरजेचा लाभ अजून ही ६५% मजुरांच्या मुलांना मिळत नाही ही स्थिती चिंतनीय आहे.

११) मुलांना शिक्षण योजनांचा लाभ:

अध्ययनासाठी निवडलेल्या ६० मजुरांच्या कुटूंबापैकी केवळ २१ कुटूंबे शिक्षणाच्या वेगवेगळ्या योजनेचा लाभ घेत होती. या २१ पैकी १८ मजुरांच्या मुलांनी मोफत प्राथमिक शिक्षण या योजनेचा लाभ घेतला. ११ मजुरांच्या पाल्यांनी मोफत मुलींच्या शिक्षणाचा लाभ घेतला. ५ मजुरांच्या पाल्यांनी मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजनेचा तर एका पाल्याने वसतीगृह सुविधेचा लाभ घेतला आहे. थोडक्यात शैक्षणिक योजनेचा लाभ घेणाऱ्या मध्ये मोफत प्राथमिक शिक्षण व मुलीचे शिक्षण या योजनेचा लाभ घेणारे जास्त लाभ धारक आहे.

**निष्कर्ष:**

दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रातून बाहेर फेकल्या जाणाऱ्या राखेवर ८८८ कामगारांना प्रत्यक्ष रोजगार मिळाला तर वीट भट्टी व सिमेंट कारखान्यात अप्रत्यक्षरित्या अनेक कामगारांना रोजगार मिळाला आहे. राखेवर काम करणारे मजुर यांना मिळणारी मजुरी (उत्पन्न) फारच कमी आहे. त्याच्या गरजा पूर्ण होत नाही. एक प्रकारे कामगाराचे शोषण होतांना दिसते. या गटातील कामगारांच्या कुटुंबाचा आकार सरासरीपेक्षा जास्त आहे. तसेच त्यांच्या राहणीमानात व जीवनमानात फारसा बदल झालेला दिसत नाही. सरकारने जाहीर केलेल्या विविध योजना त्यांच्या पर्यंत पोहचविण्यात अपयशी ठरले आहेत. वीजेचा वापर व वीज जोडणी मालकीचे प्रमाण कमी आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टीने व जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी वीज जोडणी व घरकूल योजनेची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची:**


१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, दैनंदिनी.

२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जळगाव जिल्हा.

३) प्रा. प्रदिप आगलावे, *संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्र*, (जाने. २०००), विद्या प्रकाशन, नागपूर.

४) प्रा. सुरेश मेश्राम, *प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन*, मातृसेवा संघ, प्रथमावृत्ती २००० इन्स्टीट्यूट ऑफ सोशल वर्क, नागपूर.

५) प्रा.एन.एल. चव्हाण, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती २०००, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

६) डॉ.श्रीधर आ.देशपांडे, डॉ. विनायक श्री. देशपांडे., *भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), सुधारित आवृत्ती २०१०, हिमालय पब्लिशिंग हाऊस, नागपूर.*

७) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२, २०१२-१३*, पृ.१३३,१३४.

८) दैनिक लोकमत - जळगाव, १८ मे २०१०, सिंहावलोकन पुरवणी.

९) दैनिक दिव्य मराठी - भुसावळ, ३ ऑक्टोबर २०१३, पुरवणी.

# दारिद्र्याचे मोजमाप : एक संक्षिप्त आढावा

पांडुरंग महादेव कडुकर, मुंबई,
अधिव्याख्याता, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,
(महाराष्ट्र शासन) परळ, ४०० ०१२.
भ्रमणध्वनी : ९३७१६०४६९४
E-mail: drpmkadukar@rediffmail.com

भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये स्वातंत्र्यानंतर विकासासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. विकसनशील देश म्हणून ओळखला जाणारा भारत देश आज विकसीत अवस्थेकडे वाटचाल करीत आहे. दर दहा वर्षांनी जनगणनेच्या माध्यमातून अनेक बाबींची माहिती संकलित करुन प्रसिद्ध केली जाते. देशामध्ये होत असलेल्या सामाजिक, आर्थिक जीवनमानाची स्थिती काय आहे याची शास्त्रीय माहिती राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालामार्फत सर्वांच्यापर्यंत पोहोचविली जाते. राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार गेल्या पाच वर्षात देशातील दारिद्र्याचे प्रमाण सात टक्क्यांनी घटून २९ टक्क्यांवर पोहोचले आहे. परंतू भारतामध्ये दारिद्र्य रेषा कोणती आणि ती कशी ठरवायची याबाबत अनेक मतभेद पूर्वीपासून दिसुन येतात. जेव्हा-जेव्हा भारतामध्ये दारिद्र्यरेषा ठरविण्याचा प्रयत्न झाला तेव्हा नेमके गरीब कोणाला म्हणायचं ? या प्रश्नाचे सर्वमान्य उत्तर मिळालेले नाही. याचे एक मुख्य कारण म्हणजे गरिबी ही बहुआयामी संकल्पना आहे. आर्थिक, वित्तीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अशी वेगवेगळी परिमाणे या संकल्पनेला आहेत.

प्रस्तुत लेख हा पुर्णतः दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असुन या लेखाची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे - (१) दारिद्र्याच्या शास्त्रीय मोजमापासाठी आतापर्यंत करण्यात आलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात आढावा घेणे. (२) भारतातील व महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण तपासणे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

आपल्या देशामध्ये दारिद्र्याच्या संकल्पनेसंबंधी विचार विनिमय करण्याची प्रक्रिया पहिल्यांदा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख आणि दादाभाई नौरोजी

यांनी लिहीलेल्या 'ब्रिटीशकालीन भारतातील दारिद्र्य' या पुस्तकाने झाली. त्यानंतर १९३६ मध्ये काँग्रेस पक्षाचे तत्कालिन अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी किमान जीवन जगता यावे यासाठी अन्न व निवारा यासंबंधीचे निकष निश्चित करण्यासाठी पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. पुढे स्वतंत्र भारतामध्ये दारिद्र्याच्या व्याप्तीसंबंधी लोकसभेत प्रथमतः राम मनोहर लोहिया यांनी आपले विचार मांडले तेव्हा ते म्हणाले होते की, 'आपल्या देशातील मोठ्या प्रमाणात जनता ही दररोज फक्त ३.५ आणा खर्च करुन जगत आहे.' याची गंभीर दखल पं. नेहरुंनी तात्काळ घेऊन सहा तज्ज्ञांची एक स्वतंत्र कमिटी स्थापन केली व नियोजन आयोगाला अहवाल सादर करावयास सांगितला. तेव्हा त्या कमिटीने ज्यांचा दरमहा दरडोई खर्च २० रुपयापेक्षा अधिक आहे तेवढेच दारिद्र्यरेषेच्यावर असतील असे नियोजन आयोगाला कळविले.

## दारिद्र्याचे शास्त्रीय मोजमापः

दारिद्र्याचे शास्त्रीय मोजमाप करण्याची कार्यपद्धती देशामध्ये साधारणतः १९७० च्या दशकापासून सुरु झाली. सुरुवातीच्या काळात प्रा. वि. म. दांडेकर व प्रा. निलकंठ रथ यांनी प्रायोगिक पातळीवर निरीक्षण व अनुभवातून (Empirical Investigation) प्रचलित परिस्थितीमध्ये दारिद्र्याचे मोजमाप कसे करता येईल याचा अभ्यास केला होता. त्यादरम्यान प्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ पी. व्ही. सुखात्मे यांनी नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ न्युट्रीशन (National Institute of Nutrition) च्या सहकार्याने जी माहिती प्रसिद्ध केली होती त्यामध्ये एका सर्वसाधारण व्यक्तीला दररोज २,२५० कॅलरीजची गरज असते असे स्पष्ट केले होते. हाच आधार घेऊन दांडेकर व रथ यांनी तेवढ्या कॅलरीज निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे किती अन्नधान्य लागेल याचा अंदाज घेऊन, प्रचलित किमतीप्रमाणे ते विकत घेण्यासाठी किती उत्पन्न असावे या अनुषंगाने दारिद्र्य रेषा ठरविण्यात आली.

१९८० मध्ये नियोजन आयोगाने या धर्तीवर दारिद्र्यरेषेचे मोजमाप करण्यास सुरुवात केली. पुढे १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्यानंतर डी. टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन आयोगाने तज्ज्ञांची समिती दारिद्र्याचे शास्त्रीय व पद्धतशीर मोजमाप कसे करता येईल यासाठी स्थापन केली. १९९३ मध्ये या समितीने आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये कॅलरीजच्या संदर्भात ग्रामीण व शहरी अशा दोन भागात विभागणी केली. ग्रामीण व्यक्तीसाठी दिवसाला २४०० कॅलरीज तर शहरी व्यक्तीसाठी दिवसाला २१०० कॅलरीज असा बदल करुन या निकषानुसार दर पाच वर्षाच्या अंतरानुसार नियोजन आयोग भारतीय दारिद्र्याचे मोजमाप करुन आकडेवारी जाहीर करत असे. परंतु या पद्धतीवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे नियोजन आयोगाने २००५ मध्ये प्रा. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली त्यांनी डिसेंबर २००६ मध्ये आपला अहवाल सादर केला. प्रा. तेंडुलकरांनी कॅलरीजवर आधारित असलेल्या पूर्वीच्या कार्यपद्धती मध्ये बदल करुन उपभोग खर्चावर आधारित एक नवा फॉर्म्युला मांडला त्यामध्ये आरोग्य, शिक्षण या बाबीवरील खर्चाचाही समावेश केला आणि

त्यानुसार १९९३-९४ व २००४-०५ या वर्षातील दारिद्र्याचे प्रमाण सादर केले.

सध्या शासनाने गरीब कोण हे ठरविण्याच्या प्रक्रियेत 'कोण गरीब नाही' हे ठरविण्यासाठी तीन टप्पे निश्चित केले आहेत. पहिल्या टप्प्यात एकूण १३ निकष ठरविले आहेत ते पुढील प्रमाणे:

(१) स्वयंचलित दोन/तीन/चार चाकी वाहने/ नोंदणी करणे आवश्यक असलेल्या मासेमारीच्या बोटी मालकीच्या असलेली कुटुंबे.

(२) ट्रॅक्टर्स हार्वेस्टर्स यासारखी शेतीची यांत्रिक अवजारे मालकीची असलेली कुटुंबे.

(३) ५० हजार रुपये व त्यापेक्षा अधिक मर्यादेचे किसान क्रेडीट कार्ड असलेली कुटुंबे.

(४) राजपत्रित तसेच अराजपत्रित केंद्र व राज्य सरकारी अथवा सर्व क्षेत्रातील उपक्रमात अथवा शासन सहाय्यीत स्वायत्त मंडळे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांत काम करणारा एखादा कर्मचारी असलेली कुटुंबे (यामध्ये मानधनावर काम करणारे कर्मचारी अपवाद असतील)

(५) सरकारकडे नोंदणी केलेली बिगर शेती उद्योग असलेली कुटुंबे.

(६) दरमहा १० हजार रुपयांपेक्षा अधिक कमाई असलेली एखादी व्यक्ती असलेली कुटुंबे.

(७) इन्कमटॅक्स भरणारी कुटुंबे.

(८) पक्के छत आणि पक्क्या भिंती असलेले तीन अथवा अधिक खोल्यांचे घर असलेली कुटुंबे.

(९) रेफ्रीजरेटर असलेली कुटुंबे.

(१०) लॅंडलाईन फोन असलेली कुटुंबे.

(११)डिझेल/विजेवर चालणाऱ्या बोअरवेल/ ट्युबवेल सारख्या किमान एक साधनासह २.५ एकर अथवा अधिक सिंचित जमीन असलेली कुटुंबे.

(१२)दोन अथवा अधिक हंगामात पिके घेणारी ५ एकर अथवा अधिक सिंचित जमीन असलेली कुटुंबे.

(१३)डिझेल/विजेवर चालणाऱ्या बोअरवेल/ ट्युबवेल सारख्या किमान एक साधनासह ७.५ एकर अथवा अधिक जमीन असलेली कुटुंबे.

दुसऱ्या टप्यामध्ये गरीबांच्या यादीत ज्यांचा थेट समावेश केला जाईल, अशा कुटुंबाबाबत असलेले निकष पुढीलप्रमाणे - (१) बेघर असलेले कुटुंब (२) निराधार/भीक मागुन जगणारे कुटुंब (३) डोक्यावरुन मैला वाहुन नेणारे कुटुंब (४) आदिम जमातीतील कुटुंब (५) कायद्याने मुक्त झालेले, वेठबिगार मजुर.

तिसऱ्या टप्प्यामध्ये वंचिततेचे आणखी काही निकष दिले आहेत. त्यामध्ये (१) कच्ची भिंत व कच्चे छत असलेले एका खोलीचे घर असलेले कुटुंब (२) १६ ते ५९ वर्ष दरम्यानच्या वयाचा एकही प्रौढ सदस्य नसलेले कुटुंब (३) महिला कुटुंब प्रमुख असलेले व १६ ते ५९ वर्ष दरम्यानच्या वयाचा एकही कमावता प्रौढ सदस्य नसलेले कुटुंब (४) अंगमेहनतीच्या अनियमित रोजगारातून मुख्यतः ज्यांची मिळकत होते अशी भूमिहीन कुटुंबे.

वरीलप्रमाणे 'नेमके गरीब कोण' हे ठरविण्यासाठी तीन टप्पे २०११ मध्ये शासनाने

स्विकारले असुन ही पद्धती ठरविताना सक्सेना समितीच्या शिफारसी विचारात घेतल्या गेल्या.

## शहरी व ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण :

नियोजन आयोगाने १९९३-९४ व २००४-०५ ची दिलेली दारिद्र्याची आकडेवारी आणि प्रा. सुरेश तेंडुलकर यांनी दिलेली आकडेवारी याचे तुलनात्मक विश्लेषण तक्ता क्र. १.१ वरुन करता येईल. खालील तक्त्यावरुन नियोजन आयोग व तेंडुलकर समितीने दिलेल्या आकडेवारीमध्ये तफावत आहे. नियोजन आयोगापेक्षा तेंडुलकर समितीने दिलेले दारिद्र्याचे प्रमाण १९९३-९४ व २००४-०५ या दोन्ही वेळेला जास्त आहे. परंतु दोन्हींच्या मते, या कालावधीत दारिद्र्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. नियोजन आयोगाच्या आकडेवारीनुसार एकूण दारिद्र्याचे प्रमाण ३६ टक्क्यांवरुन २७.५ टक्के एवढे खाली आले. तर तेंडुलकर समितीनुसार ४५.३ टक्क्यांवरुन ३७.२ टक्क्यांवर आले.

या आकडेवारीतील तफावतीचे मुख्य कारण म्हणजे तेंडुलकर समितीने दारिद्र्याचे मोजमाप कॅलरीजवर आधारित न करता उपभोग खर्चावर आधारित केले. देशातील व्यक्ती सर्व प्रकारच्या उपभोगावर सरासरीने किती खर्च महिन्याला करतात. याबाबतची आकडेवारी राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालाच्या माध्यमातुन ठराविक काळानंतर संकलित केली जात असते. याच माहितीचा आधार दारिद्र्याचे मोजमाप आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी घेतला जातो.

तेंडुलकर समितीने उपभोग खर्चावर आधारित दारिद्र्यरेषेची जी पातळी निश्चित केलेली होती, ती आकडेवारी नियोजन आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला अन्नधान्य विधेयकासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या एका जनहित याचिकेच्या संदर्भात मे २०११ मध्ये सादर केली.

तक्ता क्र. १.१ : भारतातील शहरी व ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण

| वर्ष | दारिद्र्याचे प्रमाण | | |
|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | एकुण |
| १९९३-९४ | | | |
| नियोजन आयोग | ३२.४ | ३७.३ | ३६.० |
| तेंडुलकर समिती | ३१.८ | ५०.१ | ४५.३ |
| २००४-०५ | | | |
| नियोजन आयोग | २५.७ | २८.३ | २७.५ |
| तेंडुलकर समिती | २५.७ | ४१.८ | ३७.२ |

स्रोत : दै. लोकमत मुंबई दि. २३ सप्टें. २०११, पृ. ६

त्यानुसार २००४-०५ च्या संदर्भ वर्षानुसार देशातील शहरी भागासाठी दरडोई दरदिवशी २० रुपये तर ग्रामीण भागासाठी दरडोई दरदिवशी १५ रुपये ही एकूण खर्चाची पातळी दारिद्र्यरेषेचे निर्धारण करण्यासाठी निश्चित करण्यात आली होती, यावर सर्वोच्च न्यायालयाने थोडे खोलात जाऊन या दारिद्र्यरेषेसंबंधी दरडोई, दरदिवशी उपभोग खर्चाचे हे निकष कसे तयार केले आणि सध्याची म्हणजे २०११-१२ या वित्तीय वर्षाचा संदर्भ घेऊन उपभोग खर्चाची पातळी किती आहे. याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश नियोजन आयोगाला दिले. पुढे केंद्रिय नियोजन आयोगाने सप्टें. २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाला प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यामध्ये दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी तेंडुलकर समितीने वापरलेले उपभोग खर्चाचे निकष वापरुन, उपभोग खर्चाची दरडोई दरदिवशी २६ रुपये ही पातळी ग्रामीण भागासाठी आहे तर शहरी भागासाठी दरडोई दरदिवशी ३२ रुपये ही दारिद्र्यरेषेची सध्याची 'कट ऑफ पातळी' असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केले.

या प्रतिज्ञापत्रानुसार व दारिद्र्याच्या निकषानुसार कुटुंबाचा सरासरी आकार पाच व्यक्तींचा धरला तर ग्रामीण भागात महिन्याला ३९०० रुपये तर शहरी भागामध्ये महिन्याला ४८०० रुपये ही उपभोग खर्चाची 'कट ऑफ पातळी' येते. नियोजन आयोग या आकडेवारीचा उपयोग दारिद्र्यरेषेखालील असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ठरविण्यसाठी करतो.

पुन्हा नव्याने मार्च २०१२ मध्ये नियोजन आयोगाने तेंडुलकर समितीने वापरलेले निकष हा आधार घेऊन गरिबीचा जो अहवाल प्रसिद्ध केला त्यामध्ये २००४-०५ ते २००९-१० या पाच वर्षात देशातील गरिबी ७.३% नी घटल्याचे जाहीर केले. त्यामध्ये ग्रामीण भागातील गरिबी ८% नी तर शहरी भागातील गरिबी ४.८% नी घटल्याचे चित्र दाखवले आहे. दारिद्र्यरेषेबाबत नियोजन आयोगाने स्पष्ट केले आहे की, ग्रामीण भागातील जी व्यक्ती दिवसाची गुजराण करण्यासाठी २२ रुपये ४२ पैसे खर्च करु शकत नसेल आणि शहरी भागातील जी व्यक्ती दिवसाची गुजराण करण्यासाठी २८ रुपये ६५ पैसे खर्च करु शकत नसेल अशी व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली असेल. गरिबीचे प्रमाण काढण्यासाठी नियोजन आयोगाने हा निकष वापरला आहे. यावर संसदेत व समाजातील वेगवेगळ्या स्तरांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. सरकारने गरिबीची नव्याने व्याख्या करण्यासाठी तज्ज्ञांचा गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा गट २०११ च्या जनगणनेच्या आधारावर देशातील जातनिहाय आर्थिक परिस्थितीची माहिती घेईल. या माहितीच्या आधारावर सरकारला देशातील गरिबांची संख्या ठरविणे सोपे जाईल. त्याच आधारावर लाभधारक ठरविले जातील असे नियोजन आयोगाने स्पष्ट केले आहे.

### १.५ महाराष्ट्रातील दारिद्र्याचे चित्र :

महाराष्ट्र राज्यात दारिद्र्यरेषेखालील जनतेची संख्या सध्या २ कोटी ७० लाख ८० हजार इतकी असुन दारिद्र्याचे प्रमाण २४.५ टक्के आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात १ कोटी ७९ लाख ८० हजार (२९.५%) लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे तर शहरी भागात ९० लाख ९० हजार (१८.३%) लोकसंख्या दारिद्र्यात आहे. थोडक्यात चारपैकी एक महाराष्ट्रीय गरीब आहे असे या आकडेवारीतुन निष्कर्षाला येते.

दारिद्र्यासंबंधी महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये (२०११-१२) नियोजन आयोगाचा आधार घेऊन प्रमुख राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण आणि दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या याचा तक्ता देण्यात आला आहे. त्याआधारे महाराष्ट्राची स्थिती काय आहे हे तक्ता क्र. १.२ वर दर्शविले आहे.

खालील तक्त्यावरुन महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण १९७३-७४ ते २००४-०५ या कालावधीत ५३.२% वरुन ३८.१% पर्यंत खाली आले तर भारतातील प्रमाण याच कालावधीत ५४.९% वरुन ३७.२% पर्यंत खाली आले. दारिद्र्याचे प्रमाण महाराष्ट्र व देशातदेखील घटत आहे हे मान्य केले तरी दारिद्र्यातील निरपेक्ष लोकसंख्या कमी होत आहे का? याचे उत्तर वरील आकडेवारीवरुन नाही असेच आहे. महाराष्ट्रात १९७३-७४ ते २००४-०५ या कालावधीत दारिद्र्यातील निरपेक्ष लोकसंख्या २८७.४ लाखांवरुन ३२१.५ लाखांपर्यंत वाढली तर देशपातळीवरील दारिद्र्यातील लोकसंख्या ३२१३.४ लाखांवरुन ४०८१.४ लाखांवर जाऊन पोहचली.

## १.६ समारोप :

एकूणच दारिद्र्यासंबंधीचे मोजमाप आणि दारिद्र्याचे प्रमाण निश्चित करण्यासाठीची दारिद्र्यरेषा यांचा साकल्याने विचार केल्यास एका बाजुला दारिद्र्याचे प्रमाण महाराष्ट्र व देशपातळीवर घटत असल्याचे दिसुन येते तर दुसऱ्या बाजुला दारिद्र्यामध्ये असणारी निरपेक्ष लोकसंख्या वाढत आहे. महाराष्ट्रामध्ये दारिद्र्यात असणारी निरपेक्ष

तक्ता क्र. १.२ : दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या आणि त्यांचे प्रमाण :

| वर्ष | १९७३-७४ | १९८३ | १९९३-९४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | २८७.४ (५३.२%) | २९०.९ (४३.४%) | ३०५.२ (३६.९%) | ३२१.५ (३८.१%) |
| भारत | ३२१३.४ (५४.९%) | ३२२९.० (४४.५%) | ३२०३.७ (३६.०%) | ४०८१.४ (३७.२%) |

लोकसंख्या (लाखात) कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात

स्रोत : महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०११-१२ पा. क्र. १७९

लोकसंख्या ११.८६% नी वाढली (१९७३-७४ ते २००४-०५ या कालावधीत) तर याच कालावधीत भारतातील ही वाढ २७.०१% आहे. हा विरोधाभास दारिद्र्यासंबंधीच्या या विश्लेषणातुन स्पष्ट होतो. तेव्हा खऱ्या अर्थाने ही वास्तविकता स्वीकारुन दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच दारिद्र्याचे न्याय्य मोजमाप होण्यासाठी व दारिद्र्य निर्मुलनासाठी शासन राज्यकर्ते, तज्ञ, अभ्यासक व समाजातील वेगवेगळे घटक यांच्या एकत्रित प्रयत्नातून सर्वंकष धोरण प्रभावीपणे राबविल्यास आकड्यांच्या खेळात अडकलेली दारिद्र्यरेषा दूर होऊन कल्याणकारी राज्याचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होईल.

## संदर्भ सूची:


1) Azizur R. Khan, (1984) *Poverty in Rural Asia*, International Labour Organisation, Asian Employment Programme (ARTEP), Bangkok

2) Jamo Kwame Sundaram, *'Poverty Matters'*, EPW Dec. 8, 2012 pp 22-28.

3) Karen Coelho, Anant maringanti, *'Urban poverty in India : Tools Treatment and politics at the Neo-liberal Turn.*

4) Nilakantha Rath, *'Measurement of poverty : In Retrospect and prospect,* EPW, Oct 15, 2011 pp 40-43

5) Vamsi Vakulabharanam and et al, *'Understanding poverty and Inequality in Urban India since Reforms*, EPW, Dec 1, 2012 pp 44-52

६) *महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल* - २०११-१२, पृ. १७९

७) दैनिक लोकमत, मुंबई दि. २३ सप्टें. २०११ पृ. ६, १८ सप्टें. २०११, पृ. ३

८) दैनिक लोकसत्ता, मुंबई दि. २१ मार्च २०१२, पृ. ९.

# स्वराज्यातील आदर्श अर्थनिती

**नारायण भिकोबा टाक, सासवड,**
वाघीरे महाविद्यालय, जिल्हा पुणे.
भ्रमणध्वनी: ९९२२५५८०२६

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी मुलूखात स्वराज्य स्थापन करण्याचे महान कार्य केले. त्यांचा जन्म १६३० साली झाला. १६३० मध्ये आणि त्यानंतरची काही वर्षे मराठी मुलूखात आणि उर्वरीत भारतात भीषण दुष्काळ पडला होता. शेती पूर्णपणे खचली होती, उद्योग, व्यापार बंद होता. अन्न धान्याची टंचाई, महागाई, उपासमार यामुळे जनता त्रस्त झाली होती. माणसे गुलाम म्हणून स्वत:ची विक्री करुन घेत होती, कुटुंबाचे विघटन झाले होते, माणसे मरत होती. एक डच व्यापारी म्हणतो, "लोकांची एकच मागणी होती, आम्हास अन्न द्या अथवा मारुन टाका". सर्वत्र विपन्नावस्था होती. अशा अवस्थेतून जनतेला बाहेर काढून त्यांची आर्थिक उन्नती करुन, आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे कार्य शिवछत्रपतींनी केले. स्वराज्यातील अर्थनिती आदर्श होती म्हणूनच हे शक्य झाले. शिवाजी महाराजांच्या शौर्याला, त्यागाला, न्यायबुध्दीला, युध्दनितीला जितके स्वराज्य स्थापनेत महत्व आहे तितकेच महत्त्व स्वराज्यातील आदर्श अर्थनितीला आहे.

**शेतीचा विकास:**

शेती उत्पादनातून मिळणारे उत्पन्न हेच स्वराज्यातील उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शेती व्यवसाय हाच जीवनाचा आधार होता. शिवशाहीत पड जमिन पिकाखाली आणणे आणि शेती उत्पादनात वाढ करणे याकरता विशेष प्रयत्न करण्यात आले. पड जमिन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला जात होता. शेती उत्पादन वाढावे, शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य यावे या करिता सरकारी तिजोरीतून शेतीसाठी बिनव्याजी कर्ज दिले जात होते. शेतकऱ्यांच्या कर्ज फेडीची कुवत निर्माण झाल्यानंतरच कर्ज परत घेतले जात होते. शेतीसाठी बि-बियाणे, अवजारे सरकारकडून दिली जात होती, बैलजोडी दिली जात होती. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, युध्दातील लूट या काळात शेतसारा माफ केला जात होता. अशा अडचणीच्या काळात सरकारकडून मदत मिळत होती. शेतसारा शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन, शेती उत्पन्नाचा विचार करुन आकारला जात होता. शेती विषयक

योग्य धोरणामुळे पड जमिन लागवडीखाली आली, शेती उत्पादनात वाढ झाली, शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण झाले.

### उद्योग व्यापाराचा विकास:

शिवशाहीमध्ये कायद्याचे राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे नवीन बाजार पेठा वसविण्यास मदत झाली. त्या अगोदर व्यापार पेठांवर दरोडे पडत होते. व्यापाऱ्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी सोबत रक्षक घ्यावे लागत होते. रस्त्यात लूटमार होण्याची भीती होती, परिणामी व्यापाराचा विकास होत नव्हता. शिवशाहीत संरक्षणास महत्व दिल्यामुळे व्यापाराचा विकास झाला. रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रावरुन शिवशाहीत व्यापाराला किती महत्त्व होते हे समजते. *साहूकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहूकारा करिता राज्य अबादान होते. न मिळे ते वस्तुजात राज्यात येते राज्य श्रीमंत होते* असे म्हटले आहे. येथे साहूकार हा शब्द व्यापार करणारे, कर्जाऊ रकमा देणारे अशा लोकांसाठी वापरला आहे. सावकाराला/व्यापाऱ्याला संरक्षण दिल्यास फायदा होतो. मोठमोठ्या सावकारांना बाजारात आणून बसवावे त्यांचा सन्मान करावा त्यांना व्यापारासाठी योग्य जागा द्यावी, दुकाने द्यावीत तसेच परमुलखातून व्यापाऱ्यांना आणावे, दर्यावर्दी सावकारांनाही बंदरामध्ये आणावे असे शिवशाहीतील धोरण असल्याचे आज्ञापत्रातून स्पष्ट होते. गुन्हेगारांना कडक शासन होत होते त्यामुळे नवनवीन पेठांची निर्मिती होऊन परराज्यातील व्यापारी स्वराज्यात येऊ लागले. व्यापाराचा विकास करण्यासाठी देशी व्यापाराला प्रोत्साहन देणारे जकात विषयक धोरण शिवशाहीत राबविण्यात आले.

गावागावात कारागीरांना वस्ती करण्यास प्रोत्साहन दिले गेले. त्यांनी गावामधून स्थलांतर करु नये या करिता त्यांना ग्राम कार्यासाठी जमिनी दिल्या गेल्या परिणामी उत्पादनात वाढ होऊन व्यापाराचा विकास होण्यास मदत झाली.

शेतीला पूरक व्यवसायांची गावा गावात निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले. विजापूरच्या मुरार जगदेव या सरदाराने पुणे जाळून टाकले होते. 'पुण्यातील कोट मोडून शहर मारिले'. असा उल्लेख ९१ कलमी बखरीत आहे. या भागात दाट झाडी वाढून हिंस्त्र पशू व चोरांची वस्ती निर्माण झाली होती. स्वराज्य उभारणीच्या सुरुवातीलाच या भागात पुन्हा वसाहत निर्माण केली गेली. बागायती, आमराया निर्माण करुन बाजारपेठ वसवली गेली. मातोश्री जिजाबाईंच्या आज्ञेनुसार पुण्याजवळील पाषाण येथे एक पेठ वसवली गेली तिला पुढे जिजापूर असे नाव पडले. पुणे जवळच्या परिसरात आज ज्या भागाला खेड-शिवापूर म्हणले जाते त्या ठिकाणी बाजारपेठ वसवली होती. शिवशाहीत व्यापाराला प्रोत्साहन दिल्यामुळे व्यापाराचा विकास होऊन राज्याचे उत्पन्न वाढले. जनता सुखी, समाधानी होण्यास मदत झाली. आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली.

शिवाजी महाराजांनी समुद्र मार्गे होणाऱ्या व्यापाराला मदत करुन व्यापाराचा विकास केला. सागरामध्ये आरमार उभे करुन लष्करी सामर्थ्य वाढविले. त्याचा व्यापार वाढीसाठी फायदा झाला. मुघलराजे अनेक वर्षे भारतात राज्य करीत होते. पण त्यांना सागराचे महत्व कधीच कळले नाही. आफ्रिका खंडातील एका बेटावरुन

आलेल्या स्वराज्यानजिक अरबी समुद्रात आपले पाय रोवून बसलेल्या सिद्धीला मोगल राजांनी मदत केली. शिवरायांच्या आरमाराने सिध्दीवर नेहमीच वचक ठेवला. पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्या व्यापारी वखारी सुध्दा स्वराज्याजवळ निर्माण झाल्या होत्या त्यांच्यावरही शिवशाहीतील आरमाराने वचक ठेवला. आरमार संरक्षणाचे दृष्टीने जसे महत्वाचे होते तसे व्यापार विकासासाठी सुध्दा उपयुक्त होते. सागरात सत्ता निर्माण करणारे, आरमार उभे करुन सागरी व्यापार करणारे शिवाजी महाराज पहिले भारतीय राजे होते.

कल्याण-भिवंडी घेऊन त्या ठिकाणी १६५९ मध्ये शिवरायांनी आरमाराची स्थापना केली. आरमार उभारताना पोर्तुगीज कारागिरांना कामावर ठेवले होते. कोकणात असलेल्या लाकडाचा विशेषत: सागाचा उपयोग जहाज बांधणीसाठी केला जात होता. आंबा, फणस यांचाही उपयोग केला जात होता. नंतर विजयदुर्ग, मालवण, पनवेल या ठिकाणी जहाज बांधणी उद्योग सुरु केला गेला. आरमारामध्ये गुराबे, तरांजे, तारवे, मचवे, बामोट, पाल, गलबते इत्यादींचा समावेश होता. स्वराज्यामध्ये हर्णे, मालवण, राजापूर, संगमेश्वर, देवगड, दाभोळ, बाणकोट ही बंदरे होती. आरमाराची निर्मिती करताना लढाऊ जहाजांबरोबरच व्यापारी जहाजांची सुध्दा निर्मिती केली जात होती. त्यांचा उपयोग देशी-विदेशी व्यापारासाठी केला जात होता. कोकणातून समुद्रमार्गे सुरत, गोवा याठिकाणी जहाजांमधून मीठ, नाचणी, तांदुळ इत्यादी वस्तूंची ने-आण केली जात होती. मालवाहू जहाजे इराण, बसरा, मस्कत या ठिकाणी गेल्याची माहिती सुरत व मुंबई या ठिकाणच्या फॅक्टरी रेकॉर्डमध्ये मिळते. प्रतिवर्षी या ठिकाणी किमान दोन ते तीन गलबते जात होती. मीठाचा व्यापार वाढावा म्हणून राज्यातील मीठ व्यापाऱ्यांना सवलती दिल्या गेल्या. परराज्यातून आयात होणाऱ्या मीठावर जास्त जकात आकारली गेली. हे धोरण राज्यातील उद्योगांना संरक्षण देण्यासाठी होते.

*व्यापाराचे महत्त्व ओळखून मिठाच्या व्यापारा करिता शिवाजी महाराजांनी वासंतिक नौदल तयार केले होते. मस्कत व मोचा या अरबांच्या बंदराशी व्यापार करण्यासाठी तीन ढोल काठ्यांची जहाजे बांधली होती.* (मराठ्यांचा इतिहास पृ.३१४). तीन ढोल काठ्यांची (तीरकती) जहाजे अंदाजे २०० ते ३०० टन वजनाची होती. सागरी मार्गांनी येणाऱ्या शत्रू पासून जनतेचे संरक्षण हा मुख्य हेतू आरमार उभारणी मागील असला तरी व्यापाराचा विकास या हेतूलाही महत्व दिले गेले होते. पोर्तुगीज आणि इंग्रजांच्या वखारी बरोबरही व्यापारी संबंध निर्माण केले गेले होते. सुरुवातीला स्वराज्याच्या आरमारी शक्तीला, व्यापाराला, विदेशी वखारी महत्व देत नव्हत्या. नंतर वखारीतील अधिकाऱ्यांना शिवाजी महाराजांच्या ताकदीची दखल घ्यावीच लागली.

**महसूल पध्दती:**

भारतातील स्वराज्य पूर्व काळातील हिंदू राजांच्या राजवटीत शेतसारा आकारताना जमीन मोजली जात होती, त्यासाठी साखळीचा उपयोग केला जात होता. निजामशाहीत मलीक अंबरने सुध्दा जमीन मोजणीसाठी साखळीचा उपयोग केला होता. शेतसारा आकारताना शिवशाहीमध्ये काठीचा उपयोग करुन जमीन मोजली जात होती. या काठीला शिवशाहीची काठी असे संबोधले जात होते. काठी पाच हात लांब व पाच मुठी

लांब होती. वीस काठ्या लांब व वीस काठ्या रुंद असलेल्या जमिनीला एक बिघा समजले जात होते. १२० बिघा जमिनीला एक चाहूर समजले जात होते. शेतसारा आकारताना शिवशाही काठीच्या सहाय्याने जमीन मोजली जात होती, त्याला 'चकबंदी' असे म्हणत. जमिनीवर सारा आकारताना जमिनीची प्रतसुध्दा पाहिली जात होती. या प्रतवारीला प्रतबंदी असे म्हणत. याशिवाय जमिनीच्या उत्पादकतेला महत्व दिले जात होते. त्यासाठी जमीन जिरायत आहे की बागायत याचा विचार केला जात होता. बागायत जमीन मोटेच्या साहाय्याने भिजवली जात आहे की पाटाच्या साहाय्याने याचा ही विचार केला जात होता. या सर्व बाबींचा विचार करुन मागील तीन वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढली जात होती. त्यानुसार प्रत्यक्ष शेतसारा आकारणी केली जात होती. उत्पन्नाच्या जवळ जवळ ४० % शेतसारा वसुल केला जात होता. ४०% शेतसारा भरल्यानंतर त्या शेतकऱ्याला इतर कोणतेही कर द्यावे लागत नव्हते. स्वराज्यातील या धारा पध्दतीला 'बटाई' असे संबोधले जात होते. शेतसारा आकारताना दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती व शत्रूपक्षाकडून होणाऱ्या लुटमारीचाही विचार केला जात होता. अशा अडचणीच्या स्थितीत शेतकऱ्यांना सवलत दिली जात होती.

शिवशाहीच्या अगोदर शेतसारा गोळा करण्याचा मक्ता वतनदारांकडे होता. वतनदार शेतकऱ्यांच्याकडून शेतसारा वसूल करताना जास्त शेतसारा वसूल करत होते. शेतकऱ्यांचे शोषण करीत होते. शेतसारा मनमानी पध्दतीने आकारुन सक्तीने वसूल केला जात होता. वसूल केलेल्या शेतसाऱ्यातील चौथा हिस्सा किंवा त्यापेक्षा कमी हिस्सा सरकारी तिजोरीत जमा केला जात होता. ही अन्यायकारक पध्दत बंद करुन स्वराज्यात शेतसारा वसूलीसाठी पगारी नोकर नियुक्त केले गेले. जनतेला विश्वासात घेऊन केलेल्या या सारा आकारणीला शेतकऱ्यांचा पाठींबा होता. शेतकरी समाधानी होते.

इनामी जमीन मिळालेल्या वतनदारांना इनामीपट्टी द्यावी लागत होती, मिरासदारांना मिरासपट्टी द्यावी लागत होती, संस्थानिकांचेकडून खंडणी घेतली जात होती. मोगलांचे मुलूखात स्वारी करुन चौथाई वसूल केली जात होती. शेतसाऱ्याशिवाय सरकारचे हे महत्वाचे उत्पन्न मिळविण्याचे मार्ग होते. आयात मालावरील कर, नाणी पाडणाऱ्यांकडून सरकारला मिळणारा मोबदला या मार्गांनी सुध्दा सरकारला उत्पन्न मिळत होते. उत्पन्न न्याय्य मार्गांनी मिळत होते. न्याय्य मार्गांचा अवलंब करुन सुध्दा सरकारी उत्पन्नात वाढ झाली होती हे शिवशाहीचे वैशिष्ट्य होय.

**चलन व्यवस्थेला महत्त्व:**

शिवशाहीमध्ये चलन व्यवस्थेला महत्व दिले गेले. सोने, चांदी, तांबे या धातूंची नाणी प्रचलित होती. नाण्याचे मूल्य हे त्यात असलेल्या धातूच्या मूल्याएवढे होते. नाण्यावर शिक्का होता. शिक्क्यावरुन नाण्यामध्ये असलेल्या धातूचा कस किती आहे हे समजत होते. नाण्यामध्ये असलेला धातू आणि त्याचा कस याचा विचार करुन नाण्यांची अदलाबदल केली जात होती, नाण्यांचा विनिमय दर ठरत होता. त्यामुळे प्रत्येक वेळी नाण्याचे वजन करण्याची आवश्यकता नव्हती. नाण्याची किंमत धातूच्या किंमतीतील चढ उतारावर अवलंबून होती. वस्तूच्या मागणी पुरवठ्याचाही परिणाम किंमत निश्चितीवर होत

होता.

स्वराज्यामध्ये नाणी पाडली जात होती. तसेच इतर राजवटीतील नाण्यांचासुध्दा वापर केला जात होता. शिवशाहीतील नाण्याला 'होन' असे संबोधले जात होते. होनाच्या पुढील बाजूस 'श्री। राजा। शिव' हा मजकूर होता. मागील बाजूस 'छत्र। पती' हा मजकूर होता. दोन्ही मजकूर एकाच ठश्याचे होते. लारी नावाचे नाणे प्रचलित होते. दक्षिण इराणमध्ये लार नावाचे शहर होते, लार नावाचा प्रांत होता. या ठिकाणी तयार होणारे नाणे लारी म्हणून ओळखले जात होते. स्वराज्यात देशी विदेशी नाण्यांचा उपयोग केला जात होता. स्वराज्यात *हुंडी* प्रचलित होती. *वरात*च्या सहाय्याने व्यवहार केले जात होते. *वरात* म्हणजे एक प्रकारचा चेक होय. *एखाद्याने त्याची किंवा त्याच्या अधिकारातील रक्कम जिथे असेल, किंवा त्याला जिथून काही येणे असेल, अशा ठिकाणावर विशिष्ट व्यक्तीला, विशिष्ट रक्कम देण्याविषयी काढलेला लेखी हुकूम म्हणजे वरात होय.* वरातच्या साहाय्याने नोकरी करणाऱ्यांचा पगारसुध्दा अदा केला जात होता. वरात म्हणजे जवळजवळ पैसाच (Near Money) होता. या साधनांचा सर्वत्र उपयोग केला जात होता. वस्तू विनिमयाऐवजी चलनाच्या वापराला स्वराज्यात आलेले महत्व हे प्रगतीचे लक्षण होते.

**जन कल्याणासाठी खर्च:**

परंपरेने चालत आलेली जमीन वतन देण्याची पध्दत शिवशाहीत जवळजवळ बंदच केली होती. वेतनदारी पध्दतीचा अवलंब केला होता. प्रशासनातील अधिकारी, कामगार, सैन्यातील सेनापती, सैनिक, आरमार सांभाळणारे सेवक इ. नोकरांना सरकारी तिजोरीतून रोख किंवा वरातच्या साहाय्याने वेतन दिले जात होते. दुष्काळ पडला, नैसर्गिक आपत्ती आली, शत्रूपक्षाकडून लूटमार झाली, सैनिकांना दुखापत झाली, अपंगत्व आले तर सरकारी तिजोरीतून मदत केली जात होती. नविन किल्ले निर्माण करणे, जुने किल्ले दुरुस्त करणे, विहिरी खोदणे, पाणी अडविणे, शेतीला पाणी पुरवठ्याची सोय करणे इ. साठी सरकारी तिजोरीतूनच खर्च केला जात होता. शस्त्र निर्मिती, दारु गोळा निर्मिती व देखभाल, जहाजांची बांधणी हा खर्च सुध्दा सरकारच करत होते. शिवशाही 'कल्याणकारी राज्य' होते. त्यामुळे सरकारचा खर्च जास्त होता. सैनिकांचे, अधिकाऱ्यांचे, स्वतः राजाचे, राजाच्या कुटुंबाचे जीवन चैनीचे किंवा जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणारे नव्हते. युध्द मोहिमेच्या वेळेस फक्त मुख्य व्यक्तींसाठी दोनच तंबू ठोकले जात होते. बाकी सैन्य उघड्यावरच राहत होते. सैन्याबरोबर मोगलराजांच्याप्रमाणे कुटुंब कबिला नेण्याची परवानगी नव्हती. स्वराज्यात शोभेच्या, मोठेपणाच्या वास्तूंची निर्मिती केली जात नव्हती. भ्रष्टाचार करणाऱ्यांना कडक शासन दिले जात होते. त्यामुळे भ्रष्टाचारावर नियंत्रण होते. सरकारी तिजोरीतून योग्य ठिकाणी, योग्य पध्दतीने, अगदी काटकसरीने खर्च केला जात होता.

स्वराज्यात शेती विकासासाठी सरकार स्वतः खर्च करीत होते. नवीन जमीन लागवडीखाली आणणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी आर्थिक मदत करणे, बिनव्याजी कर्ज देणे अशा शेतीविषयक धोरणांमुळे शेतीचा विकास झाला. भारतातील इतर परदेश व प्रातांशी व्यापारी संबंध निर्माण केले गेले. त्यामुळे लोकांना वस्तू मिळत होत्या, त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकल्या

जात होत्या. त्यातून योग्य व्यापार विषयक धोरण निर्माण झाले. शेतसारा आकारणी व कर आकारणी निश्चित, लवचिक आणि न्याय्य होती. त्यामुळे एकुण उत्पादकता वाढली. स्वराज्यात आर्थिक शोषण, पिळवणूक होत नव्हती. परिणामी विकासाचे वातावरण तयार झाले होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करत असतानाच जनतेला दुष्काळी परिस्थितीतून, विपन्नावस्थेतून बाहेर काढले. शेतीचा, व्यापाराचा विकास झाल्यामुळे जनतेची व राज्याची आर्थिक स्थिती सुधारली, आर्थिक स्थैर्य आले. सर्वांगीण विकास साध्य करणारी स्वराज्यातील अर्थनिती आदर्श होती.

## संदर्भ सूची :


१) भट भा. वा. (२०१०), *शिवाजीची राजनिती* ई. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

२) देशपांडे प्र. न. (२०१०), *छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे* ई. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

३) देशपांडे प्र. न. (२००२), *मराठ्यांच्या इतिहासाची साधने* (खंड दुसरा), ई. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

४) कुलकर्णी अ. रा. (२००४) *शिवकालीन महाराष्ट्र* प्रकरण १,२,३,५,६,७, राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

५) कुलकर्णी अ. रा. (२०१२) *अशी होती शिवशाही* राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

६) खरे ग. ह. आणि कुलकर्णी अ. रा. (२०१०) *मराठ्यांचा इतिहास* (खंड पहिला), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

७) मेहंदळे गजानन भास्कर (२००८), *श्री राजा शिवछत्रपती* (भाग-२), डायमंड बुक डेपो, पुणे ३०, परिशिष्ट ७.

# बेकारीचे साहित्यातील संदर्भ : एक चिकित्सा

तेजस्विनी बी. मुडेकर, कोल्हापूर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कमला कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९६०४३४३४००

मानवाचा आर्थिक व्यवहार हा मानवी प्रवृत्तीवर अवलंबून असतो आणि साहित्यातून मानवी प्रवृत्ती, मानवाच्या अंतर्मनातील भावभावना प्रदर्शित केल्या जातात. समाजात घडणाऱ्या घटना, परिस्थितीतील बदल हे मानवाच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणतात आणि असे बदल साहित्यातून टिपले जातात. मानवाचे आर्थिक जीवन हे साहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसते. मानवाचे दारिद्र्य, भांडवलशाहीचे दुष्परिणाम, श्रमिकांची पिळवणूक, बेकारी, औद्योगिकरणाचे पर्यावरणीय व इतर दुष्परिणाम यासारख्या आर्थिक बाबींचे प्रतिबिंब साहित्यातून आढळते.

## साहित्याची समाजसापेक्षता:

अर्थकारण, समाजकारण व राजकारण हे साहित्याचे विषय ठरतात. साहित्य हे समाज सापेक्ष असते. साम्यवादी जीवन दर्शनाचे प्रणेते कार्लमार्क्स व फ्रेडरिक एंगल्स यांनी साहित्याचा स्वतंत्र व समाजनिरपेक्ष असा विचार केला नाही, कला निर्मितीच्या प्रक्रियेत अप्रत्यक्ष आणि समाजसापेक्ष विवेचन करताना मार्क्स-एंगल्स यांनी भौतिकवादाचा अवलंब केला. माणसांच्या जाणिवा त्यांची सामाजिक पद्धती निश्चित करीत नसून माणसांची सामाजिक पद्धती त्यांच्या जाणिवा निश्चित करते असे मार्क्सने सांगितले. एंगल्सने साहित्याचा इतिहास हा समाजाच्या इतिहासाशी म्हणजेच समाजाच्या आर्थिक विकासाशी संबंधित असतो हे फ्रान्स आणि जर्मनी यांच्या उदाहरणावरून दाखवून दिले. राजकारण, न्यायदान, तत्वज्ञान, धर्म, साहित्य आणि कला यांच्या विकासाचा पाया आर्थिक विकास हा आहे असे प्रतिपादन केले. वरील सर्व बाबी एकमेकांवर आणि क्वचित आर्थिक संबंधावर परिणाम करीत असल्याची शक्यता एंगल्सने मान्य केली. साहित्य हे अतिशय संवेदनक्षम मनाने घेतलेला सामाजिक जीवनातील व्यस्ततेचा, विसंगतीचा वेध असतो. ती काल्पनिक कलानिर्मिती नसते व

काल्पनिक समस्या मांडण्याची लेखकाची प्रवृत्ती नसते. सामाजिक जीवनात जे जसे आहे, ते तसे मार्मिकपणे दाखवून देण्याचा त्याचा प्रयत्न असतो असे मत रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले आहे. साहित्याचा प्रवास हा समाजाच्या प्रवाहाबरोबर सुरू असतो असा विचार आनंद यादव व्यक्त करतात. समाज जसा प्रवाही आहे, तसेच त्या समाजात निर्माण होणारे साहित्य हे ही प्रवाहीच असते.

### वाङ्मय प्रकाराची निवडः

वाङ्मयाच्या कथा, कविता, नाटक, कादंबरी या चार ठळक प्रकारांपैकी अभ्यासासाठी 'कादंबरी' हा प्रकार निवडला आहे. कादंबरी हा प्रकार निवडण्याचे कारण म्हणजे ती अधिक विस्तृत असते. कादंबरीत व्यक्तीचा वर्तमान-भूतकाल चित्रित करताना, कालसंबंध घडामोडींच्या अनेकविध आयामांचा आधार घेतला जातो.

घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादी घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय, व्यामिश्र रूपांचे दर्शन कादंबरीला घडविता येते. त्यासाठी सामान्यतः स्थलकालाच्या व्यापक पटाचा उपयोग केला जातो. म्हणूनच बेकारीचे संदर्भ शोधताना कादंबरी हा वाङ्मय प्रकार निवडला आहे.

### बेकारीचे कादंबरीतील संदर्भः

**मोसमी बेकारी-**

काही उद्योग अथवा व्यवसाय हे मोसमी स्वरूपाचे आहेत. या उद्योग अथवा व्यवसायांमधील उत्पादनकार्य हे विशिष्ट मोसमापुरते चालते व तो मोसम संपल्यावर ते बंद पडते अशावेळी उत्पादनकार्य बंद पडून निर्माण होणाऱ्या बेकारीला मोसमी बेकारी असे म्हणतात.

उध्दव शेळके यांनी आपल्या 'धग' कादंबरीत कादंबरीची नायिका 'कौतिक' हिची रोजगार मिळविण्यासाठी व उत्पन्न प्राप्तीसाठी आयुष्यभर चाललेली धडपड चित्रित केली आहे. ग्रामीण भागात हंगामाच्या काळात शेतमजुरांची मागणी वाढते व हंगाम संपताच त्या शेतमजुरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळते, याचे वर्णन या कादंबरीत आढळते.

लक्ष्मण माने यांचे आत्मकथन 'उपरा' मध्ये पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या 'कैकाडी' जमातीचे दुःख समाजासमोर मांडले आहे. आपला जीवनचरितार्थ चालविण्यासाठी टोपल्या विणण्याबरोबरच मिळेल ते काम हे लोक स्वीकारतात. अनेक वेळेस त्यांना कामाविना राहावे लागते याचा उल्लेख कादंबरीत आढळतो.

**घर्षणात्मक बेकारी-**

अर्थव्यवस्थेतील सर्वच रोजगार शोधणाऱ्या व्यक्तींना काम सापडेल असे नाही व सर्वच मालकांना (काम देणाऱ्या व्यक्तींना) कामगार मिळतील असे नाही, त्यामुळे अर्थव्यवस्थेत एक ठराविक अशी घर्षणात्मक बेरोजगारी असतेच.

मराठे ह. मो. यांच्या 'निष्पर्णवृक्षावर भर दुपारी' कादंबरीत शहरी भागातील बेकारीच्या समस्येचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. एक काम सुटल्यानंतर दुसरी नोकरी मिळेपर्यंतची जी बेकारीची भयावह अवस्था आहे ती या कादंबरीत वर्णन केली आहे. अर्थशास्त्रीय भाषेत ही घर्षणात्मक बेकारी असून, ती अनैच्छिक व दृश्य स्वरूपाची असते.

दळवी जयवंत यांनी आपल्या 'बाजार'

या कादंबरीत कोकणातून रोजगाराच्या शोधार्थ मुंबईत आलेल्या तरुणाची रोजगार मिळविण्यासाठी केलेली धडपड चितारली आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात कारखानदारांना कामगारवर्ग हवा असतो. मात्र या मागणी व पुरवठ्यात संतुलन न झाल्याने जी घर्षणात्मक बेकारी अर्थव्यवस्थेत निर्माण होते तिचा उल्लेख या कादंबरीत आढळतो.

पेंढारकर प्रभाकर यांनी 'अरे संसार संसार' या कादंबरीत 'सुधा' ही नायिका व तिच्या पतीची बेकारीची अवस्था वर्णन केली आहे. एक नोकरी सुटल्यानंतर दुसरी नोकरी सहजासहजी मिळणं कठीण आहे. मुंबई मधील हे बेकारी संबंधीचे वास्तव या कादंबरीत चित्रित केले आहे.

**चक्रीय बेकारी-**

विशिष्ट वेतनदर व विशिष्ट कामगारांच्या उत्पादकतेचा विचार करता, वस्तू व सेवांसाठी असलेली मागणी ही जितके लोक कामाच्या शोधात आहेत, तितका रोजगार निर्माण करण्याकरता अपुरी पडते, अशावेळी चक्रीय बेकारी निर्माण होते.

पाध्ये भाऊ यांनी 'डोंबाऱ्याचा खेळ' या कादंबरीत चक्रीय बेकारीचा उल्लेख केला आहे. अनेक वेळेस कारखान्याचे मॅनेजर मंदीचा फायदा घेऊन कामगार कपातीचा संधी साधूपणाही करतात. मंदीची लाट एक उद्योगातून दुसऱ्या उद्योगात पसरत जाते. तसतशी बेकारीची लाटही एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात पसरत जाते. त्यामुळे दुसरीकडे काम मिळणे मुश्किल असते. या प्रकारे चक्रीय बेकारीचे वर्णन त्यांनी केले आहे.

**ऐच्छिक बेकारी-**

स्वत:च्या इच्छेमुळे काम किंवा रोजगार सोडून देणाऱ्या व्यक्तीच्या अवस्थेला ऐच्छिक बेकारी असे म्हणतात. ऐच्छिक बेकारी व्यक्तिगत कारणामुळे अथवा व्यक्तिगत निर्णयामुळे निर्माण होते.

कर्णिक मधू मंगेश यांनी 'माहिमची खाडी' या कादंबरीत मुंबईसारख्या महानगरीत रोजगाराचे असणारे अस्थैर्य तसेच बेकारीचे जे अस्तित्व आढळते त्याचे वर्णन केले आहे. मुंबईतील झोपडपट्टीत अनेक तरुण मुले कोणतेही काम न करता हिंडत असतात. कादंबरीतील 'भिक्या' हे पात्र असेच ऐच्छिक बेकार असल्याचे दिसते.

**अयोग्य शिक्षण व्यवस्थेने निर्माण झालेली बेकारी-**

प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेत रोजगार प्राप्तीसाठी ज्या शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता आहे. असे शैक्षणिक पात्रता असणारे कामगार कमी प्रमाणात असतील व ज्या शिक्षणाने प्रत्यक्ष रोजगार प्राप्ती होणार नाही, असे शिक्षण अधिक व्यक्तींकडून घेतले जात असेल तर बेकारीचे अस्तित्व दिसून येते.

मराठे ह. मो. यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत अशा प्रकारच्या सुशिक्षित बेकारीचा उल्लेख आढळतो. एखाद्या ग्रॅज्युएट व्यक्तीला नोकरीसाठी अशिक्षित व्यक्तीचेही पाय धरावे लागतात. एखाद्या सुशिक्षित बेरोजगार व्यक्तीने उत्पन्न मिळविण्यासाठी एखादी कमी प्रतिष्ठेची नोकरी स्वीकारायची ठरविल्यास रोजगार देणारी व्यक्ती विचार करते की, ही व्यक्ती सरकारी नोकरीच्या शोधात असेल व ती नोकरी मिळताच आपले काम सोडेल त्यामुळे अशा व्यक्तीला

कमी प्रतिष्ठेची नोकरी मिळविण्यातही अडचणी येतात.

माने लक्ष्मण यांनी 'उपरा' मध्ये लग्नाच्या बेडीत अडकल्यानंतर नोकरीच्या शोधात असतानाही नोकरी मिळत नाही. ही काही काळ भोगलेली बेकारीची व्यथा मांडली आहे. हे अनैच्छिक बेकारीचे उदाहरण आहे.

कर्णिक मधु मंगेश यांनी 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत ग्रामीण भागातून नोकरीच्या शोधार्थ मुंबईत आलेल्या दलित तरुणाची व्यथा मांडली आहे. एस.एस.सी. झालेल्या या तरुणाला वर्षभर हजार ठिकाणी अर्ज करूनही नोकरी लागलेली नाही. हे वास्तव मांडले आहे. तसेच संधिकाल मध्येही 'एस.के.' हे एक ध्येयवादी व्यक्तिमत्व एम.ए. झालेले, पण नोकरी नसल्याने शिकवण्या घेत आहे, असा उल्लेख आढळतो. याच कादंबरीत आणखी एक ठिकाणी पूर्वी कारकुनाच्या नोकऱ्या चटकन मिळत असत, पण आता तशा मिळत नाहीत असाही उल्लेख आढळतो.

अपंगत्वामुळे बेकारी-

कर्णिक मधु मंगेश यांच्या 'माहिमची खाडी' या कादंबरीत अपंगत्वामुळे आलेल्या बेकारीचा संदर्भ सापडतो. कारखान्यात काम करताना पाय तुटल्यामुळे बेकार झालेल्या पतीला, पत्नी काम करून पंधरा वर्ष सांभाळत आहे असा उल्लेख सापडतो.

दुष्काळामुळे निर्माण झालेली बेकारी-

मोरे दादासाहेब यांच्या 'दुष्काळ' या कादंबरीत शेतकरी दुष्काळामुळे जमीन पिकवू शकले नाहीत व त्यामुळे ग्रामीणभागात रोजगार उपलब्ध नाही काम मिळविण्यासाठी लोक हिंडत आहेत. 'अनसा' हे या कादंबरीतील गरीब स्त्री पात्र आहे तिला काम कुठेही न मिळाल्याने आता जगण्यासाठी गावात रहावे की न रहावे हा प्रश्न पडला आहे. असा संदर्भ या कादंबरीत आढळतो.

बेकारीच्या परिणामाचे संदर्भ:

अनैतिक व्यवसाय-

कर्णिक मधु मंगेश यांच्या 'माहिमच्या खाडी' या कादंबरीत 'शामूपेंटर' नावाचे पात्र पेंटिंगचे कायमस्वरूपी काम नसल्याने आपल्या पत्नीला वेश्या व्यवसाय करायला लावते, तर याच कादंबरीतील आणखी एक तरुण 'भिका' याला कोणताही व्यवसाय नसल्याने आपल्या बहिणीला वेश्या व्यवसाय करण्यासाठी गिऱ्हाईक शोधून देतो कोणत्याही स्वरूपाचे काम नसल्याने तरुण मुले समाजाला उपद्रव देणारी कामेही करतात याचा दाखलाही कादंबरीत दिला आहे.

क्रूरता, आत्मघात व खुनासंबंधी विचार-

मराठे ह. मो. यांनी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत नायकाची पत्नी गर्भवती असल्याने तिला नोकरी मिळण्यात अडचणी येत आहेत हे लक्षात येताच तिला फसवून गर्भ पडण्याचा क्रूरपणा बेकार असलेला पती करतो या उल्लेखाबरोबरच बेकारीने अगतिक होऊन आत्महत्या व पत्नीच्या खुनाचाही विचार बेकार व्यक्तीच्या मनात घर करू लागतो. म्हणजेच बेकारीची अवस्था व्यक्तीला कोणत्याही थरापर्यंत घेऊन जाते. बेकार व्यक्तीची विमनस्क स्थिती, खायला अन्न नाही, राहायला निवाराही नाही असे बेकारीचे तीव्र स्वरूप कादंबरीत प्रभावीपणे मांडले आहे.

दळवी जयवंत यांच्या 'बाजार' या कादंबरीत बेकार व्यक्तीची अन्नान्नदशा होते हे

स्पष्ट केले आहे. काम नाही अन्न नाही असा उल्लेख तेथे सापडतो. अशा प्रकारे बेकारीचे विविध आयाम कादंबरीकारांनी चितारले आहेत.

**निष्कर्ष:**

मराठीतील काही दिग्गज कादंबरीकारांनी बेकारी हा आर्थिक प्रश्न आपल्या कादंबऱ्यांमधून अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. या कादंबऱ्यांमधून मोसमी बेकारी, अनैच्छिक बेकारी, ऐच्छिक बेकारी, घर्षणात्मक बेकारी यांचे दाखले सापडतात. तसेच आजची शिक्षणव्यवस्था ज्या बेकारीस जबाबदार आहे अशा सुशिक्षित बेकारीचेही वर्णन कादंबरीकार करतात. बेकार व्यक्तीची विमनस्क स्थिती, अगतिकता यामुळे होणारा नैतिकतेचा ऱ्हास, वाढणारी क्रूरता, आत्मघाती प्रवृत्ती या बाबींचे अत्यंत प्रभावीपणे चित्रण करून या समस्येची गंभीरता समाजापर्यंत पोहोचविण्यात कादंबरीकारांना यश मिळाले आहे.

**संदर्भ सूची:**


१.जोग वि. स., १९८१, *मार्क्सवाद आणि मराठी साहित्य*, विजय प्रकाशन, नागपूर, पृ. २३,२५.

२.जाधव रा. ग. १९९६, *साहित्य आणि सामाजिक संदर्भ*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ७०,७१.

३.भागवत, रसाळ, पाडगावकर, तेंडुलकर, कीर्तने, १९८७, *साहित्य : अध्यापन आणि प्रकार*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. २५३.

४.यादव आनंद, २००१, *१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह*, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पृ. ३,४.

५.Keynes J. M., 1961, *The General Theory of Employment, Interest and Money,* 1961, Macmillan and Co. Ltd,. New York.

६.Campbell R. M. C., Connell, Stantey L. Brue, 1986, *Contemporary Labour Economics,* MC Graw - Hill Book Co., Singapore,pp.496.

७.Cartter, Marshall, 1967, *Labour Economics : wages, Employment and Trade Unionism,* Richard D. Ipwin, INC, Home Wood.

८.Gopal Krishna, 1986, *Special Dimensions of Unemployment and Under employment,* concept publishing company, New Delhi,pp.7,20.

९.*International Encyclopedia of the Social Sciences 5 and 6,* Reprint Edition, 1972, Edior David L. Sills, The Mac million company & free Press, New York, pp. 54.

१०.कर्णिक मधु मंगेश, १९६९, *माहिमची खाडी*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, पृ.५,३१.

११.कर्णिक मधु मंगेश, १९८२, *भाकरी आणि फूल*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, पृ.५७.

१२.कर्णिक मधु मंगेश, १९९९, *संधिकाल*, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पृ.१६,३४.

१३.दळवी जयवंत, १९९६, *बाजार*, मनोरमा प्रकाशन, मुंबई, पृ.३४,४४,४५.

१४.देशमुख प्रभाकर, १९८६, *श्रमाचे अर्थशास्त्र*, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.२८६.

१५.पेंढारकर प्रभाकर, १९८६, *असे संसार संसार*, मौज प्रकाशन, मुंबई, पृ.९४,९५.

१६.मराठे ह. मो., द्वि. आ. १९८३, *निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, पृ.४१,४२,४५,४९,६७,८४.

१७.माने लक्ष्मण, १९८०, *उपरा*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पृ.६१.

१८.मोरे दादासाहेब, १९८७, *दुष्काळ*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.५४,५७.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

ऑक्टोबर-डिसेंबर २०१४ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. **लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.**
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- **संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे:** कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# सी. रंगराजन समिती: दारिद्र्याचा अंदाज

**पांडुरंग मारोतराव कल्याणकर, फुलंब्री,**
अर्थशास्त्र विभाग, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ९५४५८९९४८४.
E-mail: pandurangkalyankar@gmail.com

देशाच्या आर्थिक धोरणाची आखणी करीत असतांना केवळ आर्थिक वृद्धीवरच भर न देता, विकासाची फळे समाजाच्या सर्व थरापर्यंत पोहचवणे गरजेचे ठरते. दुसऱ्या शब्दात विकास प्रक्रिया सर्वसमावेशक असावी लागते. या दृष्टीने दारिद्र्य निर्मूलन हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. एखाद्या देशाच्या विविध कालखंडातील दारिद्र्याच्या प्रमाणाची तसेच इतर देशांच्या दारिद्र्याच्या प्रमाणाशी तूलना करून; त्याआधारे त्या देशाची अर्थव्यवस्था कशारितीने कार्य करीत आहे, याचा अंदाज घेता येतो.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने दारिद्र्याचा अंदाज करण्यासाठी अनेक समित्या व अभ्यासगट नेमले. त्यात १९६२ मध्ये नियोजन मंडळाने नेमलेला कार्यदल, डॉ. वाय. के. आलघ यांच्या अध्यक्षतेखालील १९७७ चा विशेष कृतीदल (Task Force), डॉ. डी. टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ गट (१९८९) इत्यादींचा समावेश होतो. अगदी अलिकडील कालखंडात २००५ साली प्रो. सुरेश तेंडुलकर याच्या अध्यक्षतेखाली एका तज्ज्ञ गटाची नियुक्ती करण्यात आली. या तज्ज्ञ समितीने नोव्हेंबर २००९ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. जानेवारी २०११ मध्ये सरकारने त्यांच्या शिफारशी स्विकारल्या. तेंडूलकर समितीने ठरवून दिलेल्या दारिद्र्य रेषेवरून व दारिद्र्याच्या प्रमाणावरून देशात बराच वादंग निर्माण झाला. त्यामुळे तेंडूलकर समितीच्या शिफारशी स्विकारल्या पासून केवळ दिड वर्षाच्या आत, पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार समितीचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली दारिद्र्याच्या मोजमापाच्या पद्धतीचा आढावा (Re-

view The Methodology for Measurement of Poverty)घेण्यासाठी या पाच सदस्यीय तज्ज्ञ गटाची नेमणूक केली. या समितीने १ जुलै २०१४ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला.

संबंधित लेखात सी. रंगराजन समितीच्या दारिद्र्यरेषेची चर्चा करण्यात आली असून, समितीचा दारिद्र्याचा अंदाज तेंडूलकर समितीपेक्षा भिन्न कसा आहे? दारिद्र्याच्या प्रमाणाबाबत ग्रामीण व शहरी भागात कशी तफावत आहे? दारिद्र्य रेषेच्या प्रमाणाबाबत कशी तफावत आहे? याचा शोध घेण्यात आला आहे.

दारिद्र्य रेषेची निश्चिती:

व्यक्तीच्या प्राधान्याने कुटुंबाच्या उपभोग खर्चाची अशी न्यूनतम निश्चित पातळी, की जी उपभोग खर्चाची पातळी गाठण्यास यशस्वी न ठरलेल्या कुटुंबास दरिद्री समजावे. या न्यूनतम खर्चात खाद्यपदार्थ व खाद्यपदार्थेत्तर उपभोगावर केलेल्या खर्चाचा समावेश करण्यात आला.

या समितीने दारिद्र्य रेषा निश्चित करताना मानवाच्या उष्मांक, प्रथिने, चरबिची सरासरी गरज विचारात घेतली आहे. ग्रामीण भागातील व्यक्तीसाठी दरडोई २१५५ उष्मांक तर शहरी भागातील व्यक्तीसाठी २०९० उष्मांकाची गरज असते. यामध्ये अधिक किंवा उणे १०% चा बदल असला तरी आरोग्य व कामावर वाईट परिणाम होत नाही.

अन्नउर्जेत प्रथिने व चरबी यांची ही गरज असते. ग्रामीण भागात दरडोई दरदिवशी अनुक्रमे ४८ व २८ ग्रॅम तर शहरी भागात अनुक्रमे ५० व २६ ग्रॅम प्रथिन व चरबीची आवश्यकता असते.

अन्न उर्जेच्या तिन्ही घटकांसाठी ग्रामीण भागात दरडोई दरमहा ५५४ रुपये तर शहरी भागात ६५६ रुपये खर्च येतो.

या समितीने दारिद्र्य रेषेच्या निश्चितीसाठी पुरेशा पौष्टिक आहाराबरोबरच कपडे, घरभाडे, प्रवासखर्च, शिक्षण, तसेच अन्य खाद्यपदार्थेत्तर खर्चाचा समावेश केला. शिक्षण, घरभाडे, प्रवास आणि कपडे यासाठी ग्रामीण भागात दरडोई दरमहा १४१ रुपये तर शहरी भागात ४०७ रुपये खर्च येतो. तर अन्य खाद्यपदार्थेत्तर खर्चासाठी अनुक्रमे २७७ व ३४४ रुपये खर्च येतो.

खाद्यपदार्थ व खाद्यपदार्थेत्तर, उपभोग खर्चाच्या आधारे नवीन दारिद्र्य रेषा निश्चित करण्यात आली. ती नुसार २०११-२०१२ या वर्षी ग्रामीण भागात दरडोई दरमहा ९७२ रुपये तर शहरी भागात १४०७ रुपये उपभोग खर्च येतो. पाच सदस्यांच्या कुटुंबासाठी ग्रामीण भागात ४८६० रुपये तर शहरी भागात ७०३५ रुपये उपभोग खर्च येतो.

ग्रामीण व शहरी भागातील जी व्यक्ती किंवा कुटूंब वर ठरवून दिलेल्या पातळीपर्यंत उपभोग खर्च करू शकत नाही. त्या व्यक्ती किंवा कुटुंबास दारिद्र्यरेषे खालील समजण्यात यावे.

दारिद्र्य रेषा टोपली: (Poverty Line Baskets):

सर्वच अभ्यास गटाप्रमाणे रंगराजन तज्ज्ञगटानेही दारिद्र्य रेषा निश्चित करण्यासाठी कुटुंबाच्या उत्पन्नाऐवजी उपभोग खर्चाचा आधार घेतला. कुटुंबाच्या उपभोग खर्चातून न्यूनतम राहणीमानाचा दर्जा राखला गेला पाहिजेत. न्यूनतम राहणीमानाचा दर्जा ठरवण्यासाठी देश पातळीवर एक वस्तू टोपली निश्चित करण्यात आली. शहरी

भागातील राहणीमानाचा दर्जा ग्रामीण भागातील राहणीमानाच्या दर्जापेक्षा चांगला असल्याने, दोन्ही भागांसाठी स्वतंत्र दारिद्र्यरेषा टोपली तयार करण्यात आल्या.

तज्ज्ञगटाने लोकांचे पुरेसे पोषण व्हावे या दृष्टीने खाद्यपदार्थांचा समावेश केला. तसेच काही आवश्यक खाद्यपदार्थेत्तर उपभोग खर्चाचा समावेश केला.

दारिद्र्य रेषा टोपलीतील खाद्यपदार्थात दहा प्रकारच्या खाद्यपदार्थांचा समावेश करण्यात आला. ज्यात १) अन्नधान्य २) दाळी व दाळीचे पदार्थ ३) दुध व दुग्धजन्य पदार्थ ४) मीठ व साखर ५) खाद्य तेल ६) अंडी, मासे आणि मांस ७) भाजीपाला ८) फळे ९) मसाल्याचे पदार्थ १०) इतर खाद्यपदार्थ तर एकूण खाद्यपदार्थेत्तर वस्तूंत दहा प्रकारच्या वस्तुंचा समावेश केला. ज्यात ११) पान, तंबाखू व मादक पदार्थ १२) इंधन व विज १३) औषधी १४) प्रवास १५) घरभाडे १६) कपडे व बिछान्याचे कपडे १७) पादत्राणे १८) शिक्षण १९) टिकाऊ वस्तू २०) अन्य खाद्यपदार्थेत्तर वस्तू इत्यादिंचा समावेश केला.

ग्रामीण भागात खाद्यपदार्थांवर होणारा खर्च (५७%) खाद्यपदार्थेत्तर वस्तूंवर होणाऱ्या खर्चापेक्षा (४३%) अधिक होता. ग्रामीण भागात खाद्य पदार्थांमध्ये अन्नधान्य(१४.६%), भाजीपाला (८.४%), दुध व दुग्धजन्य पदार्थ (६.३%) यावर अधिक खर्च केला जातो. खाद्य पदार्थेत्तर वस्तूत इंधन आणि विज (९.७%), कपडे व बिछान्याचे कपडे (७.८%), औषधी (४.५%) यावर अधिक प्रमाणात खर्च केला जातो.

शहरी भागात खाद्यपदार्थेत्तर वस्तूंवर (५३.०%) खाद्य पदार्थांच्या (४६.७%) तुलनेत अधिक खर्च केला जातो. शहरी भागात खाद्यपदार्थेत्तर खर्चात कपडे व बिछान्याचे कपडे (८.३%), शिक्षण (८.१%), इंधन व विज (७.९%), प्रवास (७.३%) यावर अधिक प्रमाणात खर्च केला जातो. तर खाद्यपदार्थांवरील खर्चात अन्नधान्य (१०.३%), दुध व दुग्धजन्य पदार्थ (६.४%), भाजीपाला (६.०%) यावर अधिक खर्च केला जातो.

सी. रंगराजन समितीने दारिद्र्य रेषा निश्चित करण्यासाठी उपभोग खर्चाचे आकडे वापरत असताना राष्ट्रीय नमूना पाहणी संस्थेकडे आधार वर्षाच्या धर्तीवर उपलब्ध असलेल्या तीन अंदाजापैकी सुधारित मिश्र आधार कालावधीच्या (Modified Mixed Recall Period) आधारे गोळा केलेल्या उपभोग खर्चाच्या आकडेवारीचा वापर केला. ज्यात आकडेवारी गोळा करीत असताना

१) कपडे, पादत्राणे, शिक्षण, संस्थात्मक आरोग्य तपासणी आणि टिकाऊ वस्तू यासाठी ३६५ दिवसांची.

२) खाद्य तेल, अंडी, मासे आणि मांस, भाजीपाला, फळे, मसाल्याचे पदार्थ, पेय, अल्पोपहार, प्रक्रिया केलेले पदार्थ, पान, तंबाखू आणि मादक पदार्थ यासाठी ७ दिवस.

३) उर्वरित खाद्यपदार्थ, इंधन आणि विज, किरकोळ वस्तू व सेवा,गैर संख्यात्मक औषध उपचार, घरभाडे आणि कर यासाठी ३० दिवसांचा आधार धरून आकडेवारी गोळा केले जाते.

तक्ता क्र. १ : निवडक राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण २०११ - २०१२

| अ. क्र. | राज्य | ग्रामीण दारिद्र्य (% प्रमाणात) | शहरी दारिद्र्य (%प्रमाणात) | एकूण दारिद्र्य (%प्रमाणात) | दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंध्र प्रदेश | १२.७ | १५.६ | १३.७ | ११७.३ |
| २ | आसाम | ४२.० | ३४.२ | ४०.९ | १२९.५ |
| ३ | बिहार | ४०.१ | ५०.८ | ४१.३ | ४३८.१ |
| ४ | छत्तीसगड | ४९.२ | ४३.७ | ४७.९ | १२४.८ |
| ५ | दिल्ली | ११.९ | १५.७ | १५.६ | २६.७ |
| ६ | गोवा | १.४ | ९.१ | ६.३ | ०.९ |
| ७ | गुजरात | ३१.४ | २२.२ | २७.४ | १६८.८ |
| ८ | झारखंड | ४५.९ | ३१.३ | ४२.४ | १४२.५ |
| ९ | कर्नाटक | १९.८ | २५.१ | २१.९ | १३५.७ |
| १० | केरळ | ७.३ | १५.३ | ११.३ | ३८.३ |
| ११ | मध्य प्रदेश | ४५.२ | ४२.१ | ४४.३ | ३२७.८ |
| १२ | महाराष्ट्र | २२.५ | १७.० | २०.० | २२८.३ |
| १३ | मणिपूर | ३४.९ | ७३.४ | ४६.७ | १२.९ |
| १४ | ओरिसा | ४७.८ | ३६.३ | ४५.९ | १९५.० |
| १५ | पंजाब | ७.४ | १७.६ | ११.३ | ३१.६ |
| १६ | राजस्थान | २१.४ | २२.५ | २१.७ | १५१.५ |
| १७ | तामिळनाडू | २४.३ | २०.३ | २२.४ | १६३.९ |
| १८ | उत्तर प्रदेश | ३८.१ | ४५.७ | ३९.८ | ८०९.१ |
| १९ | प. बंगाल | ३०.१ | २९.० | २९.७ | २७५.४ |
| | एकूण भारत | ३०.९ | २६.४ | २९.५ | ३६२९.९ |

Source :- Report of The Expert Group to Review The Methodology for Measurement of Poverty, Government of India, Planning Commission, June, 2014, p.66.

## राज्यनिहाय दारिद्र्याची स्थिती:

रंगराजन गटाच्या अंदाजानुसार २०११-१२ या वर्षी देशात ३६.२९ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. देशाच्या एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाण २९.५ टक्के होते. या वर्षी देशात संख्येच्या दृष्टीने उत्तर प्रदेश (८.०९ कोटी), बिहार (४.३८ कोटी), मध्य प्रदेश (३.२७ कोटी) या राज्यात सर्वाधिक दारिद्र्य रेषेखालील लोक राहत होते.

दारिद्र्याच्या प्रमाणाच्या बाबतीत विचार करता २०११-१२ या वर्षी समितीच्या अंदाजानुसार सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण छत्तीसगड (४७.९%), मणिपूर (४६.७%), ओरिसा (४५.९%), मध्य प्रदेश(४४.३%), झारखंड (४२.४%) या राज्यात दिसून आले. तर सर्वात कमी दारिद्र्याचे प्रमाण अंदमान निकोबार द्विपसमूह (६.०%), गोवा (६.३%), लक्षद्विप(६.५%), पॉण्डेचेरी(७.७%), हिमाचल प्रदेश (१०.९%), पंजाब (११.३%), केरळ (११.३%) या केंद्रशासित प्रदेश व राज्यात दिसून आले.

## शहरी व ग्रामीण दारिद्र्य:

तक्ता क्रमांक ०१ मध्ये काही प्रमुख राज्यांतील शहरी व ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण दर्शविले आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याचा विचार करता छत्तीसगड, ओरिसा,झारखंड, मध्य प्रदेश, आसाम, बिहार या राज्यांतील ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे. तर गोवा, केरळ, पंजाब या राज्यात ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण ८% पेक्षा कमी होते.

शहरी भागातील दारिद्र्याच्या प्रमाणाचा विचार करता मणिपूर या राज्यातील शहरी दारिद्र्याचे प्रमाण(७३.४%) सर्वाधिक होते. बिहार, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, मध्य प्रदेश या राज्यातील ४०% पेक्षा अधिक शहरी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. गोवा, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब या राज्यात शहरी दारिद्र्याचे प्रमाण २०% पेक्षा कमी होते.

देशपातळीवर शहरी भागातील दारिद्र्याच्या प्रमाणापेक्षा ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण अधिक असले तरी मणिपूर, बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, पंजाब, केरळ, दिल्ली, आंध्र प्रदेश, राजस्थान इत्यादी राज्यात ग्रामीण दारिद्र्याच्या प्रमाणापेक्षा शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण अधिक होते.

ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागात होत असलेले स्थलांतर व त्यांना शहरी राहणीमानाची न्यूनतम पातळी गाठण्यात येत असलेल्या अपयशामुळे ही स्थिती निर्माण झालेली आहे.

## तेंडूलकर समितीपेक्षा वेगळेपण:

१) तेंडूलकर समितीने ग्रामीण व शहरी दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी आधार म्हणून दारिद्र्य रेषेच्या एकाच शहरी टोपलीचा आधार घेतला होता. परंतु सी. रंगराजन समितीने ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण ठरवण्यासाठी स्वतंत्र दारिद्र्य रेषा टोपलीचा वापर केला.

२) तेंडूलकर समितीने दारिद्र्य रेषा निश्चित करतांना उष्मांकाचा आधार घेतला नव्हता. सरकारने अलिकडील काळात आपले धोरण व कार्यक्रमातून बालकांचे पोषण व सार्वजनिक आरोग्याच्या स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी विविध वस्तू व सेवा पुरवल्या, अलिकडील काळातील संशोधनातील निष्कर्षही उष्मांकाला आधार देतात. त्यामुळे रंगराजन समितीने दारिद्र्य रेषा टोपली

निश्चित करताना उष्मांकाचा आधार घेतला.

३) तेंडूलकर समितिने उपभोग खर्चाची आकडेवारी गोळा करण्यासाठी मिश्र आधार वर्ष उपभोग खर्च आकडेवारीचा तर रंगराजन समितीने सुधारित मिश्र आधार वर्ष आकडेवारीचा आधार घेतला.

४) तेंडूलकर समितीने २००४-०५, २००९-१० व २०११-१२ या तीन वर्षासाठी दारिद्र्य रेषा निश्चित करून दारिद्र्याचे प्रमाण काढले तर रंगराजन समितीने २००९-१० व २०११-१२ या दोन वर्षासाठीच दारिद्र्याचा अंदाज केला.

५) तेंडूलकर समितिने २००९-१० या वर्षासाठी ग्रामीण व शहरी भागात दरडोई दरमहा ६७३ रुपये व ८६० रुपये दारिद्र्य रेषा निश्चित केली. तर २०११-१२ या वर्षी वाढ करून ती अनुक्रमे ८१६ व १००० रुपये केली. यावरून २०११-२०१२ वर्षी दरडोई दरदिवशी ग्रामीण भागात २७ रुपये तर शहरी भागात ३३ रुपये उपभोगावर खर्च न करू शकलेला व्यक्ती दरिद्री समजण्यात यावा, असे समितीचे मत होते. रंगराजन समितीने २००९-१० या वर्षी ग्रामीण व शहरी भागासाठी अनुक्रमे ८०१ व ११९८ रुपये तर २०११-२०१२ या वर्षासाठी ९७२ व १४०७ रुपये दारिद्र्य रेषा निश्चित केली. यावरून दरडोई दरदिवशी न्यूनतम उपभोग खर्च ग्रामीण भागात ३२ रुपये तर शहरी भागात ४७ रुपये करणे या समितीला अपेक्षित होते. रंगराजन समितीने निर्धारित केलेली दारिद्र्य रेषा तेंडूलकर समितीपेक्षा अधिक व्यापक आहे. तेंडूलकर तज्ज्ञ गटाच्या अंदाजानुसार २००९-१० या वर्षी देशात ३५.४७ कोटी तर २०११-१२ मध्ये २६.९८ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होते. तर रंगराजन यांच्या अंदाजानुसार संबंधित वर्षात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या अनुक्रमे ४५.४६ कोटी व ३६.३० कोटी होती.

तेंडूलकर तज्ज्ञ गटानुसार २००९-१० या वर्षी दारिद्र्याचे प्रमाण २९.८ टक्के होते, त्यात घट होऊन ते २०११-१२ या वर्षी २१.९ टक्के

**तक्ता क्र. २ : रंगराजन व तेंडूलकर तज्ज्ञ गटांचे दारिद्र्याचे अंदाज**

| वर्ष | दारिद्र्याचे प्रमाण | | | दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या (दशलक्षात) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| | तज्ज्ञगट (रंगराजन) | | | | | |
| २००९-१० | ३९.६ | ३५.१ | ३८.२ | ३२५.९ | १२८.७ | ४५४.६ |
| २०११-१२ | ३०.९ | २६.४ | २९.५ | २६०.५ | १०२.५ | ३६३.० |
| | तज्ज्ञगट (तेंडूलकर) | | | | | |
| २००९-१० | ३३.८ | २०.९ | २९.८ | २७८.२ | ७६.५ | ३५४.७ |
| २०११-१२ | २५.७ | १३.७ | २१.९ | २१६.७ | ५३.१ | २६९.८ |

Source :- Report of The Expert Group to Review The Methodology for Measurement of Poverty, Government of India, Planning Commission, June, 2014, p.69.

झाले. तर रंगराजन तज्ज्ञ गटानुसार संबंधित वर्षासाठी हेच प्रमाण अनुक्रमे ३८.२ व २९.५ टक्के होते. दोन्ही समित्यांनी काढलेल्या दारिद्र्याच्या प्रमाणाची तुलना करता, रंगराजन समितीने काढलेले दारिद्र्याचे प्रमाण तेंडूलकर समितीने काढलेल्या दारिद्र्याच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. देशपातळीवरील एकूण दारिद्र्याच्या प्रमाणाचा विचार करता रंगराजन समितीने काढलेले देशपातळीवरील दारिद्र्याचे प्रमाण तेंडूलकर समितीच्या तुलनेत २००९-१० या वर्षी ८.४ टक्क्यांनी तर २०११-१२ या वर्षी ७.६ टक्के अधिक होते.

**टिकात्मक परीक्षण:**

१) रंगराजन समितीने उष्मांकाचा आधार घेऊन दारिद्र्य रेषा निश्चित केली. परंतु १९७३ मध्ये उष्मांक तज्ज्ञ पी.व्ही. सुखमते यांनी उष्मांकाची पद्धत चुकीची असून ती नष्ट करण्याचे सूचवले. सुखमते यांच्या मते प्रत्येक व्यक्तिच्या शरिरातील चयापचयक्रियेत असलेल्या भिन्नतेमुळे प्रत्येकाची उष्मांकाची गरज भिन्न असते. त्यामुळे उष्मांक सेवनाच्या आधारे पोषणाचा अंदाज काढणे चुकीचे ठरते.

२) आपल्या राजकीय हितासाठी भारत हे दरिद्री राष्ट्र आहे, ही संकल्पना लोकांच्या मनात कायम करण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य या चूकीच्या संकल्पनेचा आधार घेऊन सार्व. वितरण व्यवस्था, रो.ह.योजना या दुष्काळ व अवर्षणाच्या स्थितीत सुरू केलेल्या योजना कायम केल्या जातात.

३) केवळ उपभोग खर्चाच्या आधारे दरिद्री कोण हे निश्चित करण्यापेक्षा, बऱ्याच वेळेस एखाद्या भूभागाचा किंवा समुदायाचा दरडोई उपभोग खर्च जास्त असूनही त्यास एखाद्या आवश्यक वस्तूच्या उपलब्धतेपासून वंचित रहावे लागते. जसे स्वच्छ पिण्याचे पाणी, शुद्ध हवा, विजेची उपलब्धता तेव्हा त्या त्या वस्तूंच्या उपलब्धते बाबतीत तो समूह दरिद्री समजण्यात यावा.

४) दारिद्र्य रेषा देशपातळीवर व राज्यपातळीवर निश्चित करून त्या आधारे एकूण देशातील व राज्याराज्यांतील दारिद्र्याचे प्रमाण निश्चित करून, दारिद्र्य निर्मूलनासाठी सरसकट उपाययोजना आखण्यापेक्षा; अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन नेमका दरिद्री कोण हे ठरवले पाहिजे. जसे गावपातळीवर जाऊन त्या गावातील नेमके दरिद्री कोण व किती हे निश्चित करावे. तसेच शहर पातळीवर प्रत्येक गल्लीतील नेमके दरिद्री कोण व किती हे निश्चित करून त्यांच्या उथ्थानासाठी उपाय योजना आखणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**


1) Bhalla Surjit S., 1960, *Thinking on Poverty, Only in India*, The Indian Express, July 18, 2014, pp.11,

2) Planning Commission, Govt. of India, *Report of The Expert Group to Review Methodology for Measurement of Poverty*, June 2014, pp 1 to 5.

३) मालकर यमाजी, *वास्तवाशी फारकत घेणारे आकडे*, दै.दिव्य मराठी (औरंगाबाद आवृत्ती), दि. १७ जुलै, २०१४, पृ.६.

४) पाध्ये रमेश, *योजनांची भाकर......करपलेली*, दैनिक लोकसत्ता (औरंगाबाद आवृत्ती), दि. ८ जुलै, २०१४, पृ.७.

# जागतिकीकरणाचा विकसनशील अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**मृणालिनी तापस, नागपूर,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९९२१०२११८०

एकविसाव्या शतकात सर्वच क्षेत्रावर जागतिकीकरणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तंत्रज्ञानावर पर्यावरणविषयक आधाड्यांवर पडसाद उमट असताना दिसून येत आहे व त्याचा परिणाम थेट परकीय गुंतवणुकीत वाढ, तंत्रज्ञानाचा विकास, दूरसंचार, संगणक, व्यापारी क्षेत्रात उदारीकरण, आर्थिक व बँकींग व्यवस्था नियंत्रणमुक्त होणे आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेली वाढ यावरून दिसून येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आर्थिक व सामाजिक विकासाचा वेग वाढला असला तरी त्याचा परिणाम हा आर्थिक विकासावर झालेला आहे. विकसनशील देशातील विकास जागतिकीकरणामुळे होतो यात एकवाक्यता नाही. जागतिकीकरणाची प्रक्रिया अटळ व विकसनशील आहे ही प्रक्रिया समृद्धी व वृद्धी आणणारी आहे. जागतिकीकरणामुळे चांगल्या नोकरीच्या संधी प्राप्त होउन अधिक चांगले जीवन जगता येईल. जगातील १४८ देशांनी विश्व व्यापार संघटनेचे सभासदत्व स्विकारून जागतिकीकरणाचा अंगीकार केला. जागतिकीकरणाचा फायदा हा त्या देशाच्या विकासावर अवलंबून असतो.

## जागतिकीकरणाची संकल्पना:

जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला अर्थव्यवस्था खुली करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये विदेशी कंपन्यांना गुंतवणूक करण्यासाठी सवलत देणे. बहुउद्देशीय कंपन्यांचा आर्थिक व्यवहारांवरील बंधने आणि अडथळे दूर करणे, विदेशात संयुक्त व्यवहार करण्याला उत्तेजन देणे, आयातीवरील परिणामात्मक निर्बंध दूर करून, त्याऐवजी आयात शुल्क आकारणे, निर्यातीला उत्तेजन देण्याचा तसेच निर्यात वाढविण्याकरिता वित्तीय दरात समायोजन करणे इ. बाबींवर भर देणे होय.

## जागतिकीकरणाची प्रक्रिया:

जागतिकीकरणाची प्रक्रिया राष्ट्रीय उत्पन्नाच्या रचनेवर अवलंबून असते. राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा म्हणजे शेती, खाण वस्तू, खनिजांपासून मिळणारे उत्पन्न अधिक असेल व त्यातही पारंपरिक तंत्राचाच वापर अधिक होत असेल तर जागतिकीकरणामुळे तोटा अधिक होईल व हे क्षेत्र तंत्रप्रगत असेल तर जागतिकीकरणाची प्रक्रिया फलदायी ठरेल. देशाची राष्ट्रीय उत्पन्नाची रचना व आर्थिक विकासाचा स्तर या अंतर्गत रचनात्मक बाबींबरोबरच त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्थान व आंतरराष्ट्रीय व्यापारात वाटा याचाही प्रभाव जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून मिळणाऱ्या फायद्यावर अवलंबून असतो.

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धींगत होण्याला मदत मिळेल. मानवी साधनसंपत्ती जी कुशल गतिमान अशी श्रमशक्ती नवे तंत्र, वस्तू व सेवेच्या विकासाला आवश्यक असते. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही बाजारकेंद्रीत असल्याने मागणी व पुरवठा नियम उत्पादनात लागू ठरतो. जागतिकीकरणाची ही प्रक्रिया आर्थिक परिणामाबरोबरच राजकीय क्षेत्रातही मूलभूत बदल करणारी ठरेल. राजकीय दृष्ट्या ही प्रक्रिया विकसनशील देशांना त्रासदायक ठरेल. या देशांनी आर्थिक व राजकीय प्रश्नांची जाण ठेवून निर्णय घेण्याची क्षमता राजकीय नेतृत्वात असेल.

## जागतिकीकरण व विकसनशील राष्ट्रे:

जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रे हे विकसीत राष्ट्राच्या तुलनेत मागे पडतात. विकसित राष्ट्र हे विभिन्न देशातील अर्थव्यवस्थेत आपला पैसा मोठ्या प्रमाणात गुंतवितात व लाभ मिळवितात. ज्या देशातून लाभ मिळविला जातो त्या देशाची हानी होते. कारण त्या देशातील संपूर्णतः नैसर्गिक संपत्ती वापरुन उत्पादन घेतले जाते. विकसनशील देशातील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगारी प्राप्त होते. परंतु या देशातील अर्थव्यवस्थेपासून लाभ मिळवून स्वतःच्या देशाची नेत्रदीपक प्रगती साध्य केली आहे. या देशाला विकासाची आवश्यकता असते. देशातील संपूर्ण राज्यांचा विकास होणे अतिशय आवश्यक आहे. जागतिकीकरण झाले म्हणजे आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण होवून त्या स्पर्धेतून विकसनशील देश बाहेर जातात. जागतिकीकरणामुळे जे बदल होतात त्यामुळे विकसनशील देशाची अर्थव्यवस्था प्रगती करू शकेल की नाही हा मोठा गहन प्रश्न आहे. या देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सरकारी धोरण प्रभावी असणे आवश्यक आहे.

## विकसनशील देशाचा आर्थिक विकास:

या देशातील अर्थव्यवस्थेत विकास घडवून आणावयाचा असल्यास आधारभूत संरचना, उपक्रमशीलता, उत्पादन घटक, तंत्रज्ञान, उद्योजकता, मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार, अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक, प्रभावशील सरकारी धोरणे यांचा सविस्तर विचार होणे आवश्यक आहे. या प्रदेशातील सर्व राज्यांमध्ये समतोल विकास साधने अतिशय आवश्यक आहे. अन्यथा तिथे ही आर्थिक विषमता निर्माण होऊ शकते. वरील घटकांवर विशेष लक्ष दिल्यास उत्पादन व रोजगार ह्या दोन्ही बाबी प्राप्त होतील. उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्यास हा देश वस्तूंची निर्यात करू शकेल व त्यापासून प्रत्येक देशांशी आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करून तसेच विदेशी चलन प्राप्त करून विकसनशील देश आपली

अर्थव्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न करेल त्याचप्रमाणे रोजगार उपलब्ध झाल्यास विकसनशील देशातील लोकांचा उपभोग वाढेल व वस्तूची मागणी वाढेल त्याप्रमाणे उद्योगांची स्थापना करणे या देशाला भाग पडेल. जागतिकीकरणामुळे विकसनशील देशात जेव्हा परकीय गुंतवणूक केली जाते तेव्हा कमीत कमी किंवा वाजवी किंमतीत विदेशी उद्योजक ती वस्तू कमी लाभ घेऊन त्या वस्तूची विक्री करायला तयार असतात. त्यामुळे देशातील उद्योजकांना सुद्धा ती वस्तू त्याच दर्जाची व त्याच किंमतीला विकावी लागते. यात ग्राहकांचा फायदा होतो परंतु उद्योजकांना मोठ्या प्रमाणात स्पर्धेला व त्यांच्या समोरील आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे उपभोक्त्याच्या दृष्टीकोनातून ते जागतिकीकरण फायद्याचे वाटू लागते.

ब्राझील हा अमेरिका खंडातील दक्षिण अमेरिका भागातील सुसंस्कृत व निसर्गाचे वरदान लाभलेला देश असून जलसंपत्तीने समृद्ध आहे. या देशाचे क्षेत्रफळ भारताच्या जवळपास तिप्पट असून लोकसंख्या भारताच्या १/६ आहे. दरडोई उत्पन्नाबाबत या देशाने आघाडी घेतली आहे. या देशाचे दरडोई उत्पन्न भारताच्या सात पट आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत ब्राझील दुसऱ्या क्रमांकावर आहे. ब्राझीलमधील साक्षरतेचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ब्राझीलचा भूभाग ८५ लाख चौ. किलोमीटर असून लोकसंख्या १९ कोटी ८० लाख आहे. दरडोई उत्पन्न डॉलरमध्ये १०,४९९ एवढे व निर्यात १५,३०० कोटी डॉलर्सची आहे. विकास दराबाबत बोलायचे झाल्यास ब्राझीलचा विकासदर ५ टक्के आहे. ब्राझील हा देश पूर्णतः विकसीत झाला नाही. या देशांच्या मानाने भारत व चीनचा विकास चांगला झाला असून विकासाकडे नेण्यास गती देईल. ब्राझीलचा स्फितीदर ६.५२ टक्के असून बेकारी दर ५.४ टक्के आहे. औद्योगिक वृद्धीदर ८.८ टक्के आहे. श्रमबळ २१ टक्के असून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही ५९६२.८६ युएस मिलीयन डॉलर आहे, बाहेरील कर्ज ३,१८,८३७.६८ युएसडीमिलीयन डॉलर आहे. तसेच निर्यात २०,४६६.९१ युएसडीमिलीयन डॉलर असून व्यापारातील शोधन शेष २,३६४.४५ युएसडीमिलीयन डॉलर आहे. तसेच आयात १८,१०२.४६ युएसडीमिलीयन डॉलर असून खाजगी क्षेत्रातील कर्ज २६,३६,११९ युएसडीमिलीयन डॉलर इत्यादी आकडेवारी मे २०१४ ची आहे. १९९५ सालातील आकडेवारीशी तुलना करता प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक १५,३७४.३५ युएसडीमिलीयन डॉलर एवढी होती. आंतरराष्ट्रीय बँकांकडील कर्ज ३२,१७१२ युएसडीमिलीयन डॉलर असून सकल देशी उत्पत्तीचा दर १.८० टक्के होता. आयात २०,०३९.९२ युएसडीमिलीयन डॉलर असून निर्यात २६,१५८.५१ युएसडीमिलीयन डॉलर होती. खाजगी क्षेत्रातील कर्ज २६,३६,११९ युएसडीमिलीयन डॉलर होते. व्यापारातील शोधन शेष ५,६५९.३७ युएसडीमिलीयन डॉलर होते. १९९५ ची ही आकडेवारी २०१४ च्या आकडेवारीपेक्षा जास्त आहे.

ब्राझील हा देश पर्यटन, मत्स्यउद्योग व मध उत्पादनामध्ये फार प्रसिद्ध असून या उत्पादनाचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात फार मोठा हिस्सा आहे. सरासरी सकल उत्पत्तीचा देश हा १९५०-५९ मध्ये ७.९ असून २०१०-२०१३

या कालावधीत ३.४ एवढा आहे म्हणजे सकल देशी उत्पत्तीत घट झालेली दिसून येते.

**जागतिकीकरणाचे विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम:**

१. जागतिकीकरणानंतर १९९१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या प्रमाणात बदल होत गेला. व विकसनशील देशातील अर्थव्यवस्थेत बऱ्याच सुधारणा होत गेल्या.

२. जागतिकीकरणामुळे अप्रगत देशात देवाणघेवाण वाढून त्यांचा विकासावर परिणाम झाला.

३. देशातील अतिरिक्त उत्पादन विदेशी बाजारात विकता आल्याने विदेशी गंगाजळी मिळविता येऊन देशांतर्गत विकासासाठी भांडवल वापरता येऊलागले आहे.

४. जागतिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध झाल्याने विकसनशील देशाच्या उत्पादनवाढीला चालना मिळते. त्याचा परिणाम नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर होईल.

५. जागतिकीकरणाने एकमेकांवरील अवलंबन वाढल्याने त्याचा परिणाम पायाभूत सोयी सुविधांचा एकत्रित विकास होऊ लागला आहे.

**जागतिकीकरण व प्रशासन:**

जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रात वस्तु सेवा व तंत्रज्ञान नविन प्रक्रिया आणि अभिनव योजनेचा झपाट्याने झालेला प्रसार चकित करणारा आहे. मूल्यव्यवस्था, राज्यकारभार, शासकीय कामकाजाचे स्वरूप बदलत चालले आहे. सर्वच क्षेत्रात एकीकडे आर्थिक लाभ वाढत असताना दुसरीकडे आर्थिक संकटाची चाहूल लागली आहे. शासन व्यवस्थेची साधने दुर्बल होऊ लागली आहे. गरीब देशातील गरीबी आणखी वाढत चालली आहे.

जागतिक संस्थांकडून विकसनशील देशांवर टाकण्यात येणारा वाढता दबाव माहिती तंत्रज्ञानाचा झालेला विकास कार्यक्षमता आणि अर्थव्यवस्थेबाबत निर्माण झालेली विशेष जागरुकता या मुळे अनेक बदल घडत आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून विकसनशील देशांना मदत केली जाते. या देशाचे पाश्चिमात्य देशांवरील आर्थिक लष्करी, राजकीय, अवलंबित्व वाढत असून त्याचे प्रतिकूल परिणाम सद्याच्या काळात दिसू लागले आहे. विकसनशील देशातील लोकांनी स्वातंत्र्य गमावले असून स्वत:च्या देशाचे धोरण ठरविण्याची स्वायत्तता ही त्यांच्या हातात राहिलेली नाही.

जागतिकीकरणामुळे केन्द्रीय पद्धतीने नियोजन केलेल्या अर्थव्यवस्थांकडून बाजारपेठेवर आधारित जागतिक अर्थव्यवस्था जोडल्या गेलेल्या आहेत. त्याचा परिणाम प्रशासकीय चौकटीवर झालेला आहे. शासनाच्या भूमिकेकडे बघण्याचा बदललेला दृष्टीकोन सरकार बाजारपेठा आणि नागरी समाज यांच्यात निर्माण झालेली साहचार्याची गरज व प्रशासनाचे स्वरूप आणि प्रक्रिया यावर परिणाम झालेला आहे.

जागतिकीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्र संकुचित पावते आहे. सार्वजनिक प्रशासनाला कायद्यानुसार काम करणे, बंधनकारक आहे. सार्वजनिक हिताच्या गोष्टींना प्राधान्य देणे, समानतेची हमी देणे, सरकारचे प्रतिनिधी म्हणून काम करणे, नागरिकांना प्रोत्साहन देण्याचे उत्तरदायीत्व असते.

जागतिकीकरणामुळे विकसनशील देशातील प्रशासकीय विभागात सार्वजनिक खर्च आणि करपद्धती यामध्ये मोठ्या प्रमाणावर विकास होण्याची गरज आहे. आर्थिक स्थिती दीर्घ काळापर्यंत खालावत गेली. सामाजिक तसेच आर्थिक मंदीबरोबरच अकार्यक्षमता, निकृष्ट दर्जाची सार्वजनिक सेवाची परिणामकारकता त्यावर होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत फारच कमी आहे. या देशातील सार्वजनिक प्रशासनाच्या संस्था यंत्रणा आणि प्रक्रिया अयोग्य आणि कुचकामी आहेत असे दिसून येते.

### जागतिकीकरण व उद्योगधंदे:

बाजारपेठ अर्थव्यवस्थेचे कामकाज सूरळीत चालवावयाचे असेल तर शासकीय पातळीवर काही निर्णय घेणे आवश्यक असते. अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी अतिरिक्त सुविधा पुरविणे गरजेचे आहे. खाजगी व्यवसायिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक असते. तसेच सरकारला नागरिकांचे हित, खाजगी संस्था, सामाजिक कृती यांचा मेळ साधावा लागतो. तेव्हा या देशांचा विकास होतो व जागतिकीकरणाच्या परिणामांची तीव्रता कमी होते.

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा मोठा परिणाम झाला. उद्योगधंद्यांचे अस्तित्व प्रबळ झाल्याने सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग संकुचित होऊ लागला. अशा वेळी सरकारने शासन व्यवहारांच्या भूमिकेत खालील बाबींमध्ये बदल करणे गरजेचे आहे.

१. उद्योगांच्या विकासासाठी सशक्त कायदा व आर्थिक धोरणे ठरविणे.
२. पायाभूत सुविधा विकसित करणे.
३. खूले आणि स्पर्धात्मक आर्थिक वातावरण निर्माण करणे.
४. सार्वजनिक आणि खाजगी भागीदारीतून सुक्ष्म, लहान, मध्यम उद्योगांमध्ये निकोप स्पर्धा राहील यावर भर देणे व वाढीस प्रोत्साहन देणे.
५. न्यायपूर्ण करप्रणाली निर्माण करणे.
६. उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी भांडवल पुरवठा करणे.
७. विकसित व स्पर्धात्मक कामगार वर्गाच्या हिताचे संरक्षण करणे.

### रचनात्मक समायोजनाचा कार्यक्रम:

१९८०-९० या दोन दशकाच्या काळात भारतासहित अनेक देशांमध्ये रचनात्मक समायोजन आणि स्थिरीकरण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमात आर्थिक व वित्तीय धोरण, व्यापारी आणि आर्थिक उदारीकरण खासगीकरण देशी बाजारपेठा नियंत्रणमुक्त करणे आदींवर भर देण्यात आला. या धोरणात सरकारची भूमिका कमी करण्यात आली जेणेकरून सरकार आर्थिक हस्तक्षेप करणार नाही. परिपूर्ण आर्थिक धोरण, मालमत्ता अधिकारांचे संरक्षण शिक्षण जागतिकीकरणाची प्रक्रिया ही मुख्यत्वे सर्व प्रकारची बंधने दूर करून विदेशी वस्तू व सेवांच्या आयात निर्यातीला मुक्त परवाना देणे अशी असते. प्रत्येक देशाने भांडवल औद्योगिक वस्तू, शेतमाल सेवा यांच्या आयात निर्यातीवर वेगवेगळी बंधने लादलेली असतात. त्यामध्ये घट करणे अभिप्रेत असते. अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे नेत असताना जे बदल करावे लागतात त्यालाच रचनात्मक समायोजनांचा कार्यक्रम असे म्हणतात.

आयात करात कपात, इतर संस्थात्मक

नियंत्रणात्मक बंधने घटविणे, तंत्रहस्तांतरण मुक्तता उद्योगसंस्थांना मुक्तता, विनिमय दर मुक्तता, श्रम गतिशिलतेवर निर्बंध करणे इ. कार्यक्रमाचा अंतर्भाव केलेला आहे. हा कार्यक्रम ब्राझीलने राबविला असून या कार्यक्रमांचे फलित भारतासारख्या देशाला मदतकारक ठरू शकेल. याचे कारण ब्राझील व भारतात बऱ्याच गोष्टींबाबत साम्यता आढळून येते. दोन्ही देशात नैसर्गिक साधन-संपत्ती विपुल आहे. साधन संपत्तीच्या दृष्टीने श्रीमंत असलेले हे देश उत्पन्नाच्या दृष्टीने ब्राझील व भारत यांच्या दरडोई उत्पन्नापेक्षा पाचपट अधिक आहेत.

ब्राझीलमध्ये रचनात्मक समायोजनाचा परिणाम म्हणून उत्पन्न वाटपातील विषमता ही अधिक वाढलेली दिसते. १९७० मध्ये उत्पन्न वाटपाच्या दृष्टीने २० टक्के लोकांचा वाटा ६३ टक्के पर्यंत पोहाचलेला दिसतो यावरून रचनात्मक समायोजनाच्या कालखंडात कामगारांना नोकऱ्या सोडाव्या लागल्या आहेत.

## जागतिकीकरण व दक्षिणपूर्व आशियाई देशातील स्त्रियांचा प्रश्न:

रचनात्मक समायोजनाचा कार्यक्रम व जागतिकीकरणांचा प्रयत्न यशस्वी झाल्याचे सिद्ध करण्यासाठी ज्या दक्षिणपूर्व आशियाई देशांचा जसे हाँगकाँग, थायलंड, फिलीपाईन्स, कोरिया व तैवान या देशातील स्त्रियांवर जागतिकीकरणाचा झालेला परिणामांचा अभ्यास एस. उमादेवी यांनी केलेला असून त्यांचे निष्कर्ष महत्वपूर्ण ठरतात. या देशांमधील कापड व्यवसायातील रोजगारात वृद्धी झाली आहे. याचे महत्वाचे कारण या देशात स्त्री कामगार स्वस्त दरात उपलब्ध आहे. स्त्रियांचा हीन सामाजिक दर्जा मानला जातो. त्या कामगार संघटनेतील सदस्य नाहीत. त्यांना कोणतीही सामाजिक सुरक्षा द्यावी लागत नाही. त्यामुळे स्त्री कामगार स्वस्त दरात प्राप्त होत असते व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला उपयुक्त ठरते. स्त्री श्रमिकांचे प्रमाण कोरियात ४५ टक्के वरून ५७ टक्के पर्यंत वाढलेली दिसून येते. या देशांतील नागरी भागात रोजगारावरील अविवाहित स्त्रियांचे प्रमाण ८.८ टक्के इतके आहे.

## जागतिकीकरणाचे फायदे:

१. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार-

जागतिकीकरणाच्या धोरणाने मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीने जगातील सर्वच देशाला विशेष फायदे मिळेल. तेथील लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत मिळेल. अनेक देशांनी जागतिकीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाखाली न येता तंत्र, विज्ञान, उत्पादन, आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला.

२. देशातील भांडवलीबाजार व परकीय सहयोग-

जागतिकीकरणामुळे बंधने शिथील झाल्यामुळे परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांना विकसनशील देशातील भांडवली बाजारात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळाले परकीय संस्थात्मक गुंतवणुकदारांची भांडवली बाजारातील गुंतवणूक वाढली विदेशी भांडवल बाजारातून भांडवल उभारणे शक्य झाल्यामुळे या देशातील व्याजदर कमी होऊ लागले त्याचा फायदा देशातील लोकांना झाला.

जागतिकीकरणामुळे आणखी एक सकारात्मक परिणाम झालेला दिसतो. तो म्हणजे विदेशी सहयोगाच्या स्वरुपात भरपूर वाढ झाली. नवीन आर्थिक धोरणाची सुरुवात केली तेव्हा

परकीय चलनाच्या बाबतीत विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. देण्याघेण्याचा आढावा अतिशय प्रतिकुल स्वरुपाचा होता अशा परिस्थितीत आयातीचे बिल देण्यास पाहिजे तेवढे परकीय चलन नव्हते. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ही स्थिती पालटली व परकीय चलन गंगाजळीत प्रतिवर्षी भरघोस वाढ होऊ लागली. त्याचप्रमाणे जागतिकीकरणामुळे दोन देशातील स्पर्धा वाढली. स्वदेशी उत्पादक आपला उत्पादन खर्च कमी करण्याचा, दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे निर्यातीपासून परकीय चलन वाढीला चालना मिळाली.

३.विकसनशील देशांना प्रचंड गुंतवणूकीची गरज-

बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांनी श्रम प्रधान तंत्राऐवजी भांडवल प्रधान तंत्र वापरले. त्यामुळे त्यांच्या उद्योगातील वस्तू वाजवी किंमतीत व उच्च दर्जाची मिळत असते. अशा परिस्थितीत विकसनशील देशातील उद्योगांमध्ये श्रम प्रधान तंत्र उपयोगात येत असल्यामुळे रोजगार प्रचंड प्रमाणात वाढतो. परंतु त्यांना द्यावे लागणारे वेतन व उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे या देशात अस्तित्वात असणाऱ्या उद्योगातील वस्तूंच्या किंमती जास्त असतात व त्या वस्तूचा दर्जा कमी प्रतिचा असतो. त्यामुळे हे उद्योग मागे पडू लागतात.

४. जागतिकीकरणामुळे विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेला विविध प्रकारच्या बचतीचा लाभ मिळू शकेल. उत्पादन शक्तीचा पुरेपूर वापर केल्याने उत्पादनात वाढ होईल. त्याचा फायदा उत्पादकांना होईल.

५. उत्पन्नाचे समान वितरण होण्याची शक्यता-

अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे उत्पन्नाची विभागणी समाजातील विविध गटात अधिक क्षमतेनुसार होवू शकेल. आर्थिक सरंक्षणाचे धोरण राबविल्यास काही मुठभर व्यक्ती या नितीचा लाभ घेण्याच्या प्रयत्नात असतात. त्यामुळे उत्पन्नाची वाटणी विषम होते.

६. नवे तंत्रज्ञान निर्माण करण्याची क्षमता जागतिकीकरणामुळे प्राप्त होते.

७. विकसनशील देशात जागतिकीकरणामुळे विशेषीकरणाला महत्व प्राप्त झाले.

**जागतिकीकरणाचे तोटे:**

१. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जागतिक स्तरावर आर्थिक विषमता निर्माण झाली.
२. विकसनशील देशातील जागतिकीकरणामुळे आयातीत वाढ होवून विदेशी कर्ज काढणे आवश्यक झाले. त्यामुळे विदेशी कर्जाचा डोंगर वाढू लागला.
३. विकसनशील देशातील उपक्रमी बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करण्यास सक्षम न राहिल्यामुळे आजारी उद्योगांची संख्या वाढीस लागली.
४. जागतिकीकरणामुळे चैनिच्या वस्तूंची मागणी वाढीस लागली व आवश्यक वस्तुंचा तुटवडा होऊन वस्तूंच्या किमती वाढू लागल्या.
५. विकसित राष्ट्रांचे धोरण विकसनशील राष्ट्रांच्या विकासास पोषक नाहीत.
६. बेरोजगारी वाढण्याची शक्यता जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आहे.

**समारोप:**

या शोधनिबंधात जागतिकीकरणामुळे

झालेला फायदा व तोट्याचे स्पष्टीकरण दिलेले असून विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा परिणाम याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. आपल्या विकासाच्या प्रारंभिक टप्प्यात आपल्या उद्योगांना स्वातंत्र्याच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे इतिहास सांगतो. बहुराष्ट्रिय कंपन्यांना विविध क्षेत्रात प्रवेश करताना शिस्तबद्धरित्या दीर्घकाळ लुटण्याची तरतूद ते करार मदार करतानाच करतात. देशांतर्गत उद्योगांबाबत उदारीकरणाचे धोरण तयार करताना सुटसुटित कायदे निर्माण करणे आवश्यक आहे.

देशातील नैसर्गिक साधनसामग्री कमी प्रमाणात असते त्याचा योग्य वापर करणे आवश्यक असते. विकास हा साधनसामुग्रीवर अवलंबून असतो. उत्पादन, गुंतवणूक, बचत, व्यापार आकर्षित व फायदेशीर बनला पाहिजे यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली असून ती थांबविणे आता शक्य नाही. कोणतेही देश आता तटस्थ राहू शकत नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जसजशी गती प्राप्त होईल तसतशी निरनिराळ्या देशातील वाणिज्य व व्यापारामध्ये जलद वाढ होईल. केवळ वस्तु आणि सेवाच राष्ट्रीय सीमा ओलांडून जातील असे नव्हे तर निरनिराळ्या देशातील दळणवळण मोठ्या प्रमाणात होऊ लागेल. व्यापारी व धंदेवाईक लोकांच्या हालचालींना वेग येईल. देशातील भिन्न संस्कृतीतील लोकांचे परस्परांशी संबंध वाढतील. याचा लोकांच्या जीवनशैलीवर व संस्कृतीवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. कोणताही देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून मुक्त झालेला नाही. अविकसीत व विकसनशील देश या प्रक्रियेत पूर्णतः सापडले आहेत. या देशातील सामाजिक गटांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. जागतिकीकरण तात्विक दृष्टया सर्वांना फायद्याचे होऊ शकते त्यासाठी निकोप समतोल पातळीवर स्पर्धा टिकविणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


१. दत्त सुंदरम्, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रकाशक एस चन्द, पृ. २४६-२५०.

२. सुधाकर शास्त्री, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रकाशक विश्वप्रकाश, पृ. ८९-९४.

३. मिश्र पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिकेशन.

४. श्रीधर आत्माराम देशपांडे, विनायक श्रीधर देशपांडे, *भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)*, हिमालय पब्लिकेशन, पृ. २७४-२७७.

५. *Concept Implication and Effects of Globalisation on undeveloped Economics*, Google search.

६. जगन कराडे, *जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने*, डायमंड पब्लि., पृ. ३, ५.

७. माधव दातार, *जागतिकीकरण, नागरिकरण व मागास प्रदेशांचा विकास*, अर्थसंवाद ऑक्टो-डिसें. २००६ खंड ३० अंक ३, पृ. २१३.

८. विनायक गोविलकर, *जागतिकीकरण कोणासाठी व कशासाठी*, अर्थसंवाद, एप्रिल-जून २००५, खंड २९ अंक १.

९. जयंत पाटील, *जागतिकीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्था*, अर्थसंवाद, एप्रिल-जून २००४, खंड २८ अंक १.

१०.उमा मेड्डूरी, योजना-*प्रशासकीय सुधारणा*

*जागतिकी-करणाच्या कालखंडातील प्रशासन*, योजना मासिक, भारत सरकारची माहिती व प्रसारण मंत्रालयाचे प्रकाशन.
११. तरुण भारत - *विकासासाठी बिक्स् बँक*, गुरुवार २४ जुलै २०१४
१२. Google- Internet.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रतिवर्षी एक नामांकित अर्थशास्त्रज्ञाचे व्याख्यान परिषदेच्या ३४ व्या वार्षिक अधिवेशनापासून अधिवेशन काळात आयोजित केले जाते. परिषदेची स्थापना, जडणघडण व कार्यविस्तार या प्रत्येक पातळीवर प्रा. नी. वि. सोवनी यांचे योगदान अपूर्व आहे. मराठी या प्रादेशिक भाषेतून कार्य करणारे परिषदेला राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या मानमान्यतेचे मोठे श्रेय प्रा. नी. वि. सोवनी यांनाच द्यायला हवे. व्याख्यानाच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी निधी देणाऱ्या ४० देणगीदारांची नावे अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर २०१० खंड ३४, अंक २ मध्ये पृ. २१०-२११ वर प्रसिध्द झालेली आहेत. त्यानंतर या उपक्रमासाठी निधी देणाऱ्या देणगीदारांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

### प्रा. नी. वि. सोवनी यांच्या स्मृती व्याख्यानासाठी निधी देणाऱ्यांची नावे

| | |
|---|---|
| १. बाळ कुलकर्णी, अमरावती | रु.१,०००/- |
| २. प्रा. धनश्री महाजन, औरंगाबाद | रु.१,०००/- |
| ३. प्रा. अंजली कुलकर्णी, नागपूर | रु.१,०००/- |
| ४. प्रा.प्रशांत हरमकर, अमरावती | रु.१,०००/- |
| ५. शि. ना. माने, सातारा | रु.१,०००/- |
| ६. डॉ. विनायक देशपांडे, नागपूर | रु.५,०००/- |
| ७. प्रा. सुधा मोकाशी, मुंबई | रु.१,०००/- |
| ८. डॉ. आ. गो. पुजारी, सांगोला | रु.५,०००/- |
| ९. डॉ.दि. व्यं. जहागिरदार | रु.१,०००/- |
| १०. माधव ढेकणे, पुणे | रु.१०,०००/- |
| ११ डॉ. एच. आर. तिवारी, शेंदुरजना | रु.१,०००/- |
| १२. डॉ.डी.डी.चौधरी, अहमदपूर | रु.१,०००/- |
| १३. डॉ. बालाजी सूरवसे, सिंधुदूर्ग | रु.५,०००/- |
| १४. प्रा. चारुदत्त गोखले | रु.५,०००/- |

# केंद्रीय अर्थसंकल्प २०१४-१५ : शेती आणि ग्रामीण विकास

**संजय एस. रूपे, कोल्हापूर,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर.
भ्रमणध्वनी: ९७६४२०४५५३

**संतोषकुमार ब. यादव, कोल्हापूर,**
अर्थशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर.
भ्रमणध्वनी: ९९२११६०२०८

**प्रस्तावना:**

मे २०१४ मध्ये देशात नवीन सरकार आल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पहिला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी गुरुवार १० जुलै २०१४ रोजी लोकसभेत सादर केला. अरुण जेटली यांचा हा पहिलाच अर्थसंकल्प. समाजातील विविध थरातील घटकांकडून नवीन सरकारबद्दल असलेल्या अपेक्षा, वाढती महागाई विशेषत: अन्नधान्याची महागाई, आधीच्या सरकारमधील भ्रष्टाचार, सुरुवातीला मोसमी पावसाने दिलेली हुलकावणी या पार्श्वभूमीवर २०१४-१५ चा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरतो. प्रस्तुत निबंधात भारतीय शेती क्षेत्राची सद्यस्थिती, शेती क्षेत्रातील समस्या आणि या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदी, त्या तरतुदींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि देशाच्या अवाढव्य श्रमशक्तीला रोजगार देणाऱ्या शेती क्षेत्रावर होणारे संभाव्य परिणाम यांचा ऊहापोह केलेला आहे.

**शेती क्षेत्राची सद्यस्थिती:**

भारताची सध्याची लोकसंख्या १२५ कोटी इतकी आहे. जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ५६ टक्के लोकसंख्या अजूनही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. यामध्ये लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ८० टक्के इतके आहे. या शेतकऱ्यांची जमीन धारणा १ हेक्टरपेक्षा कमी किंवा १ ते २

हेक्टर दरम्यान आहे. याचा अर्थ असा होतो की, भारतीय शेतीमध्ये लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. The Hindu या वृत्तपत्र समूहाने अलिकडेच भारतीय शेतीची सद्य:स्थिती, समस्या व उपाययोजना यावर नेमके भाष्य करणारा Survey of Indian Agriculture हा अंक प्रकाशित केला. या अंकामध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार भारतातील लहान व सीमांत शेतकऱ्यांची संख्या ३० कोटी इतकी आहे. या शेतकऱ्यांना त्यांना मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी ६० टक्केपेक्षा जास्त उत्पन्न शेतीतून मिळते. या घटकांचा सध्याचा राहणीमानाच्या खर्चाचा विचार करता शेतीक्षेत्रातून त्यांना मिळणारे उत्पन्न अपुरे पडते. अर्जुन सेनगुप्ता आयोगाच्या अहवालानुसार (२००७), भारतातील शेतकऱ्यांचे प्रति कुटुंब प्रति महिना सरासरी उत्पन्न २११५ रुपये आहे. परंतु त्यांचे प्रति कुटुंब प्रति महिना सरासरी खर्च २७७० रुपये इतके आहे. साहजिकच वाढीव खर्च भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागते. २००८ मध्ये ७६,००० कोटी रुपये इतकी कृषी क्षेत्राला कृषी माफी दिली गेली. २००७-१२ या कालावधीत राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी २५,००० कोटी रुपये इतका खर्च केला गेला. तरीही गेल्या १७ वर्षांत ३ लाख शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या. एकूण शेतकऱ्यांपैकी ४२ टक्के शेतकरी शेती क्षेत्रातून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहेत. गेल्या ५-६ वर्षांत दरवर्षी अंदाजे १४,००० शेतकरी आत्महत्या करत आहेत.

## शेती क्षेत्रातील समस्या:

स्वातंत्र्यानंतर शेती क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सरकारने सूक्ष्म आणि स्थूल पातळीवर अनेक योजना आखलेल्या दिसून येतात. १९६६ पासून हरितक्रांती सुरू झाली. १९९१ साली सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग सुरू केले गेले. शेतीला सहाय्यभूत अशी संस्थात्मक उभारणी केली गेली, तरीही शेतीमध्ये अनेक समस्या असलेल्या दिसून येतात. त्यामध्ये शेती क्षेत्राला होत असलेला अपुरा व अनिश्चित पतपुरवठा, साठागृहांची अपुरी व्यवस्था, शेतीत वापरल्या जाणाऱ्या आदानांच्या वाढत्या किमती, शेतमाल उत्पादनाच्या खरेदी-विक्रीतील समस्या, म्हणजेच मध्यस्थांचे प्रस्थ, शेतमाल उत्पादनाला मिळत असलेली कमी किंमत म्हणजेच उत्पादनाला त्याच्या उत्पादित मालाला योग्य भाव न मिळणे, शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी शेती क्षेत्रात वापर होत असलेल्या अमर्यादित रासायनिक खतांचा वापर आणि त्यामुळे उत्पादनाचा खालावलेला दर्जा व गुणवत्ता, सिंचन, वीज यासारख्या अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि महत्त्वाचे म्हणजे या सर्व गोष्टींमुळे संपत्तीचा वाढावा निर्माण करण्यात शेती क्षेत्राला आलेले अपयश यांचा समावेश होतो.

## अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये:

शेती क्षेत्राची बिकट अवस्था आणि शेती क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी अर्थसंकल्पात काही महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या दिसून येतात. अर्थसंकल्पातील शेती आणि ग्रामीण विकाससंबंधी तरतुदींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर, शेतीवर आणि ग्रामीण जीवनावर दीर्घकालीन परिणाम होणार आहे. या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१. केंद्रीय अर्थसंकल्प २०१४-१५ मधील शेती क्षेत्राशी संबंधित सर्वात महत्त्वाची तरतूद

म्हणजे बाजार समित्यांना खासगी मार्केटचा पर्याय उपलब्ध करून देणे. शेतकऱ्याला योग्य भाव मिळण्याच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी काही मूलभूत घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्या दृष्टीने बाजार समित्यांना पर्याय म्हणून खासगी मार्केट उभारण्याचे सुतोवाच अर्थसंकल्पात केले आहे. सध्याच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांतील व्यवस्था ही मध्यस्थांना सहाय्यभूत आणि शेतकऱ्यांना तोट्याची अशी आहे. शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल विक्री करण्यासाठी बाजार समित्यांबरोबर खासगी मार्केटचा पर्याय उपलब्ध होण्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होऊन त्यांच्या उत्पादनांना जास्त किंमत मिळू शकेल.

२. शेतकऱ्यांना शेतीतील नवे बदल, आधुनिक तंत्रज्ञान, बाजार, हवामान, माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन आणि नियोजन यासंबंधी योग्य माहिती मिळणे गरजचे असते. कृषी व्यवस्थापन तंत्रज्ञान संस्था, कृषी विज्ञान केंद्रे शेतकऱ्यांना शेती संबंधित विविध माहिती देत असतात. त्याचबरोबर खाजगी क्षेत्र, बिगर सरकारी संस्था, उत्पादक संघटना, सल्लागार, माध्यमे, मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्या शेतकऱ्यांना शेती संबंधित माहिती पुरवत असतात. तरीसुद्धा सर्व शेतकऱ्यांना सर्व काळ उपयुक्त माहिती व सेवा मिळत नाही. त्यादृष्टीने डी. डी. किसान ही दूरदर्शन वाहिनी सुरू केली जाणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. डी. डी. किसानमुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडेल.

३. उत्पादनवाढीचा निकष लक्षात घेऊन जास्तीत जास्त जमिनीला सिंचन सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पंतप्रधान कृषी सिंचन योजना प्रस्तावित आहे. या योजनेसाठी १००० कोटी रूपयांची तरतूद प्रस्तावित आहे. यामुळे कोरडवाहू शेतीसाठी पाणी व्यवस्थापन योग्य पद्धतीने होण्यास मदत होईल. या अर्थसंकल्पात नदी जोड प्रकल्पाची आवश्यकता प्रतिपादित केली असून या प्रकल्पाच्या अभ्यासासाठी १०० कोटींची तरतूद केली आहे. ती स्वागतार्ह आहे. नद्या जोड प्रकल्पात हिमालयातील १४ व देशातील इतर १६ नद्यांचा समावेश आहे. असे असले तरी ऊस, कापूस, मिरची, तेलबिया यासारख्या पिकांना पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठिबक सिंचन पद्धती अवलंबिण्याची गरज आहे. त्याबाबत स्पष्टीकरण अर्थसंकल्पात नाही. खरे तर देशामध्ये सिमेंटचे कॅनॉल हवेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिंचन निधीचा गैरवापर रोखावयास हवा.

४. २०१४-१५ या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राला ८ लाख कोटी इतका पतपुरवठा केला जाणार आहे. २०१३-१४ च्या अर्थसंकल्पापेक्षा या अर्थसंकल्पातील पतपुरवठ्याची तरतूद १ लाख कोटीने वाढविली आहे. ही वाढ लक्षणीय म्हणावी लागेल. परंतु शेतीच्या बदललेल्या व्याख्येमुळे मोठे शेतकरी किंवा जमीनदार आणि काही कृषी व्यवसाय कंपन्या संस्थात्मक पतपुरवठ्याचा मोठा हिस्सा

मिळवतात. त्यामुळे अपेक्षित लाभार्थ्यांना लाभ होत नाही. वेळेत पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३ टक्के व्याजाने कर्ज (आधीच्या वर्षातील तरतूद ४ टक्के) उपलब्ध केले जाणार आहे. पीक कर्जाबाबतच्या निर्णयाने कर्जवसूलीस मदत होईल.

५. माती परीक्षण प्रयोगशाळेसाठी रु.५६ कोटी तरतूद आहे. देश पातळीवर राबविला जाणारा मृदा परीक्षणाचा कार्यक्रम चांगला आहे, परंतु तरतूद अल्प आहे. मृदा परीक्षणामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या दर्जाविषयी नेमके मार्गदर्शन मिळण्यास मदत होईल. सध्या देशामध्ये २५ ते २६ कोटी टन अन्नधान्याचे उत्पादन होते. अन्न सुरक्षा कार्यक्रम संपूर्ण देशभर परिणामकारक राबवायचा म्हटले तर देशाला २८ कोटी टन अन्नधान्याची गरज आहे. त्यासाठी माती परीक्षण व व्यवस्थापन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. शेतीतून अधिक उत्पादन वाढण्यास याची गरज आहे.

६. आंतरराष्ट्रीय बाजारात देशातील शेती उत्पादनाची गुणवत्ता आणि किंमतीच्या स्वरूपात स्पर्धा करायची झाल्यास शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने अर्थमंत्र्यांनी *शेतजमीन आरोग्य योजना* घोषणा करून त्यासाठी १०० कोटींची तरतूद केली आहे.

७. स्वातंत्र्यानंतर भारतीय कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थात्मक उभारणी केली गेली आहे. या अर्थसंकल्पात आसाम व झारखंड या राज्यात दोन कृषी संशोधन संस्था, आंध्रप्रदेश व राजस्थान या राज्यात दोन कृषी विद्यापीठे, तेलंगणा व हरियाणा या दोन राज्यात प्रत्येकी एक फलोत्पादन विद्यापीठ उभारले जाणार आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. यामुळे कृषी संशोधन व विस्तारास मदत होईल. परंतु भारताचा शेती संशोधन व विकास खर्च इतर देशांतील शेती संशोधन व विकास खर्चापेक्षा किती तरी कमी असलेला दिसतो. भारताचा हा खर्च देशाच्या कृषी स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.५९ टक्के इतका अल्प आहे. तो अमेरिकेच्या तुलनेत ७ पट कमी आहे. २०१२ मधील देशाची कृषी संशोधन व विकासासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद १ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा कमी होती आणि महत्त्वाचे म्हणजे यातील बरीचशी तरतूद ५००० शास्त्रज्ञ, १००० कर्मचारी, १०० संशोधन संस्था व ६० विद्यापीठे यांच्या पगारावर खर्च झाली. या तरतुदीतील प्रत्यक्ष संशोधनावरील खर्च अत्यल्प आहे. याच कालावधीत चीनचा कृषी संशोधन व विकास खर्च ४ अब्ज अमेरिकन डॉलर इतका होता. तो भारताच्या चौपट इतका दिसून येतो. याचाच अर्थ असा होतो की, या क्षेत्रासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद वाढविण्यास वाव आहे.

८. कृषी आणि ग्रामीण विकासासाठी नाबार्डच्या 'ग्रामीण पायाभूत विकास निधी'साठी (Rural Infrastructure Development Fund - RIDF) ५,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कृषी पंपांना सौर ऊर्जेसाठी ५००

कोटी रुपये आणि शेतीला २४ तास वीजपुरवठा होण्यासाठी दीनदयाळ ग्रामज्योती योजना प्रस्तावित आहे. यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. देशामध्ये शेतमाल साठवणुकीच्या अपुऱ्या सोयी आहेत. २००९-१२ या कालावधीत साठवणुकीच्या अभावामुळे १७,५०० टन धान्य वाया गेलेले आहे. शेतमाल साठवणुकीसाठी या अर्थसंकल्पात ५०० कोटींची तरतूद आहे.

९. हवामानातील बदलांमुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी त्याचा तपशील स्पष्ट केलेला नाही. अन्नधान्याच्या वाढत्या किमती हा अलिकडच्या काळातील एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. महागाईला लगाम घालून किमती स्थिर ठेवण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

१०. सरकारकडून कृषी क्षेत्राला कोट्यवधी रूपयांची अनुदाने दिली जातात. वीज, खते, कीटकनाशके यासारख्या कृषी आदानांच्या किंमती कमी राहण्यासाठी सरकार सवलती/ अनुदाने देत असते. परंतु याचा फायदा तळागाळातील शेतकऱ्यांना मिळत नाही, असे अभ्यासाअंती सिद्ध झालेले आहे. त्यातही युरिया आदी खतांवरील सवलती (अनुदाने) हा वित्तीय व्यवस्थापनाच्या मार्गातील अडथळा निर्माण झालेला दिसून येतो. युरिया आदी खतांवरील अनुदानांचा फायदा श्रीमंत शेतकऱ्यांना झालेला दिसतो. म्हणून या खतांच्या किमती वाढवावयास हव्यात. त्यासाठी यावरील अनुदान कमी करण्याचे धैर्य सरकारने दाखवावयास हवे होते. बांग्लादेश, फिलिपिन्स यासारख्या देशामध्ये युरियाच्या किंमती, भारतातील किंमतीच्या तिप्पट आहेत. शिवाय शेती क्षेत्रातून अधिक उत्पादन घेण्यासाठी युरियासारख्या खतांचा बेसुमार वापराने पर्यावरणाचेही नुकसान होते.

११. अर्थसंकल्पात सरकारच्या धोरणामध्ये ग्रामीण व कृषी क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य राहणार असल्याचे अर्थमंत्री अरूण जेटली यांनी सांगितले आहे. देशाचा ग्रामीण-विकास विषम पद्धतीने झालेला आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक आर्थिक, शैक्षणिक, वित्तीय सोयी सुविधांचा अभाव दिसतो. या दृष्टीने या अर्थसंकल्पातील तरतूदी महत्त्वाच्या ठरतात. ग्रामीण भागात ई-क्रांती घडवून आणण्यासाठी आणि या भागात आय. टी. शिक्षणासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद आहे. ग्रामीण भागातील लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे यासाठी रु.३००० कोटी, स्वच्छता अभियानासाठी रु.५००० कोटी, रस्त्यांच्या जाळ्यासाठी रु.३७,८०० कोटी तरतूद केली आहे. ग्रामीण भागामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये रस्त्यांची सोय उपलब्ध करून देण्यामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या अर्थसंकल्पात या योजनेसाठी १४,००० कोटी रुपयांची तरतूद आहे. ग्रामीण भागातील उद्योगांना प्रोत्साहन आणि लघु व मध्यम उद्योगाचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार समिती स्थापन करणार आहे. ग्रामीण उद्यमशीलता कार्यक्रमांद्वारे युवकांना

उद्योगासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाद्वारे कृषी संबंधी मत्ता निर्माण केली जाणार आहे. त्यासाठी रु.३३,३६४ कोटी तरतूद आहे. स्वयं-सहाय्यता बचत गटांना ४ टक्के व्याज दराने कर्ज दिले जाणार असून, त्याची व्याप्ती १०० जिल्ह्यांपर्यंत वाढविली जाणार आहे.

**समारोप:**

आर्थिक प्रगतीला लक्षणीय गती देण्याची क्षमता ग्रामीण भागातील शेती आणि शेतीपूरक क्षेत्र, ग्रामीण भागातील लघुउद्योग या क्षेत्राकडे असल्याने ग्रामीण भागाच्या विकासाला या अर्थसंकल्पात अग्रक्रम दिल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी या भागात सार्वजनिक व खाजगी गुंतवणुकीस चालना देणे गरजेचे आहे. अधिक उत्पादन म्हणजे अधिक उत्पन्न नव्हे. शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाची हमी मिळाल्यास कुपोषणाचा प्रश्न मिटेल, ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर थांबेल आणि सरकारी अनुदानावरील अवलंबित्व कमी होईल. या अर्थसंकल्पातील कृषी व ग्रामीण विकासाच्या तरतूदींची धोरण लकव्याला मुरड घालून आणि धाडसी निर्णय घेऊन प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची:**


1. *Speech of the Finance Minister* (10-07-2014), Central Budget 2014-15, Finance Ministry, Government of India, New Delhi, pp 15-18, pp.15-18.
2. Ministry of Finance, (09-07-2014) *Economic Survey - 2013-14*, Government of India, New Delhi, pp 135-159.
3. The Hindu (2014), *Survey of Indian Agriculture*, The Hindu, New Delhi, pp 06.
4. Datta and Sundhram, (2013), *Indian Economy*, S. Chand and Company, New Delhi, pp 522-551.
5. Pratiyogita Darpan, (2013), *Indian Economy*, Pratiyogita Darpan, Agra, pp 104.

# ब्रिक्स बॅंक - भारताला संधी

अब्दुलरऊफ कदीरुद्दीन शेख, अकोला.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी महाविद्यालय.
भ्रमणध्वनी - ९४२३४२९१२३

देशाचे पंतप्रधान झाल्यानंतर सीमावर्ती भुतानचा सदिच्छा दौरा सोडला तर नरेंद्र मोदी प्रथमच परदेशी दौऱ्यावर ब्राझीलला गेले. प्रसंग होता जगातील पाच उदयोन्मुख अर्थव्यवस्था ब्राझील, रशिया, भारत, चीन व द. आफ्रिका या देशांच्या ब्रिक्स् संघटनेचे संमेलन. ब्राझीलच्या फोर्टालेझा येथे १५-१६ जुलै २०१४ रोजी बिक्स् न्यु डेव्हलमेंट बॅंकेच्या स्थापनेसाठी या पाचही देशाचे राष्ट्रप्रमुख जमले होते. त्यात चीनचे राष्टाध्यक्ष जिनपिंग, रशियाचे सर्वेसर्वा पुतीन, द.आफ्रीकाचे जेकब झुमा व ब्राझीलच्या डिल्मा बाझेफ, पंतप्रधान नरेंद्र मोदी सोबत भारताचे एक उच्चस्तरीय शिष्टमंडळही गेले होते. ज्यात अर्थराज्यमंत्री निर्मला सीतारामण, राष्टीय सुरक्षा सल्लागार ए.के.डोभाल, विदेश सचिव सुजाता सिंह व वित्त सचिव अरविंद मायाराम इ. समावेश होता. भारतासाठी अतिशय आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे ब्रिक्स् देशांच्या समूहाद्वारे स्थापित या नवीन बॅंकेचे पहिले सहा वर्ष अध्यक्ष होण्याचा मान भारताला मिळाला. जे आधीच युपीए सरकारच्या काळात ठरले होते. चीनच्या शांघाय शहरात बॅंकेचे प्रधान कार्यालय राहील. दोन वर्षांनी म्हणजे २०१६ पासून बॅंकेच्या प्रत्यक्ष कार्याला सुरूवात होईल. भारतानंतर प्रत्येकी पाच वर्ष ब्राझील व रशियाकडे बॅंकेचे अध्यक्षपद जाईल. नंतर द.आफ्रिकेला हा मान मिळेल आणि शेवटी २० वर्षांनंतर बॅंकेचे अध्यक्षपद चीनकडे जाईल.

**बॅंकेचे भागभांडवल व सदस्य देशांचा वाटा:**

बॅंकेचे भागभांडवल सुरुवातीस ५० अब्ज डॉलर असेल. नंतर इतर नव्या देशांच्या सहभागाने बॅंकेचे भांडवल १०० अब्ज डॉलर पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. ब्रिक्स् च्या पाचही सदस्य देशांच्या वाटा प्रत्येकी १० अब्ज डॉलर राहील. या व्यतिरिक्त महत्वाचे म्हणजे नव्या बॅंकेच्या स्थापनेसह राखीव

आकस्मिक निधीसाठी (*Contigent Reserve Arrengement*) १०० अब्ज डॉलरची तरतुद करण्यात आली. यातून सदस्य देशांना अल्पकालीन वित्तीय संकटाच्या सामना करण्यासाठी मदत मिळू शकेल व आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीकडे मदतीसाठी हात पसरावे लागणार नाही. या राखीव निधीत चीनने सर्वाधिक ४१ अब्ज डॉलरचे योगदान दिले. त्यानंतर भारत, रशिया व ब्राझील याचे प्रत्येकी १८ अब्ज डॉलरचे योगदान राहील तर द.आफ्रिकेचे केवळ ५ अब्ज डॉलर योगदान दिले आहे. भविष्यात इतर विकसनशील देशात देखील या निधीत भरीव योगदान देतील अशी सदस्य देशांनी अपेक्षा व्यक्त केली. ज्यात प्रामुख्याने इराण, इंडोनिशिया, मलेशिया व तुर्कस्तान या विकसनशील देशांचा समावेश होऊ शकतो. यावेळी प्रत्येक देशाला समान मताधिकार असेल हे तत्व भारताने सगळयांकडून मंजूर करून घेऊन आपले कर्तव्य सिध्द केले. या ब्रिक्स् बॅकेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्स चे प्रथम पदाधिकारी म्हणून रशिया आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर्स करीता प्रथम पदाधिकारी ब्राझीलचा राहील.

**ब्रिक्स आणि द. अमेरिकी देशः**

फोर्टालझा येथील ब्रिक्स देशांच्या या सहाव्या शिखर संमेलनात संवाद साधण्यासाठी दक्षिण अमेरिकेतील देशांचे संघटन उनासुर- (UNASUR-Union of South American Nations) चे राष्ट्राध्यक्ष विशेष निमंत्रित म्हणून बोलवण्यात आले होते. यात प्रामुख्याने अर्जेटिनाचे राष्ट्रपती क्रिस्टीना फर्नाडिस डि विर्चनर, चिली चे राष्ट्रपती मिशेल बॅकलेट, व्हेनुझुएलाचे राष्ट्रपती निकोलस मादुरो व द. अमेरिकेतील देशांचे इतरही राष्ट्रपती उपस्थित होते. उनानसुर राष्ट्राध्यक्ष सोबत बिक्स् नेत्यांनी बैठक ब्रिक्स् संमेलनानंतर ब्राझीलच्या ब्रासिलिया मध्ये संपन्न झाली. यानंतर फोर्टालेझा घोषणा पत्रात हे मानण्यात आले की ब्रिक्स व द.अमेरिकेतील विविध देशांच्या आपसातील सहयोगाने या शतकात जगात शांतता सुरक्षितता निर्माण होऊन आर्थिक व सामाजिक प्रगती वृध्दिंगत होऊ शकते.

या नवीन बँकेत व ब्रिक्स् समुहात सामील होण्यासाठी द. अमेरिकेतील अनेक राष्ट्रे उत्सुक

तक्ता क्र.१

**ब्रिक्स शिखर संमेलने**

| संमेलन क्र. | दिनांक | संमेलन स्थळ |
|---|---|---|
| १ | १६ जून २००९ | येकाटेरिन बर्ग - रशिया |
| २ | १६ एप्रिल २०१० | ब्रासीलिया - ब्राझील |
| ३ | १४ एप्रिल २०११ | सान्या - चीन |
| ४ | २९मार्च २०१२ | नवी दिल्ली - भारत |
| ५ | २६-२७ मार्च २०१३ | डरबन - द. आफ्रिका |
| ६ | १५-१६ जुलै २०१४ | फोर्टालेझा - ब्राझील |

(टिप - पहिल्या दोन शिखर संमेलनापर्यंत द.आफ्रिका ब्रिक्स संघटनेचा सदस्य नव्हता.)

असले तरी त्याबाबतचा निर्णय पुढील वर्षी रशियात होणाऱ्या बिक्स् समुहाच्या बैठकीत घेतला जाईल. मात्र या राष्ट्रांचा समाविष्ट करताना मूळ बिक्स् देशाची भागीदारी ५५ टक्के पेक्षा कमी होणार नाही याची दक्षता घेण्याचे ठरले.

या ब्रिक्स संमेलनाला संबोधित करतांना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी *सर्वसमावेशक प्रगती शाश्वत विकास* (Inclusive Growth : A Sustainable Development) हे ब्रीदवाक्य फोर्टालेझा परिषदेकरीता निवडल्याबददल ब्राझील चे अभिनंदन केले व पुढील वर्षाचे ब्रिक्स चे अध्यक्षपद ब्राझीलला मिळाल्याबददल त्यांना शुभेच्छा दिल्या.

ब्रिक्स् चे सहावे शिखर संमेलन अशा वेळी संपन्न झाले आहे, ज्यावेळी आंतरराष्ट्रीय समुदाय जागतिक आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी आणि पर्यावरणातील संतुलन राखत निरंतर विकास करण्याच्या आवाहनाचा सामना करण्यासाठीच प्रयत्नाची समीक्षा करीत आहेत. त्याचबरोबर इ.स. २०१५ नंतरच्या जागतिक विकासाच्या अजेंडा ठरविण्यात मग्न आहे. या पार्श्वभुमीवर जागतिक अर्थव्यवस्थेत होत असलेल्या विविध सुधारणात उदयोन्मुख बाजार अर्थव्यवस्था आणि विकसनशील देशांच्या (Emerging Market Economics and Developing Countries) योगदानांची या संमेलनात दखल घेण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीत विकसनशील देशांच्या मताधिकारात ५ टक्क्यांनी वाढ करण्याच्या २०१० चा सुधारीत प्रस्ताव आतापर्यंत लागू न केल्याबददल ब्रिक्स् संमेलनात चिंता व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर आय.एम.एफ. च्या १४ व्या कोटा प्रणालीची समीक्षा तात्काळ कार्यान्वित करण्याची आणि जागतिक आर्थिक, वाणिज्यीक व व्यापार संबंधी विविध घडामोडी सर्व देशांना समान अधिकार, समान संधी व योग्य भागीदारी देण्याची मागणी या फोर्टालेझा संमेलनाच्या घोषणापत्रात करण्यात आली.

## ब्रिक्स स्थापनेची पार्श्वभूमी:

जी-२० ची सुरुवात होण्यापूर्वी काही वर्षाआधीच इ.स. २००१ मध्ये गोल्डमन सच या प्रख्यात अर्थसंस्थेचे मुख्य अर्थतज्ज्ञ' जिम ओ-निल यांनी (Building Better Global Economy-BRICS) या लघुप्रबंधात विकसनशील देशातील आर्थिक प्रगतीचा आढावा घेतांना या देशांचा वाढता प्रभाव व गरजा यांचे विश्लेषण केले होते. यानुसार त्यांनी ब्राझील,रशिया,भारत आणि चीन या देशांचा ब्रिक्स् गट तयार होवु शकतो. जो जागतिक अर्थ व राजकारणावर आपला दबाव निर्माण करून आपले प्रभाव क्षेत्रही वाढवू शकतो अशी संकल्पना मांडली होती. सुरूवातीस ओ-निल यांच्या या संकल्पनेला कोणी गांभीर्याने घेतले नाही. मात्र इ.स. २००१ मध्ये चीन जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य बनल्याने चीनच्या जागतिक व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. याचप्रमाणे इ.स. २००० मधे पुतीन रशियाचे राष्ट्राध्यक्ष झाल्याने आणि जागतिक स्तरावर तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने रशियन अर्थव्यवस्था भरभराटीला आली. याच सुमारास भारतातील उदारीकरणाच्या धोरणाने मध्यम वर्गाची क्रयशक्ती एकदम वाढली. असेच वातावरण कमी अधिक प्रमाणात ब्राझील मध्येही निर्माण झाले. परिणामी २१ व्या शतकांच्या

पहिल्या दशकाच्या मध्यापर्यंत हे चारही देश नव्या आर्थिक शक्तीच्या रूपात उदयास आले. इ.स. २००६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेकरिता या देशांचे परराष्ट्रमंत्री प्रथमच एकत्र आले. इ.स. २००८ मध्ये होक्काइटो या ठिकाणी संपन्न झालेल्या जी-८ (जी७ + रशिया) परिषदेला या देशांना विकसनशील देशांचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी प्रथमतः ब्राझील, रशिया, भारत व चीन या देशांनी आपले स्वतंत्र व्यासपीठ तयार करण्याबाबत चर्चा केली व एका वर्षाच्या आत इ.स. २००९ मध्ये हे चार देश एकत्र येत ब्रिक गट स्थापन केला आणि रशियातील येकातेरीनबर्ग येथे १६ जुन २००९ मध्ये पहिल्या ब्रिक परिषदेचे संमेलन संपन्न झाले नंतर २०१० मध्ये ब्राझील मधील दुसऱ्या परिषदेत ब्रिकचा विस्तार करत यात दक्षिण आफ्रिकेला सहभागी करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार २०११ च्या चीनमधील सान्या येथे भरलेल्या तिसऱ्या परिषदेत दक्षिण आफ्रिकेने सदस्यत्व स्वीकारात ब्रिक चा ब्रिक्स् असा नाम विस्तार झाला.

**ब्रिक्स् बँकेची उपलब्धी व भारतः**

सध्या आंतराष्ट्रीय स्तरावर तीन मोठ्या शक्तीशाली आर्थिक संस्था जागतिक बँक, आशियाई विकास बँक व आंतराष्ट्रीय मुद्रानिधी या कार्यरत आहेत. यांच्या तुलनेत ब्रिक्स् न्यू डेव्हलपमेंट बँक आकाराने लहान असली तरी या शक्तीशाली संस्थांना एक चांगला पर्याय निश्चितच निर्माण होणार आहे. शिवाय ब्रिक्सच्या पाच सदस्य देशांनी पृथ्वीवरील एक चतुर्थांश भूभाग व्याप्त केला आहे आणि जागतिक लोकसंख्येच्या ५० टक्के लोकसंख्या या देशात राहते. महत्वाचे म्हणजे या ब्रिक्स् पाच देशांचा जी.डी.पी. ३५ ट्रिलीयन अमेरिकन डॉलर इतका आहे. त्यामुळे जगातील विकसीत देशांनाही या देशांच्या एकत्रित आर्थिक शक्तीकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही. बँक आणि आकस्मिक निधीचा स्थापनेमुळे ब्रिक्स्ला एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. आतापर्यंत जग याच्याकडे केवळ एक राजकीय व्यासपीठ म्हणूनच पाहत होते ब्रिक्सच्या माध्यमातून या देशांनी जागतिक अर्थकारणाला एक वेगळी दिशा देण्याला सुरु केलेला प्रयत्न एक नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

ब्रिक्स्ची न्यू डेव्हलपमेंट बँक सदस्य देशांबरोबर इतर देशांनाही पायाभूत क्षेत्रातल्या रस्ते, उर्जा प्रकल्पांना आर्थिक मदत करणार आहे. भारताला विविध पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी दरवर्षी १५० अब्ज डॉलरची गरज असेल तरी आपण नाणेनिधीकडे जाणार नसल्याचे नवे अर्थमंत्री अरूण जेटली यांनी नाणेनिधीच्या अध्यक्षांना बजावले आहे. साहजिकच भविष्यात आपली ही गरज ब्रिक्स्ची बँक पूर्ण करेल. भारत १९४५ पासून नाणेनिधीचा संस्थापक सदस्य आहे. तसेच या ब्रिक्स् बँकेतही भारत प्रमुख संस्थापक सदस्यांची महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार आहे. भारत व चीन सोबतच दुर्बल व जर्जर झालेल्या रशियालाही आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी नवी बँक मदत करणार आहे. या बँकेच्या नेतृत्त्वासाठी रिजर्व बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांच्यासारखाच आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त अर्थतज्ज्ञ जगदीश भगवती योग्य ठरु शकतात. ही बँक अन्य कोलंबिया, इक्वेडोर, आफ्रिकन राष्ट्रे, ब्राझील यांना जास्त फायदेशीर

ठरेल. परिणामी या पाच देशातील आर्थिक व्यवहार वाढीस लागतील. ब्रिक्स् बँकेची मुख्य शक्ती १०० अब्ज डॉलरच्या राखीव निधीत आहे. त्यातून भारताला अन्य देशांची महत्त्वपूर्ण चलने सहज मिळून त्याद्वारे आपला आयात-निर्यात व्यापार वाढविणे शक्य होईल. त्यामुळे भारताच्या चालू खात्यातील तूट कमी होण्यास मदत होईल.

शेवटी असे म्हणता येईल की, भारत-चीन आपल्या जुन्या सीमावादात अडकले नाहीत तर ही बँक सदस्य देशांसह इतर आशियाई देशांनाही प्रेरणा देईल. त्याचबरोबर रशिया, ब्राझील व द. आफ्रिका यांना विकासासाठी भरीव आर्थिक मदत करील अर्थात या सर्व कार्यासाठी पुढची काही वर्षे वाट पहावी लागेल.

**संदर्भ सूची:**


१) परिमल माया सुधाकर, *अर्थपूर्ण,* ऑगस्ट २०१४.

२) प्रतियोगिता दर्पण - सप्टेंबर २०१४

३) दैनिक लोकमत दि. ०३/०८/२०१४

४) http://www.bricks.org


---

## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# जागतिक आर्थिक संकटाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**शामराव भगवान वायसे, नंदुरबार,**
अर्थशास्त्र विभाग,
ग.तु.पाटील महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२०८५२६१४

आर्थिक विकासाबरोबर जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होत आहे. जगाला जागतिक खेड्याचे स्वरुप प्राप्त होऊन जागतिक घडामोडींचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहे. जगामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा प्रभाव कमी होऊन भांडवलशाहीकडे जगाचे लक्ष केंद्रित झाल्याने मुक्त व्यवस्थेचा अवलंब IMF व WTO च्या माध्यमातून होत आहे. चीनने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस १९८० मध्ये सुरवात केली तर भारताने जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणात खाउजा धोरणाचा अवलंब केल्याने आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. खुल्या व्यापाराचा अवलंब केल्याने जागतिक घडामोडींचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांवर कमी-अधिक प्रभाव पडला आहे. २००८ चे जागतिक आर्थिक संकट अमेरिकेतील सबप्राईम गृहकर्जाच्या धोरणामुळे आले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत अनेक उलथापालथी चालू आहेत. याचा परिणाम म्हणून आपली अर्थव्यवस्थाही एका संक्रमणावस्थेतून जात आहे. उच्च विकासदर गाठणे, किमतीवर नियंत्रण ठेवणे, वित्तीय स्थैर्य राखणे ही आपली प्रमुख ध्येये आहेत. जागतिक अरिष्टांचा कृषी, उद्योग, व्यापार, बौद्धिक सेवा, पर्यटन, बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, माहिती तंत्रज्ञान यामध्ये सातत्याने परिवर्तन होत असून जागतिक मानांकानुसार उत्पादन करुन निर्यात वाढवावी लागत आहे. जागतिकीकरणामुळे चंचल पैसा व निर्वासित पैसा एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात FDI व FII च्या माध्यमातून गुंतवणूक झाल्याने भांडवल बाजारात मोठे चढ-उतार होत आहेत. परिणामी शेअर बाजारात Black Monday सारखी स्थिती उद्‌भवून SEBI ला वारंवार हस्तक्षेप करावा लागत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत क्षेत्रीय उच्चावचने येत असून अर्थव्यवस्था ही क्षेत्रानुसार

परिवर्तीत होत आहे. जागतिक अरिष्टामुळे भारतात मंदीसदृष्य भाववाढीची परिस्थिती असून विकास, गुंतवणूक की स्थैर्य यामुळे सरकार व RBI यामध्ये मतभेद निर्माण होत आहेत. अर्थव्यवस्था सावरण्यासाठी राजकोषीय धोरण व चलन विषयक धोरणाच्या माध्यमातून हस्तक्षेप करावा लागत आहे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात दुय्यम सामग्रीचा वापर केला असून संशोधनात २००७ -०८ ते २०१२ - १३ या कालखंडाची निवड केली आहे. संशोधन सामग्रीसाठी विविध संदर्भग्रंथ, अहवाल, मासिके, RBI बुलेटीन, वेब साईट, बिझनेस न्यूज चॅनेल, वर्तमानपत्राचा संदर्भ घेतला आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असून व्यापारातील तूट भरुन काढण्यासाठी भारताने जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब केला. भारत विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचा सभासद असल्यामुळे व १९९५ मध्ये GATT चे रुपांतर WTO मध्ये झाल्याने भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली असून त्याचे परिणाम अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रावर होत आहेत.

## जागतिक अरिष्टाचा भारतावर परिणाम:

१) विकासदर -

जागतिक आर्थिक संकटाच्या परिणामामुळे २००७ - ०८ मध्ये GDP चा ९ टक्के विकासाचा दर घटून २००८ - ०९ मध्ये ६.७ टक्के झाला. २००९ - १० मध्ये ६.१ टक्के तर २०१० - ११ मध्ये ५.८ व २०११ - १२ मध्ये ५.५ टक्के झाला. ऑगस्ट २०१३ मध्ये ५ टक्के विकास दर असून २०१३ - १४ मध्ये विकास दर ५.५ टक्के राहिल अशी अपेक्षा आहे. जागतिक घसरणीचा परिणाम होऊन भारताच्या GDP मध्ये मोठी घट होत आहे. जागतिक मंदीचा परिणाम म्हणून सन २०१२ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचा विकासदर ३.१ टक्केच राहिला व जागतिक व्यापारातील वाढ ६ टक्क्यांपर्यंत आली. तर महागाईचा दर ८.९ टक्क्यांवरुन ७.४ टक्क्यांवर आला.

२) वित्तीय तूट-

सध्याची आर्थिक स्थिती ही १९९१ सारखी असून मोठ्या प्रमाणात आयात, मोठी मागणी व वित्तीय तूट वाढत आहे. चालू खात्यावरील वित्तीय तूट १९९१ मध्ये ३.८ टक्के होती. २००८ मध्ये ३ टक्के तर २०१३ मध्ये निर्यातीत घटीमुळे ४.८ टक्के झाली. भारतीय अर्थव्यवस्थेला उच्च वित्तीय तूटीचा सामना करावा लागत असून १९९१ मध्ये वित्तीय तूट ५.३९ टक्के होती. तर २०१३ मध्ये ४.९ टक्के झाली. GDP च्या तुलनेत परकीय कर्जाचे प्रमाण २८.७ टक्के होते. २०१३ मध्ये २० टक्के राहिले. परकीय गंगाजळीच्या तुलनेत अल्पमुदतीच्या कर्जाचे प्रमाण १४६.५ टक्के होते ते २०१३ मध्ये ५९ टक्के पर्यंत आले. देशातील बचतीचा दर २० टक्के वरुन ३० टक्क्यांवर गेला. अर्थव्यवस्था उत्पादन क्षेत्रावरुन सेवा क्षेत्रावर आधारित होत आहे. १९९१ मध्ये दोन महिने आयातीची गरज भागविता येण्याऐवढे परकीय चलन होते. २००८ मध्ये दोन वर्षे पुरेल एवढे व २०१३ मध्ये सात महिने पुरेल एवढे परकीय चलनाचा साठा होता. परकीय गंगाजळीचा साठा ५.८३ अब्ज डॉलर वरुन सध्या २७८.६०२ अब्ज डॉलर आहे.

३) विनिमय दर -

जागतिक मंदीच्या परिणामाने रुपयाचे विनिमय मूल्य सातत्याने घसरत असून २००८ मध्ये १ डॉलर = ४२ रु. असणारा विनिमय दर ऑगस्ट २०१३ च्या शेवटच्या आठवड्यात रुपयात ऐतिहासिक घसरण होऊन १ डॉलर = ६८.८० रु. पर्यंत गेला होता. आशिया खंडातील सर्वच राष्ट्रांचे चलनाचे मूल्य कमी झाले. ऑगस्ट २०१३ मध्ये ब्राझील १४.२३ टक्के, रशिया ७.२० टक्के, भारत १५.५२ टक्के, चीन १.९६ टक्के, दक्षिण आफ्रिका १८.५८ टक्के, इंडोनेशिया १०.६१ टक्के, टर्की १०.५५ टक्के घट झाली. अमेरिका व युरोप खंडातील अर्थव्यवस्थात सुधारणा झाल्याच्या परिणामाने FII ची विक्री सातत्याने वाढत आहे. विशेषतः FDI च्या वाढत्या गुंतवणुकीमुळे किरकोळ क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ झाल्याने GDP च्या २२ टक्के असून एकूण लोकसंख्येपैकी ८ टक्के लोकसंख्या किरकोळ क्षेत्रात काम करत आहे. जागतिक अरिष्टातून अर्थव्यवस्था सावरत असून सध्या विनिमय दर १ डॉलर = ५४.५० रु. पर्यंत आहे.

४) आयात-निर्यातीवरील परिणाम-

जागतिक मंदीचा परिणाम होऊन भारताची आयात-निर्यात आकुंचन झाली असून आयातीच्या मूल्यापेक्षा निर्यातीचे मूल्य सातत्याने कमी होत आहे. पर्यायाने व्यापारतोल असमतोल राहिल्याने चालू खात्यावर तूट येत आहे. २००७-०८ या आर्थिक वर्षात निर्यातमूल्य रु.१६३१३२ कोटी होते. तर आयात मूल्य रु.२५१६५४ कोटी होते. पर्यायाने व्यापार तोलात रु.८८५२२ कोटी तूट झाली. मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीत वाढ २९.०५ टक्के व आयातीत ३०.४९ टक्के वाढ झाली. २००८ - ०९ मध्ये निर्यातीत १३.५९ टक्के वाढ होऊन १,८५,२९५ कोटी रु. झाली व आयातीत २०.६८ टक्के वाढ होऊन ३,०३,६९६ कोटी रु. ची आयात झाल्याने व्यापारतोल १,१८,४०१ कोटी रु. तूटीचा झाला. जागतिक अरिष्टाचा परिणाम भारताच्या निर्यातीवर होऊन निर्यातीत ३.५३ टक्के घट झाली. निर्यात मूल्य १,७८,७५१ कोटी रु. झाली व आयातीत देखील ५.०५ टक्के घट होऊन २,८८,३७३ कोटी रु. होऊन व्यापारतोल १,०९,६२१ कोटी रु. ची तूट झाली. २०१०-११ या वर्षात निर्यात ४०.४९ टक्के वाढ होऊन निर्यात मूल्य २,५१,१३६ झाले व आयात २८.२३ टक्के वाढून ३,६९,७६९ कोटी रु. होऊन व्यापारतोल १,१८,६३३ कोटी रु. ने तुटीचा झाला. २०११-१२ या वर्षात सापेक्ष दृष्ट्या निर्यातीत २१.३० टक्के वाढ होऊन निर्यात मूल्य ३,०४,६२४ कोटी रु. चे झाले. तर निर्यातीच्या तुलनेत आयातीत ३२.२९ टक्के वाढ होऊन ४,८९,१८१ कोटी रु. झाल्याने व्यापारतोल १८४५५८ कोटी रु. तुटीचा झाला. २०१२-१३ या वर्षात निर्यातीत ४.०३ टक्के घट होऊन निर्यात मूल्य २,६५,९४६ कोटी रु. झाले व आयातीत मात्र नाममात्र ०.२५ टक्के वाढ होऊन ४,४८,०३७ कोटी रु. झाल्याने व्यापारतोलात १,८२,०९० कोटी रु. ची तूट झाली. जागतिक आर्थिक संकटाने भारताच्या निर्यातीच्या मूल्यापेक्षा आयात मूल्यात सातत्याने वाढ होत आहे. २००७ - ०८ च्या निर्यात मूल्याची तुलना २०१२ - १३ च्या निर्यात मूल्याशी केल्यास निर्यातीत ६३ टक्के वाढ झाली तर याच कालावधीत आयातीत ७८ टक्के वाढ झाली. पर्यायाने या कालावधीत व्यापारतोलातील तुटीतील वाढ १०५.७० टक्के झाली. म्हणजेच

जागतिक मंदीचा (२००८) भारताच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पर्यायाने भारतास व्यापार शर्ती प्रतिकूल होत आहेत.

५) शेअर बाजारावर परिणाम-

जागतिक आर्थिक आरिष्टामुळे भारतीय शेअर बाजारात मोठे चढ-उतार झाले FII, MF, FDI यांनी मोठी विक्री केल्याने SENSEX मध्ये बदल होऊन सामान्य गुंतवणुकदारांचे मोठे नुकसान झाले. २००७ मध्ये मुंबई शेअर निर्देशांक १३,८२७.७७ वर खुला होऊन त्यामध्ये सर्वाधिक वाढ २०,४९८.११ पर्यंत झाली तर सर्वाधिक घट १२,३१६.१० एवढी होऊन २०,२८६.९९ वर बंद झाला. ४३३.७६ कोटी शेअरची खरेदी-विक्री होऊन त्याचे मूल्य २,९५,४५३. कोटी रु. होते. २००८ या वर्षात २०,३२५.२७ वर निर्देशांक सुरु होऊन सर्वाधिक वाढ २१,२०६.७७ पर्यंत होऊन सर्वाधिक ऐतिहासिक घट ७,६९७.३९ पर्यंत झाली व अल्पवाढ होऊन ९,६४७.३१ ला बंद झाला. शेअर खरेदी-विक्री ७१६.७७ कोटी होऊन त्याचे मूल्य ४,०८,५७८.६६ कोटी रु.होते.

२००९ या वर्षात निर्देशांकात १७,३३०.९४ पर्यंत वाढ होऊन ८०४७.१७ पर्यंत घट झाली. शेअर खरेदी - विक्री ८८१.७६ कोटी होऊन त्याचे मूल्य ३,९३,००५.९९ कोटी रु.चे होते. २०१० या वर्षात निर्देशांकात २१,१०८.६४ पर्यंत वाढ होऊन पुन्हा १५,६५१.९९ पर्यंत घट झाली. शेअर खरेदी-विक्री ४१२ .०२ कोटी ची होऊन त्याचे मूल्य २,३५,१५३.९५ कोटी रु.होते. २०११ मध्ये निर्देशांक २०,६६४.८० पर्यंत वाढून त्यामध्ये पुन्हा घट होऊन १५१३५ एवढा झाला. शेअर खरेदी-विक्री ३८१.९९ कोटीची होऊन त्याचे मूल्य १,८५,६५६.६३ कोटी रु. होते. २०१२ मध्ये निर्देशांक १९,६१२.१८ पर्यंत जाऊन त्यामध्ये पुन्हा घट होऊन १५,३५८.०२ पर्यंत खाली आला तर २९८.२४ कोटी ची खरेदी-विक्री होऊन त्याचे मूल्य १,४९,३३८.०८ कोटी रु. होते. २०१३ मध्ये निर्देशांक २०,४४३.६२ पर्यंत वाढून त्यामध्ये १७,४४८.७१ पर्यंत घट झाली. फक्त १७४.२४ कोटी शेअरची खरेदी-विक्री होऊन त्याचे मूल्य सर्वात कमी ८६,२९३.६३ कोटी रु. होते.

जागतिक आर्थिक संकटामुळे भारतात भांडवल बाजारात घट होत आहे. मात्र वस्तू बाजारातील सोने व चांदीच्या किमतीत वाढ होत आहे. पर्यायाने सर्वच क्षेत्रावर याचा विपरित परिणाम झाला आहे.

२००७ ते २०१३ या कालावधीत मुंबई शेअर बाजार W आकाराचा झाला असून शेअर खरेदी-विक्रीमध्ये २००८ च्या तुलनेत २०१३ मध्ये ७५.६९ टक्के घट झाली. तर शेअर खरेदी-विक्री मूल्यात ७८.८८ टक्के घट झाली. शेअर निर्देशांकात आजपर्यंतच्या सर्वाधिक वाढीपेक्षा ६३.७० टक्के घट झाली.

२००८-२०१३ या कालावधित Reality Sector Index १३८४.०९ वरुन सर्वाधिक घट ११२६.८४ एवढी झाली. यांच्यातील घट L आकाराची झाली. Auto Index V आकार, Banking U आकार, Consumer Durables W आकार, Capital Goods L आकार, Healthcare W आकार, IT - V आकार होऊन IT Index मध्ये सर्वाधिक सुधारणा झाली. IT कंपन्यांच्या नफ्यात विनिमय दर वाढ झाल्याने सातत्याने नफा वाढून शेअर मूल्यात वाढ झाली. Oil & GAS - L आकार, PSU L

आकार तर Power Index W आकाराचा झाला. शेअर निर्देशांकातील चढ-उताराचा सर्वाधिक तोटा सामान्य गुंतवणुकदारांना झाल्याने तो शेअर बाजारापासून दूर जात आहे. याच कालावधीत Nifty राष्ट्रीय शेअर निर्देशांक २००७ मध्ये ३७८५०.९० होता. त्यात वाढ होऊन २००८ मध्ये ५२३०.७५ झाली. मंदीमुळे घट होऊन २००९ मध्ये ३६६४.५० झाली. २०१० मध्ये ५२५४; २०११ मध्ये ५६८७.७०; २०१२ मध्ये ५२०१.४५ तर २०१३ मध्ये Nifty ५५९२ पर्यंत गेला. जागतिक अरिष्टाचा परिणामांमुळे शेअर बाजारातील उलाढाल कमी होऊन सामान्य गुंतवणूकदार सापेक्षदृष्टया म्युच्युअल फंडाच्या शाश्वत उत्पन्न योजनेकडे आकर्षित होत आहे.

६) वस्तू बाजारावरील परिणाम-

भांडवल बाजारातील चढ-उतारांचा परिणाम वस्तू बाजारावर झाल्याने गुंतवणुकदारांनी आपली गुंतवणूक शेअर, म्युच्युअल फंडातून काढून घेऊन वस्तू बाजारात गुंतवल्यामुळे सोने-चांदीच्या किमती २००७ पासून २०१३ पर्यंत वाढत आहे. २००७ मध्ये सोने प्रतितोळा १०,८०० रु. वरुन वाढून २०१३ मध्ये सर्वाधिक ३५,५०० रु. पर्यंत वाढ झाली. तर याच कालावधीत चांदी प्रतिकिलो १९,५०० रु. वरुन ५३,४०० रु. पर्यंत वाढ झाली.

२००८ मध्ये सोन्याच्या किंमतीत १५.७० टक्के वाढ झाली व चांदीच्या किमतीत १९.०३ टक्के वाढ झाली. २००९ मध्ये सोने १६ टक्के वाढ व चांदीच्या किंमतीत ६.१८ टक्के घट झाली. २०१० मध्ये सोन्याच्या किंमतीत २४.१४ टक्के व चांदीत २२.१६ टक्के वाढ झाली. २०११ मध्ये सोन्याच्या किमतीत ३८.८९ टक्के व चांदीच्या किंमतीत १०१.०३ टक्के वाढ झाली. २०१२ मध्ये सोन्याच्या किंमतीत २८ टक्के वाढ झाली. चांदीच्या किंमतीत सर्वाधिक प्रतिकिलो ७५,५०० रु. पर्यंत वाढ झाल्याने ३७.८० टक्के वाढ झाली. २०१३ मध्ये सोन्याच्या किंमतीत १०.१३ टक्के वाढ झाली. तर चांदीच्या किंमतीत प्रतिकलो ५३,४०० रुपये झाल्याने २९.२७ टक्के घट झाली. २००७ च्या तुलनेत २०१३ मध्ये सोन्याच्या किंमतीत २२८.७० टक्के वाढ झाली. तर याच काळात चांदीच्या किंमतीत १७३.५७ टक्के वाढ झाली. २०१३ मध्ये सोन्याच्या किंमतीत मोठी चढ-उतार झाली असून ते २५४०० पर्यंत येऊन पुन्हा ३२५०० पर्यंत वाढ झाली. जानेवारी २०१४ मध्ये सोन्याची किंमत २९५०० प्रतितोळा असून चांदी ४५४०० प्रतिकिलोपर्यंत आहे.

भारतात किंमतवाढ रोखण्यासाठी RBI ने कायदेशीर रोखता निधी २४ टक्के वरुन २५ टक्के केले आहे. रेपोरेट ४.७५ टक्के वरुन ८टक्के पर्यंत वाढवल आहे. व रिव्हर्स रेपोरेट मध्ये ३.२५ टक्के वरुन ७ टक्के पर्यंत वाढ केली आहे. राजकोषीय धोरणात आयात मर्यादित करण्यासाठी उपभोग्य वस्तूंच्या करात वाढ करण्याबरोबर सोने आयातीवर मर्यादा आणण्यासाठी निर्बंध बसवले आहेत.

निष्कर्ष-

अमेरिकेत सबप्राईम कर्जाच्या संकटामुळे २००८ मध्ये उद्‌भवलेल्या जागतिक आर्थिक पेचप्रसंगाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला आहे. अमेरिकेत मोठी परंपरा असणाऱ्या बँका बुडाल्या मात्र भारतातील बँकांनी बेसल II निकष पाळल्याने भारतीय बँकांवर विपरित परिणाम झाला नाही. भारतीय बँकांची बेसल III कडे वाटचाल चालू आहे. जागतिक

मंदीत भारताच्या विकास दरात घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट वाढल्याने चालू खात्यात सातत्याने तूट वाढत आहे. चालू खात्यावरील तूट कमी करण्यासाठी भारत सरकारने महाग पैशाच्या धोरणाचा अवलंब केला. सोने आयातीवर निर्बंध बसवले असून जकातीचे दर वाढवले आहेत. भारतीय भांडवल बाजारात जागतिक मंदीमुळे चंचल पैसा व निर्वासित पैशामध्ये आंतरराष्ट्रीय परिवर्तन झाल्याने मुंबई शेअर बाजारात मोठे चढ-उतार झाले. पर्यायाने वस्तू बाजारामध्ये वाढ होऊन तेल, सोने, चांदी यांच्या किंमती वाढत आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत अनेक उलथापालथी होत आहेत. यापासून अर्थव्यवस्थेचे संरक्षण करुन अपेक्षित विकास दर गाठण्याचे मोठे आव्हान भारत सरकारपुढे आहे.

भारतात सामाजिक न्यायाबरोबरच बचत व गुंतवणूक वाढून आर्थिक विकासाचा दरही वाढेल, आपण मंदीकडून गतीकडे व गतीकडून प्रगतीकडे जाण्यासाठी बँकांनी प्रभावी भूमिका पार पाडावी लागेल. राष्ट्राची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपली विकासाची नीती आपणास ठरवावी लागणार असून इतर देश याबाबतीत फारशी मदत करु शकणार नाहीत. या पार्श्वभूमीवर भारताने आर्थिक सुधारणांचा 'ट्रॅक वन' व 'ट्रॅक टू' अशा वादात न पडता यामध्ये समन्वय साधून विकास साधावा. बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार राजकोषीय व चलन विषयक धोरणामध्ये सकारात्मक परिवर्तन करावे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपासून भारताला अलिप्त राहता येणार नाही. आर्थिक अरिष्टात देशातील नैसर्गिक व मानवी साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करुन जागतिक स्पर्धेत उतरावे. BRICS संघटनाशी व्यापार वृद्धींगत करुन भारताने डॉलर क्षेत्राकडून युरो झोन कडे अधिक लक्ष केंद्रित करावे. राष्ट्रात गुणात्मक पैसा येण्यासाठी RBI व SEBI ने काळानुसार विशेष प्रयत्न करावे.

## संदर्भ सूची:


१) Misra - Puri, *Indian Economy*, 9th Revised Edition - 2013.

२) Datt Gaurav, Mahajan Ashwini, Sundaram - *Indian Economy*, S. Chand & Co., New Delhi - 2012, pp.32-33.

३) Economic Survey of India - 2012 - 13, pp . 83

४) RBI - Annual Report - 2012 - 13, pp. 50.

५) जी.एन.झामरे, *आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त*, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, जून २००६, पृ.३२८.

६) कवीमंडन विजय, *कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र*, श्री मंगेश - प्रकाशन, नागपूर, २०१२.

७) अर्थसंवाद - जुलै - सप्टेंबर - २०१३ खंड ३७ अंक २, पृ.१८५,१८६.

८) महाराष्ट्र टाइम्स, ९, २७ ऑगस्ट २०१३

९) http://www.comodity market.com, Gold Market.

१०) http://www.stock market.com, Money Control.

# जलस्वराज्य प्रकल्पातील लोकसहभाग व ग्रामीण विकास

**अनघा पाठक, कोल्हापूर,**
विभागप्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र
कमला कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९४२०४९३४२४
ई-मेल : pathakanagha.24@gmail.com

**प्रमिला ज. पाटील, कोल्हापूर,**
संशोधक विद्यार्थिनी,
न्यू कॉलेज.
भ्रमणध्वनी - ९४०३४५३७३०
ई-मेल : vipragourisai@gmail.com

सन १९६० पासून महाराष्ट्र शासनाने ग्रामीण जनतेसाठी शुद्ध व पुरेसे पाणी मिळवून देण्याकरीता कठोर परिश्रम घेतले. भरपूर निधीही खर्च केला. या सर्व परिश्रमानंतरदेखील आज ग्रामीण जनतेचा पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न सुटलेला नाही. कारण शासनाने सुरु केलेल्या पाणीपुरवठा योजना, देखभाल व दुरुस्तीअभावी बंद पडलेल्या होत्या. कारण या योजना शासनाच्या आहेत आमच्या नाहीत अशी जनतेची भावना झाली होती. पुरवठा आधारित योजना राबवताना योजनेपेक्षा पाण्याला महत्त्व दिले. त्यामुळे विहिरीचे, बोअरवेलचे पाणी कमी झाले तरी त्याचे बळकटीकरण पुनर्भरण न करता नवीन विहिरी/बोअर मारायची, नवीन पाणी योजना राबविली जात होती. त्यामुळे या योजनेवर केवळ पैसेच खर्च होत राहीले. मूळ पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष होत गेले. म्हणूनच शासनाने १९६० पासून राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या यशापयशाचा आढावा घेतल्यानंतर राज्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने धोरणात बदल केले. ७३व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्य व्यवस्थेतील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला महत्त्व प्राप्त झाले, त्यानुसार मागणी आधारित लोकसहभागातून ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेचे धोरण

स्वीकारले. त्यानुसार 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' या तत्वानुसार महाराष्ट्र राज्यात सन २००३ मध्ये जलस्वराज्य प्रकल्प स्वीकारला.

**जलस्वराज्य प्रकल्प:**

'लोकांनी लोकांकरीता चालविलेला जलस्वराज्य प्रकल्प होय.' या प्रकल्पामध्ये जास्तीत जास्त सहभाग लोकांचा असतो. गावाने प्रकल्पाच्या निवडीपासून प्रकल्पाच्या अंमलबजावणीपर्यंतच्या सर्व टप्प्यात सहभाग घ्यावयाचा असतो. शासनाने त्याकरीता लागणारा निधी व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन द्यावयाचे असते. या प्रकल्पातून प्रथमच महिलांच्या मताला निर्णयाला महत्त्व देण्यात आले. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर स्वच्छता व महिलांचा विकास या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले.

**लोकसहभागातून जलव्यवस्थापन:**

जलस्वराज्य प्रकल्प महात्मा गांधीजींच्या विचारसरणीनुसार राबविण्यात आलेली योजना असून ज्यामध्ये लोकसहभाग महत्त्वाचा असतो. ज्यांच्यासाठी योजना राबवावयाची आहे त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामील करुन घेणे म्हणजे *लोकसहभाग* होय. हा सहभाग जलव्यवस्थापनात मिळवला जातो. त्याकरीता लोकांच्या मदतीनेच गाव कृती आराखडा तयार करुन पुढील प्रत्येक टप्प्यात गावाचा सहभाग मिळवला जातो. याचा उहापोह खालीलप्रमाणे.

१. पाण्याची गरज आपल्याला किती आहे, याचा प्राधान्यक्रम लोकांच्या मदतीने ठरवणे, उदा. पिण्यासाठी, शेतीसाठी, स्वच्छतेसाठी पाण्याची गरज.

२. आपल्या गावात पाण्याचे स्रोत उपलब्ध आहेत का, त्याची जपणूक व देखभाल कशी करावयाची, नवीन स्रोत किती निर्माण करावे लागतील, ते करणे शक्य आहे काय, असल्यास कशा पद्धतीने त्याची निर्मिती करावी याची माहिती करुन घेणे.

३. गावाला पाणी किती प्रमाणात साठवावे लागणार आहे, त्यावर पाणी वाटपाची पद्धती अवलंबून आहे. पाणी मिळविण्यासाठी करावी लागणारी कामे, त्यासाठी येणारा खर्च, लागणारे मनुष्यबळ, पाईपलाइन इ.विषयी सर्व माहिती करुन घेणे.

४. माहिती मिळाल्यानंतर कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे.

५. कामाच्या उपायांबद्दल जाणीव निर्माण करणे व लोकांकडून वर्गणी व श्रमदान यातील सहभाग वाढविणे.

६. गावाच्या विकासाच्या दृष्टीने उपलब्ध पाण्यात वाढ करणे, त्याचा अभ्यास करुन समुहाने निर्णय घेणे.

७. साधनसामग्रीची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी गावपातळीवर कायमस्वरुपी समितीची नेमणूक करणे.

८. आर्थिक बाबीचे नियोजन, पाणीपट्टी, घरफाळा, लोकवर्गणी, सरकारी देणे, कर्ज यावर नियंत्रण ठेवणे.

९. पाणी समस्येबरोबर गावातील स्वच्छता, आरोग्य सुविधा, कंपोस्ट व गांडूळ खतांची निर्मिती, गृहोद्योग, शेतीपूरक व्यवसाय, शिक्षणाच्या सोयी कशा होतील याचा विचारविनिमय करणे.

गाव कृती आराखडा, सुविधासाठीचे नियोजन, देखभाल दुरुस्ती, प्रत्यक्ष अंमलबजावणी या सर्वात लोकांचा सहभाग आवश्यक आहे. यामध्ये दारिद्र्य रेषेखालील महिला यांचाही निर्णायक सहभाग महत्त्वाचा आहे. लोकांनी लोकासांठी राबविलेली कोणतीही योजना लोकसहभागी योजना होऊ शकते. जलस्वराज्य योजना ही अशीच लोकसहभागावर आधारित आहे.

## जलस्वराज्य प्रकल्प व ग्रामीण विकास:

जलस्वराज्य प्रकल्पाचा मुख्य हेतू लोकांनीच गावाच्या विकासाकरीता योजना राबवावयाची आहे त्यामुळे लोकांचा सहभाग, निर्णय महत्त्वाचा असतो. त्यामुळे लोकांना ही योजना आपलीच आहे असे वाटते. त्यातूनच लोकसहभाग वाढला. ग्रामीण विकासावर त्याचे अनुकूल परिणाम दिसून आले.

१. एकजुटीत वाढ - लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग, या तत्त्वावर जलस्वराज्य प्रकल्प आधारित आहे. लोकांनी मागणी केली तरच गावनिवडीच्या निकषानुसार गावाची निवड केली जाते. गावाची निवड होण्याकरिता लागणाऱ्या निकषांची पूर्तता करण्याकरिता लोक एकत्र येऊ लागते. त्यांच्या एकत्रीकरणातून लोकवर्गणीचे महत्त्व पटवून देऊ लागले. लोकवर्गणी लोकांनी श्रमदानातून, वर्गणीचा दर ठरवून, वर्गणीत गरिबांना सवलत देऊन जमा केली, त्यातूनच त्यांच्यात सहकार्याची भावना निर्माण होऊन एकजूट निर्माण झाल्याचे दिसून येते.

२. जनजागृतीत वाढ - जलस्वराज्य प्रकल्पासाठी गावाची निवड झाल्यानंतर ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्यात करार होतो. गावातील सर्वांचा सहभाग असावा याकरिता जिल्हा परिषदेमार्फत क्षमता बांधणी निधी दिला जातो. या निधीतून गावाने जनजागृती करावयाची असते. त्याकरिता गावातून पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम याचे नियोजन केले गेले. महिला मंडळ, बचतगट, तरुण मंडळ यांच्या सहकार्यातून जनजागृती करुन प्रबोधनात्मक कार्यक्रमाची अंमलबजावणी करुन गावात लोकांचा जनजागृतीत सहभाग वाढलेला दिसून आला.

३. बचतगटाच्या संख्येत वाढ - जलस्वराज्य प्रकल्पातून महिलांचा सहभाग वाढवणे अपेक्षित होते. कारण पाणी हा प्रश्न महिलांशी निगडीत आहे. योजनेच्या यशस्वितेसाठी त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणे अपेक्षित होते. या हेतूने जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत विकास निधी उपलब्ध करुन देऊन दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील बचतगटांची स्थापना होऊन त्यातून महिलांचा सहभाग वाढला. बचतगटामुळे त्यांना घरातून बाहेर पडता आले. विचारांची देवाणघेवाण करता आली. एकजूटीतूनच महिलांनी गावात दारुबंदी, स्वच्छता मोहिम, तंटामुक्त अभियान यशस्वीरित्या राबवली आहेत. प्रकल्पातून मिळालेल्या प्रशिक्षणातून त्यांना शिक्षणाचे, आरोग्याचे, कायद्याचे ज्ञान प्राप्त झाले असून त्याचा उपयोग त्या

आपल्या कुटुंबासाठी, गावाच्या विकासासाठी करताना दिसून येतात.

४. लोकांना जबाबदारीची जाणीव - जलस्वराज्य प्रकल्पातून गावाच्या विकासाचे सर्व अधिकार गावाला दिलेले होते. जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी गावाच्या निर्णयानुसार घ्यावयाची असून त्याच्या देखभालीचा व दुरुस्तीचा खर्च गावांनीच करावयाचा आहे, याची जाणीव लोकांना प्रकल्पातून झाली, त्यामुळे व्यवस्थापन योग्य पद्धतीने व्हावे याकरीता महिलांकडे पाणीपट्टी वसुली, देखरेख, हिशोबाचे काम सोपविण्यात आले, यामध्ये लोकांचा सहभाग महत्त्वाचा होता. त्यामुळेच 'आमच्या गावात आम्हीच सरकार' ही भावना लोकांच्या मनात निर्माण झाली. लोक देखभाल दुरुस्तीकडे लक्ष देत असल्याचे चित्र गावामध्ये दिसू लागले.

५. महिलांच्या सक्षमीकरणात वाढ - जलस्वराज्य प्रकल्पातून प्रथमच महिलांना गावाच्या विकास प्रक्रियेत सहभागी करुन त्यांच्या मताला, निर्णयाला महत्त्व दिले गेले. आपल्या मतांची, विचारांची, निर्णयांची अंमलबजावणी केली जाणार आहे हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. त्यामुळे त्या ग्रामसभेत धाडसाने बोलताना दिसून येत आहेत. जलस्वराज्य प्रकल्पाची माहिती इतरांना देताना कधीही न बोलणारी महिला धाडसाने माहिती सांगताना दिसतात. शासनातर्फे आयोजित प्रशिक्षणाचा लाभ घेऊन त्यातून स्वयंरोजगाराची निर्मिती करुन संसार फुलवताना दिसून येतात. त्यांच्याकडील गुणांची, कौशल्याची ओळख कुटुंबांना झाल्याने कुटुंबातील त्यांचे स्थान उंचावले, त्यामुळे समाजातही तिचा आदर करु लागले. महिलांनाही त्यांच्या हक्काची व कर्तृत्वाची जाणीव या प्रकल्पामुळे निर्माण झाली आहे.

६. राहणीमानाच्या दर्जात वाढ - जलस्वराज्य प्रकल्पामुळे लोकांना पाणीपुरवठ्याच्या सुविधा मिळाल्या. स्वच्छतेच्या सुविधा प्रशिक्षणाच्या सुविधांमुळे महिलांच्या स्वयंरोजगारात वाढ झाली. बचतगटाच्या माध्यमातून उत्पन्नात वाढ झाली. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत गेला. या प्रकल्पामुळे गावागावात प्रबोधन होत असल्याने गावातील लोकांचा मानसिक विकास सुद्धा झाला आहे. त्यामुळे आपोआपच त्यांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ होत गेली.

७. लोकांच्या आत्मविश्वासात वाढ - जलस्वराज्य प्रकल्पामध्ये लोकांच्या सहभागाला प्राधान्य दिले जाते. ग्रामविकासाचे सर्व अधिकार लोकांना दिलेले असतात. निर्णय गावानेच घ्यावयाचे व त्यांची अंमलबजावणी देखील गावाने करावयाची असते. योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती १०० टक्के गावानेच करावयाची असते. त्यामुळे 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' या ब्रीद वाक्याने या प्रकल्पाची अंमलबजावणी झाली. त्यामुळे लोकांच्या

मनात हा प्रकल्प आपलाच आहे ही भावना निर्माण होत आहे. लोकांमध्ये या प्रकल्पामुळे आत्मविश्वास निर्माण होत आहे. आपणही लोकसहभागातून चांगले कार्य करु शकतो हा आत्मविश्वास लोकांच्या मनात निर्माण होत आहे. त्यामुळे गावातील सर्वजण या प्रकल्पात सहभागी होताना दिसत आहे.

८. रोजगारात वाढ - जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी करताना लोकांना तंत्रज्ञान व देखभाल दुरुस्तीसाठी प्रशिक्षण देण्याकरिता विविध सहाय्यकारी संस्थांची निवड करुन त्यांना समाजकार्यात सहभागी होण्याची संधी देण्यात आली. त्यामुळे सहाय्यकारी संस्थेत काम करणाऱ्या लोकांना रोजगार मिळालेला आहे. गावात नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याकरीता लागणारे तांत्रिक कुशल फिटर्स, ऑपरेटर्स, विद्युत पंप दुरुस्त करणारे कारागीर, इलेक्ट्रीकल वायरमन, गवंडी, पुरवठादार, बांधकाम साहित्य सेवा पुरवणारे, कारागीर यांना रोजगाराची संधी मिळाली आहे. जलस्वराज्य प्रकल्पासाठी तांत्रिक पर्यावरणाबाबत अभ्यास आणि मार्गदर्शन करणे, पाणी गुणवत्ता या प्रकल्पात सेवा देऊन रोजगार संधी मिळालेल्या आहेत.

९. महिलांच्यात धाडस व जिद्द निर्माण झाली - जलस्वराज्य प्रकल्पातून आदर्श गावाची माहिती व्हावी याकरीता अभ्यासदौऱ्याचे नियोजन केले जाते, यातील सहभागातून महिलांमध्ये जाणीव जागृती होऊन त्या ग्रामसभांना उपस्थित राहू लागल्या. प्रकल्प पूर्णत्वा नंतरही कार्यक्रमाला त्या उपस्थित राहू लागल्या आहेत. ग्रामसभा व महिला ग्रामसभेत आपले म्हणणे आत्मविश्वासाने मांडण्याचे धाडस करु लागल्या आहेत. निर्णय प्रक्रियेत भाग घेऊन चांगले नेतृत्व करणाऱ्या महिला तयार झालेल्या आहेत.

१०. स्वयंरोजगारात वाढ - जलस्वराज्य प्रकल्पाद्वारे पाणीपुरवठ्या बरोबर महिला विकासावर भर दिला गेला. विकासनिधी उपलब्ध करुन देऊन बचतगटांची निर्मिती केली गेली, त्यातून विविध व्यवसाय करता येऊ शकतील अशा व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यातून महिलांनी त्यांच्या कौशल्यतेनुसार विविध प्रकारचे व्यवसाय सुरु करुन उत्पन्न वृद्धी केली आहे. संसाराला बचतगटांनी हातभार लावला याची कबुली महिला देताना दिसून येतात. आर्थिक सुबत्तेमुळेच कौटुंबिक निर्णयात सहभागी होऊ लागल्या आहेत.

११. कुटुंबातील व समाजातील महिलांचे स्थान उंचावले - कोणत्याही देशाचा विकास हा गावाच्या विकासावर अवलंबून असतो. गावाचा विकास हा कुटुंबातील विकासातून होतो. जलस्वराज्य प्रकल्पाने कुटुंबाचा विकास करण्याची संधी महिलांना उपलब्ध करुन दिली. पाणी आणण्याकरिता त्यांचा जो वेळ वाया जात असे, पाण्याच्या सुविधांमुळे तो वेळ त्या उत्पादक कामासाठी, कुटुंबासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी वापरु लागल्या. त्यांचे आरोग्य उत्तम राहिल्याने त्यांना कुटुंबासाठी उत्पन्नाद्वारे हातभार लावता

आला. त्यांची ही कार्यक्षमता लक्षात घेऊन कुटुंबातून, समाजातून त्यांना मानाचे स्थान मिळू लागले.

**समारोप:**

एकंदरीत जलस्वराज्य प्रकल्पामुळे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली गेली, त्यातून ग्रामीण विकास घडून येतो, हा विकास सक्तीने लादून चालत नाही तर लोकांनी निर्माण करावा लागतो तरच तो विकास चिरंतन टिकत असतो. म्हणजेच ज्या लोकांचा विकास करावयाचा आहे त्या लोकांच्या सभोवतालचे वातावरण, त्यांच्या गरजा, सामाजिक, आर्थिक हितसंबंध लक्षात घेऊनच लोकांच्या विकासाला पूरक असा आराखडा तयार करुन सरकारने तो जनतेच्या हातात द्यावा लागतो. विकासाचा हा दृष्टीकोन लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने २००३ मध्ये मागणीवर आधारित जलस्वराज्य प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पात समाजातील सर्व घटकाच्या तांत्रिक, बौद्धिक, मानसिक कौशल्यांना वाव देणारा असून गावाच्या मालकीचा जलस्वराज्य प्रकल्प आहे. ग्रामविकासाकरिता लोकांनी लोकशाही मार्गाने याची अंमलबजावणी केलेली आहे. त्यामुळेच ग्रामविकासात जलस्वराज्य प्रकल्पाला महत्त्व आहे.

'तुम्हीच वापरा तुमची शक्ती, तुम्हीच घ्या लाभ पुरा' हा जलस्वराज्य प्रकल्पाचा मंत्र खरा ठरला असून ग्रामविकासाची नांदी 'तुम्हीही वापरा' हा यातून संदेश दिला जात आहे.

**संदर्भ सूची:**


१. पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, प्रकाशक-महाराष्ट्र शासन, जलस्वराज्य प्रकल्प २००३, पृ.५-१७.

२. *Jalswarajya Project - Orientation Module for support organization*, Project of Water Supply and Sanitations in Maharashtra prepared by Afpoo Ahmednagar, pp.21 to 29.

३. *U.N. Water Gender Water and Sanitation*, A Policy Brief 2010, pp.3 to 11.

४. *Maharashtra Rural Water Supply and Sanitation*, Govt. of Maharashtra, Water Supply and Sanitations Dept., Jalaswarajya, 2003, Ch.3, pp.43 to 49.

वेबसाइटस्-

१. Maharashtra.gsda.maharashtra.gov.in

२. jalswarajya - www.mahawssd.gov.in

३. World Bank - water.gov.mate

# महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन वास्तवता : स्वयंसहाय्यत्ता समूह एक अवलोकन

**महंमदरफिक उमराव मुलाणी**, शारदानगर,
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र आणि बँकींग.
शारदाबाई पवार महिला महाविद्यालय,
ता. बारामती, जि. पुणे
सदस्य : वाणिज्य, विद्याशाखा,
पुणे विद्यापीठ पुणे.
भ्रमणध्वनी: ९८८११६१८९३

प्राचीन काळापासून भारतीय ग्रामीण वित्तीय व्यवस्था मानवी आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी खासगी तत्त्वावर निर्माण झालेली असून त्यांचे अस्तित्त्व तत्कालीन व्यवस्थेत टिकून आहे. भारतीय ग्रामीण वित्तीय संस्थांचे ग्राहक, कारागीर, सुक्ष्म व्यावसायिक, शेतमजूर, व्यापारी हे असून तत्कालिन परिस्थितीतही वित्तीय पुनर्रचना होऊनही ग्राहक तोच राहिलेला असूनही ग्रामीण कुटुंबे या वित्तीय सेवा-सुविधांपासून वंचित आहेत. तत्कालीन व्यवस्थेत या वंचितांना आणण्यासाठी प्रस्तुत प्रकरणात सुक्ष्मवित्त संस्थांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:**

१) स्व. समूहाच्या संकल्पना, पार्श्वभूमी, वैशिष्टे, प्रकार प्रगती यांचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील वित्तीय समावेशनाची वास्तवतेचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्रातील स्व. समूहामुळे व्यापारी बँकाच्या ठेवी व पतविस्तार वाढलेला आहे त्याचा अभ्यास करणे.

४) स्व. समूहामुळे वित्तीय संस्थांच्या क्षमता बांधणी वृद्धी झालेली आहे त्याचा अभ्यास करणे.

**गृहीतके:**

१) स्व. समूहामुळे वित्तीय संस्थांमध्ये पतविस्तार झालेला आहे.

२) स्व. समूहामुळे वित्तीय क्षेत्रात वंचित आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल

घटकांचा समावेश झालेला आहे.

३) स्व. समूहामुळे लिंगभेदमध्ये समानता प्राप्त होण्यास सूकर होत आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या परिपूर्ततेकरिता दुय्यम स्त्रोताचा अवलंब करून तथ्यसंकलन केलेले आहे. याकरिता नाबार्ड अहवाल, समूहाची प्रगतीदर्शक, ग्रामीण विकास यंत्रणेची अहवाले, मासिके याद्वारे तथ्यसंकलन केलेले आहे.

**प्रतिसादक घटक:**

प्रस्तृत शोधनिबंधासाठी खासगी व राष्ट्रीयीकृत अधिकोषन, पंचायतराज संस्था, स्वयंसेवी संस्था, शासन प्रणाली, स्व. समूहाचे संघटिका, सहसंघटिका व सदस्य, प्रगती अहवाल या घटकांचा प्रतिसाद प्राप्त झाला आहे.

**तथ्यसंकलन विश्लेषणाची साधने:**

तथ्यसंकलनाचे विश्लेषण करण्यासाठी अनुसूचि, तालिका, प्रतिशत, आलेख, सहसंबंध, आकृत्या या साधनांचा अवलंब केलेला आहे.

**माहितीच्या संकलनाचे विश्लेषण:**

१) वित्तीय प्रणाली :

अ) स्वातंत्र्यपूर्व वित्तीय व्यवस्था :

स्वातंत्र्यपूर्व काळात वित्तीय व्यवस्थेमध्ये सावकार, सराफीपेढ्या होत्या. त्यामध्ये सामाजिक वित्तीय व्यवस्थेत मारवाडी, जैन, श्रेष्ठी, पठाण, सोनार इ. घटक व सावकारी यंत्रणा उच्च स्थानी होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात वित्तीय सुविधा देण्यासाठी एजन्सी हाऊसेस स्थापन झाली होती. तसेच, तीन अध्यक्षीय बँका कार्यरत होत्या. त्यांच्या एकत्रीकरणातून इंपिरिअल बँक ऑफ इंडिया निर्माण झाली. नंतर पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक या खासगी तत्त्वावर वित्तीय सेवा पुरवित होत्या. इतिहासकालीन सावकार त्यांचे गैरवर्तन, तत्कालिन सावकाराप्रमाणे असल्यामुळे त्यांना पर्यायी स्पर्धा करू शकणारी संस्थात्मक वित्त व्यवसायाची आवश्यकता म्हणून १९०४ मध्ये सहकारी कायदा पारित होऊन ग्रामीण सहकारी पतसंस्था निर्माण झाल्या आहेत. तसेच १९३५ मध्ये रिझर्व्ह बँक स्थापन झाली आहे.

ब) स्वातंत्र्योत्तर वित्तीय व्यवस्था :

ग्रामीण भागात अल्पभूधारक, सीमांत भूधारक, कारागीर, छोटे व्यावसायिक व व्यापारी यांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी १९६० च्या दरम्यान ग्रामीण भागात अंशदानित कर्जपुरवठा, विशेष कर्जपुरवठा व प्राधान्य कर्जपुरवठा कार्यक्रम सुरू केला. तरीही सावकारी पाशा हा चालूच होता. सहकारी वित्तीय सेवा पर्यायी ठरले नाहीत. त्यामुळे सहकारी वित्तीय संस्थांबाबत वाढता भ्रमनिरास झाला.

स्वातंत्र्यानंतर तीन टप्पे निर्माण झाले. ते पुढील प्रमाणे.

१. १९५० ते १९६५ पर्यंत सहकारी वित्तीय व्यवस्था.
२. १९६५ ते १९९० व्यापारी व ग्रामीण प्रादेशिक वित्तीय संस्था.
३. १९९१ नंतरच्या बँक पुनर्रचना काळात सुक्ष्मवित्त व स्वयंसहाय्यता गट अशी वित्तीय व्यवस्था निर्माण झाली आहे.

सन १९९१ नंतर वित्तीय सुधारणानुसार वित्तीय संस्थांची कार्यक्षमता व उत्पादकता, व्याप्ती वाढवून गरिबांपर्यंत पोहचण्याची क्षमता वृद्धी, संबंधित क्षेत्रांना अधिक पतपुरवठा

कर्जकारण, कर्जघटक, कर्ज ठिकाण याबाबत नियंत्रण शिथिल अशा तरतुदी केल्या. त्यामुळे कर्जपुरवठ्याकडे गरिबी दृष्टिकोणाबरोबर वित्तीय दृष्टिकोन आला आहे. त्यामुळे ग्रामीण वित्तीय सेवांचा विस्तार झाला आहे. १९८० च्या दरम्यान ग्रामीण वित्तीय व्यवस्थेत सुक्ष्मवित्त व्यवस्थेत स्वयंसहाय्यता संकल्पना विकसित होत गेले.

२) सुक्ष्मवित्त संकल्पना :

१) सक्तीची बचत लघुकर्ज, खेळते भांडवल, उपयोग खर्च, गुंतवणूक, स्वयंरोजगार, प्रशिक्षण, विमा, विद्या वेतन, विपणन, पुर्नवित्त, वित्तीय शिस्त, कर्जफेड, कमी खर्च वितरण या गोष्टी अंतर्भूत असतात त्यास सुक्ष्मवित्त म्हणतात.

२) सुक्ष्मवित्त सावकाराप्रमाणे सुलभ कर्जे, कर्जव्यवहारात दिरंगाई न करणारी, उत्पादक, अनुत्पादक कर्जे देणारी कागदी गुंता नसणारी, कर्जकारणांचा समन्वय साधणारी, पारदर्शकता, बचत पतनिर्माण, लोकशाही मार्गाचे व्यवहार, स्वेच्छा सभासदत्व असे अनौपचारिक सहकाराचे अंग म्हणून सुक्ष्म वित्तांचा अवलंब करण्यात आला.

३) स्वयंसहाय्यता समूह संकल्पना :

स्व. गट संकल्पनेची एक सर्वसमावेशक व्याख्या करणे कठीण आहे. गटांच्या प्रकारानुसार उद्दिष्टानुसार व्याख्या वेगवेगळ्या केलेल्या आहेत. स्व. बचतगटाला महिला गट, समूह गट, रोजगार गट, सुक्ष्मवित्त गट, स्वल्पवित्त समूह, स्वावलंबी बचतगट, काटकसर व कर्ज गट, दारिद्र्य रेषेखालील बिगर दारिद्र्यरेषेवरील गट, पुरुषांचे गट या वेगवेगळ्या संकल्पनेतून स्व. बचतगट साकारत आहेत. तसेच समाज सुधारकांच्या व संताच्या दृष्टीने स्व.गट हे समाजसुधारणांचे माध्यम, शासनाच्या दृष्टीने आर्थिक स्व-गट हे समाजसुधारणांचे माध्यम, शासनाच्या दृष्टीने आर्थिक वृद्धीचे साधन, धर्मशास्त्राच्या दृष्टीने परोपकाराचे माध्यम, नीतीशास्त्राच्या दृष्टीने मूल्यांचे व संस्कृतीचे जतन या दृष्टिकोनातून स्व. गटाची संकल्पना स्पष्ट होते.

४) स्वयंसहाय्यता समूहाची वैशिष्ट्ये :

अ) आर्थिक वैशिष्ट्ये :

स्वेच्छा सभासदत्व, काटकसरवृत्ती, मर्यादित सभासद संख्या, आर्थिक देवाणघेवाण, रोखीचा व्यवहार, लाभांचे समान वाटप, स्वनिर्मिती व लवचिक नियमावली, सहकारांचे प्रशिक्षण, सहकाराअंतर्गत सहकार, स्वेच्छा नोंदणी, नियोजनाचा अंगीकार, विधायक कार्ये, स्पर्धेचे शिक्षण, सक्रीय सहभाग.

ब) सामाजिक वैशिष्ट्ये :

समान गरजा व उद्दिष्ट्ये, समानता तत्त्व, एकात्मतेची भावना, समूहशक्तीची भावना, सामुदायिक निर्णय व कृती हक्कांचे व्यासपीठ, विश्वासांचे प्रतीक, मुक्त अभियान समाज परिवर्तनाची साधन, नितीमूल्यांची जपणूक.

क) राजकीय वैशिष्ट्ये :

लोकशाही संघटन, नेतृत्व लोकशाही मूल्याची जपणूक, राजकीय व धार्मिक तटस्थता, दबावगट.

५) स्व. समूहाचे प्रकार :

स्व. समूहाचे मिश्र स्व.समूह, महिला स्व. समूह, पुरुष स्व. समूह, स्वर्णजयंती स्वयंरोजगार समूह-बचत समूह असे प्रकार आहे.

६) स्व.समूहाची पार्श्वभूमी व प्रगती :

भारतामध्ये स्वयं-सहाय्यता बचतगटाची चळवळ म्हैसूर पुनर्निर्धारण आणि विकास एजन्सी (मायराड) (Mysore Resettlement and Development Agencies MYRADA) संस्थेने १९८५ मध्ये सुरू केली. त्यांनी पतव्यवस्थापन गट निर्माण केले. सन १९९३ मध्ये रिझर्व्ह बँकेने कायदेशीर मान्यता दिली. भारतामध्ये प्रारंभी १९९२-९३ मध्ये २५५ स्व. समुहाची स्थापना झाली आहे. या समुहांना ०.२९ कोटी रुपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला होता. आणि नाबार्डकडून त्याला ०.२७ कोटी रुपयांचा पुर्नवित्त सहाय्य लाभले. भारतामध्ये २०१०-११ मध्ये एकुण ११,९६,१३४ स्वयंसहाय्यता समूह स्थापन झालेले आहे. एकूण ८०,१८,४८२ गट निर्माण झाले आहेत. तसेच एकूण वित्तसाह्य ०.२९ कोटी रुपयांवरून ४५१६१.४४ कोटी रुपये झालेले आहे. यावरून सिद्ध होते की, भारतात या चळवळीला सरकार, वित्तसंस्था, समाज यांनी पाठिंबा दिल्यामुळे जोमाने वृद्धी होत आहे.

७) महाराष्ट्रातील स्व. समूहाची प्रगती:

महाराष्ट्रामध्ये स्व. समूहाची आर्थिक लक्ष्यप्राप्ती गेल्या पाच वर्षात सातत्यपूर्ण वृद्धी करीत आहे. या वृद्धीच्या यशप्राप्तीमध्ये नाबार्ड विविध बँका, सरकारी विभाग, स्वयंसेवी संस्था सहभागी समाज व सातत्यपूर्ण प्रयत्न हे घटक कारणीभूत दिसून येतात. महाराष्ट्रामध्ये सुक्ष्मवित्तर्गत स्व.समूहाची प्रगती पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. १

महाराष्ट्रातील सुक्ष्मवित्तर्गत स्वयंसहाय्यता समूहाची प्रगती

| तपशील | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| अ) बचत | | | | | |
| १) बचत करणारे गट संख्या | १७००६५ | ६८५३२४ | ७७०६९५ | ७६०१६१ | ८२८०४७ |
| २) रक्कम लाख | ८१५५.२३ | ५९३२५.२२ | ५६८२८.०२ | ६४७७९.२७ | ७२३६१.७५ |
| ब) कर्ज | | | | | |
| १) कर्ज घेतलेले गट संख्या | ३८४३२ | ६९३११ | ११०२८७ | ६३२९६ | ६८३९६ |
| २) रक्कम लाख | १६४४८.२८ | २३७३२.६२ | ५१२८४ | ५१२२६.८९ | ६०१८०.०२ |
| क)Outstanding गट संख्या | ७३८०८ | ३५३५६६ | ३८४७६५ | २३२८३५ | २४१०१२ |
| २) रक्कम लाख | १५०५४ | १४२२५३.२३ ९९ | १२०३३० ८९ | १०४४८१ ९९ | ११६२५३ |
| ड) थकीत NPA स्थूल रक्कम | -- | ७८७८.५९ (५.८%) | ५६३२.५९ (४.६८%) | ८१६२.३५ (७.८१%) | १०३३९.५८ (८.८९%) |

तक्ता क्र. १ वरून असा निष्कर्ष की, सन २००७ - ०८ आणि सन २००८-०९ या सालात बचत करणाऱ्या गटसंख्येपेक्षा कर्ज घेणाऱ्या गटसंख्येचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे या कालावधीत बचत रक्कमेपेक्षा कर्ज रकमेचे प्रमाण जास्त आहे. परंतु सन २००८-०९ या सालापासून ते २०११ - १२ पर्यंत बचत रक्कम आणि कर्जरकमेत फार विषमता दिसून येते. बचत रक्कम ही कर्जरकमेपेक्षा जास्त दिसून येते. याचा अर्थ व्यापारी बँकाकडे स्वयंसहाय्यता समूहाची बचत रक्कम शिल्लक आहे. त्यामानाने कर्ज फार कमी प्रमाणात देतात. या रकमेतून कायदेशीर रोखता प्रमाण आणि रोख राखीव प्रमाण वजा केले तरी बचत रक्कम शिल्लक राहते. म्हणजे व्यापारी बँकांना स्वयंसहाय्यता समूह तारतात. व्यापारी बँकाकडे गटांची रक्कम अधिक असल्यामुळे कमी व्याजदरात कर्जपुरवठा प्रलोभने देतात. वेळप्रसंगी शून्य व्याजदराने प्रलोभने देतात. महाराष्ट्रामध्ये दारिद्र्यरेषेतील स्व. समूहांना सवलतीत वित्तीय साह्य, अनुदान वाटप करून दारिद्र्यनिर्मूलन करण्यात येत आहे. SGSY अंतर्गत महाराष्ट्रामध्ये स्व. समूहाची प्रगती पुढील प्रमाणे

वरील तालिकेवरून स्पष्ट होते की, दारिद्र्यरेषेतील स्व.गटांची गेल्या वर्षातील वाढ दुप्पट झाली आहे. त्यांची बचत रक्कम दीड पट वाढविली आहे. त्याचप्रमाणे दारिद्र्यरेषेतील कर्ज घेणाऱ्या गटांची संख्या वाढलेली असून कर्जाचे प्रमाण दुप्पट झालेले आहे. तसेच Out Standing गटसंख्या दुप्पट असून रकमेत वाढ झालेली

तक्ता क्र. २

### महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेतील स्व. गटाची प्रगती

| तपशील | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| अ) बचत | १२६५७ | १२६२४१ | १४६६६९ | १५१३४२ | ११०८३१ |
| १) बचत करणारे गट संख्या | | | | | |
| २) रक्कम लाख | ९६५९.१३ | १०१४९.०५ | २७५९.५५ | ९११०.५८ | १२१८७.५७ |
| ब) कर्ज | १५९७१ | १८२२१ | २१२१७ | १४१६२ | १८६३५ |
| १) कर्ज घेतलेले गट संख्या | | | | | |
| २) रक्कम लाख | १४११४.०६ | १२७८१.६७ | १६०१८.६४ | १६६१.१५ | २८२०६.०८ |
| क)Outstanding गट संख्या | ४९०६५ | ७०४३८ | ७६७४४ | ६६८७४ | ७७३५१ |
| २) रक्कम लाख | ५२२२३.६ | ५९५९६.६२ | ४७४८५.२५ | ३८३८४.४७ | ५६८४५.०६ |

आहे. म्हणजे स्व. समूहमार्फत दारिद्र्य निर्मूलन करणाऱ्या स्व. गटांपेक्षा कर्ज स्व. गटांची संख्या तुलनेने फार कमी आहे. त्याचप्रमाणे बचत रकमेपेक्षा कर्ज रकमेचे प्रमाण जास्त आहे. याचा अर्थ वित्तीय संस्था दारिद्र्यनिर्मूलन करण्यास सक्रीय सहभागी आहेत. त्याचप्रमाणे महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचतगटाचे महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रामध्ये सरकारी विभाग, स्वयंसेवी संस्था, राजकीय व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते हे महिला सबलीकरण करण्याकरिता प्रबोधन करीत आहे. त्यासाठी वित्तीय मदत देण्यात येते. सुक्ष्मवित्ततर्गत महिला सबलीकरण करण्यात येते. त्यांची गेल्या पाच वर्षात प्रगती पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्त्यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात बचत करणाऱ्या महिला गटांची संख्या सुमारे अडीचपट वाढलेली आहे आणि त्यांची बचत रक्कम अडीचपटीने वाढलेली आहे. तसेच कर्ज घेणाऱ्या महिला गटांचे प्रमाण सन २००७-०८ ते सन २००९-१० पर्यंत वाढलेले आहे. परंतु सन २०१०-११ आणि सन २०११-१२ मध्ये हे प्रमाण घटलेले दिसून येते. त्याचप्रमाणे कर्जरक्कम अनुक्रमे प्रारंभी वाढलेली असली तरी शेवटी हे प्रमाण कमी झालेले दिसून येते. कारण की महिला बचतगटांची सुरुवात वेगाने झाली. परंतु प्रबोधन आणि मार्गदर्शन निश्चित स्वरुपात मिळालेले नाही. त्यामुळे महिला गट विस्कळीत होण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे कर्ज घेणाऱ्या गटाचे प्रमाण कमी झालेले आहे. कर्ज रक्कम कमी झाली आहे. तसेच सन २००७-०८ ते २०११-१२ पर्यंत बचत रकमेपेक्षा कर्ज रक्कम प्रमाण जास्त दिसून येते. याचा अर्थ महिला सबलीकरणात महत्त्वपूर्ण योगदान सुक्ष्मवित्त प्रणालीचे आहे. त्यामुळे महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचतगटाची चळवळ संख्यात्मक आणि गुणात्मक वाढत आहे.

तक्ता क्र. ३

महाराष्ट्रातील सुक्ष्मवित्तर्गत महिला स्व. गटाची प्रगती

| तपशील | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| अ) बचत<br>१) बचत करणारे गट संख्या | २५०४०० | ४५५९७५ | ५१११८७ | ५१२४६२ | ५६८९०७ |
| २) रक्कम लाख | १८५२१.२० | ३८५८२.०२ | ३४३८३ | ३८५८१.३४ | ४८३८६.३३ |
| ब) कर्ज<br>१) कर्ज घेतलेले गट संख्या | ६०४५९ | ८९०१८ | ८११८३ | ४७.६३ | ५२१६२ |
| २) रक्कम लाख | २४३१६.४८ | ३८९३४.३० | ४०४६०.५७ | ३७७३७५.४८ | ४३६०४०.०३ |
| क) Outstanding गट संख्या | ३५०४०५ | २१२४१२ | २४२४१३ | १८९७४० | १६३९४७ |
| २) रक्कम लाख | ६८९१४.५३ | १०४४३४.१६ | ९९४१७.४३ | ८३४६२९९ | ११६२९.४५ |

संदर्भ :

1) Ghanekar V.V., *Self Help Groups* Institution of Rural Development, Pune Jan- 2006.
2) J.F. Patil, V.S.Patil *Theory and Practice of Micro-Finance*, Shivaji University, Kolhapur. August. 2005.
3) Karamkar K. G. *Rural Credit and Self Help Groups-Micro Finance Needs and Concepts in India* Saga Publication, India Pvt. Ltd. New Delhi, 1999.
4) Reserve bank of India : Linking Self Help Group with Banks - Working Group on NGO, Mumbai. 1996, pp.26,27
5) Mulani M. U. *Self Help Groups & Empowerment of Women,* Manas Publication, Jaipur Ed. 2012, pp. 275-279.

६) दासगुप्ता कविता, देसाई रविंद्र, *महिलांचे सबलीकरण - दारिद्र्य निर्मूलन व स्वयंसहाय्यता गट*

७) मुलाणी एम्. यु. *अल्प बचत नियोजन (बचतगट)*, डायमंड प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती नोव्हें. २००८, पृ.३३,३५,३७,३८.

# अर्थसंकल्प २०१४-१५ व कृषीक्षेत्र एक विश्लेषण

**मारोती सुभाष सूर्यवंशी**, कराड,
सहाय्यक प्राध्यापक,
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९५२७९११९७४७

एन.डी.ए. सरकार नव्याने सत्तेवर आल्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी पहिल्यांदाच अर्थसंकल्प सादर केला. अर्थव्यवस्थेची घसरलेली गाडी पुन्हा रूळावर आणण्यासाठी काही महत्त्वाची पावले या अर्थसंकल्पात टाकली आहेत, असे जेटली यांनी स्पष्ट केले. येत्या दोन ते तीन वर्षात अर्थिक विकासाचा दर सहा टक्क्याच्या आसपास गाठणे शक्य होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. हा अर्थसंकल्प मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा आहे असे म्हटले जाते. या अर्थसंकल्पात २०२२ पर्यंत सर्वांना घर, नोकरदारांना उत्पन्न कराच्या बाबतीतील दिलासा, विमा व संरक्षण क्षेत्रात ४९% एफ.डी.आय.ला मान्यता, ज्येष्ठ नागरिक पेन्शन योजना, नद्या जोड प्रकल्पाचे पुनरूज्जीवन, किसान टी.व्ही., नमामी गंगा योजना, पायाभूत सुविधांसाठी भरीव तरदूत, बेटी बचाओ बेटी पढाओ, स्किल इंडिया इ. अनेक महत्त्वपूर्ण निर्णय या अर्थसंकल्पामध्ये घेऊन आर्थिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला असला तरीदेखील खऱ्या अर्थाने विकासाच्या चाकांची गती व संपूर्ण अर्थव्यवस्थेचा डोलारा ज्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे त्याला या अर्थसंकल्पात कितपत न्याय दिलेला आहे हे पाहणे देखील महत्त्वाचे आहे. म्हणून सदरच्या लेखामध्ये २०१४-१५ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा कृषी क्षेत्राला फायदेशीर का नुकसानकारक ठरणार आहे त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे:

## २०१४-१५ अर्थसंकल्प व कृषी क्षेत्र:

सरकारने कृषी क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पात नवनवीन उपक्रम राबवण्याची योजना आखली आहे. उदा. खाद्यान्नाच्या वाढत्या किंमतीला आळा घालणे,

सिंचनासाठी निधी, कृषी उत्पादनासाठी राष्ट्रीय बाजारपेठ, नवीन कृषी विद्यापीठे, संशोधन संस्थाची स्थापना, किसान वाहिनी इ. महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन कृषी विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**कृषी क्षेत्र व तरतूदी:**

१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना:

झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेसे अन्नधान्य पुरवण्यासाठी तसेच अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी कृषी क्षेत्रातील उत्पादन व उत्पादकता वाढणे गरजेचे आहे. परंतु त्याकरिता शेतीला सिंचनाची गरज आहे. आज भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी केवळ ४७% क्षेत्रफळ सिंचनाखाली आहे. त्यामध्ये अधिक वाढ होण्याच्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची घोषणा करण्यात आली आहे व त्यासाठी १००० कोटी रु. ची तरतूद केली आहे. यामुळे कृषी सिंचन क्षेत्रात वाढ होऊन एकूण उत्पादनात सुध्दा वाढ होईल.

२)शेतकऱ्यांना आठ लाख कोटी कर्ज:

शेतकऱ्यांना विविध अवजारे, बी-बियाणे खरेदी करता यावेत तसेच शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवलाची गरज भासते. ती पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना आठ लाख कोटींचे कर्ज पुरवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्याचबरोबर जे शेतकरी वेळेवर कर्ज फेडतील त्यांना ३% व्याजदराने कर्जपुरवठा केला जाणार आहे. यामुळे शेतीमधील आधुनिकीकरणाला चालना मिळेल. त्यामुळे कृषी उत्पादनात भरघोस वाढ होईल व खासगी सावकारीला आळा बसेल.

३) पायाभूत सुविधा:

कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी रु.५००० कोटी ची तरतूद केली आहे. यामधून धान्यांची साठवणूक करण्यासाठी गोदामे बांधण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना धान्य सुरक्षित साठवणे शक्य होईल. परिणामी धान्याची नासाडी न होता चांगला भाव मिळेल.

४)भूमिहीन शेतकऱ्यांना नाबार्डचे अर्थसहाय्य:

जे भूमिहीन शेतकरी आहेत त्यांना जमीन विकत घेता यावी यासाठी नाबार्ड अर्थसहाय्य करणार आहे. त्यामुळे जमीन कसणाऱ्यांच्या संख्येत वाढ होईल व शेती क्षेत्रातील उत्पादन व उत्पादकता वाढेल.

५) शेतजमीन आरोग्य योजना:

या योजनेनुसार शेतजमिनीतील माती परीक्षण करण्यात येणार आहे. त्याकरिता देशभरातील प्रयोगशाळेसाठी रु. ५६ कोटी ची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्याची जमीन परीक्षण साक्षरता वाढेल. परिणामत: पीकरचना बदलण्यास मदत होईल. त्याचबरोबर शेतकऱ्यासाठी हेल्थ कार्ड योजना सुरू केली आहे. त्यासाठी १०० कोटी रूपयाची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आरोग्य चांगले राहणार आहे.

६) संशोधन संस्थांची स्थापना:

शेतीमध्ये सातत्याने नवनवीन बदल घडवून आणणे, नवीन तंत्रज्ञानाचा, बियाण्यांचा, खतांचा शोध लावून शेती उत्पादनात भरघोस वाढ करण्यासाठी भारतीय कृषी संशोधन संस्थांच्या धर्तीवर आसाम आणि झारखंड येथे दोन संशोधन संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. त्यामुळे कृषी संशोधनाला अधिक गती मिळेल

याकरिता १०० कोटी रु.ची तरतूद करण्यात आली आहे.

७) कृषी विद्यापीठ व फलोत्पादन विद्यापीठ स्थापना:

देशभरातील कृषी विकासाची प्रादेशिक विषमता भरून काढण्याच्या दृष्टिकोनातून आंध्रप्रदेश व राजस्थान येथे प्रत्येकी एक कृषी विद्यापीठाची स्थापना केली जाणार आहे. याकरिता रु.२०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर तेलंगण आणि हरियाणा येथे दोन फलोत्पादन विद्यापीठे स्थापन केली जाणार आहेत.

८) शेतकऱ्यांसाठी 'किसान वाहिनी':

शेती व शेतीशी संबंधित अन्य क्षेत्राची माहिती शेतकऱ्यांना मिळावी यासाठी सरकारकडून लवकरच 'किसान वाहिनी' ही खास शेतकऱ्यांसाठीची टी.व्ही. वाहिनी सुरू करण्यात येणार आहे. याकरिता रु. १०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे शेतकऱ्यांना शेतीविषयी म्हणजेच लागवडीविषयी, बियाण्यांविषयी, खतांविषयी, बाजारपेठा, पाणी व्यवस्थापन, माती परीक्षण इ. माहिती मिळाल्यास शेतकरी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करेल. त्याच्या माध्यमातून शेतीमध्ये गुणात्मक बदल दिसून येतील. आज खऱ्या अर्थाने गरीब शेतकऱ्याला प्रबोधनाची गरज आहे. ती गरज या कृषी किसान वाहिनीच्या माध्यमातून पूर्ण होईल असे वाटते.

९) पर्यावरण व शेती:

आज बदलत्या पर्यावरणाचा शेतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी १०० कोटी रु.ची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे पर्यावरणीय बदलांचा शेतीक्षेत्रावरील प्रतिकूल परिणाम कमी करता येईल.

वरीलप्रमाणे कृषी क्षेत्राशी संबंधित तरतुदी या अर्थसंकल्पात केल्या गेल्या आहे. यामधून कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळू शकते. तरीदेखील २०१४-१५ अर्थसंकल्पामध्ये परिपूर्ण कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टिकोनातून काही उणिवा दिसून येतात त्या खालीलप्रमाणे:

उणिवा:

१) आजची शेती क्षेत्राची परिस्थिती भयंकर आहे. उदा. संभाव्य दुष्काळ व शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या याबाबत या अर्थसंकल्पात वेगळी तरतूद दिसून येत नाही.

२) आज शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. परिणामतः शेती उत्पादनाच्या खरेदी विक्री संदर्भात, विशेषतः कृषी उत्पादन बाजार व वायदे बाजार याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका दिसून येत नाही.

३) शेतकरी उत्पादन घेताना निसर्गाची व बाजारपेठेची जोखीम स्वीकारतो त्याला सुरक्षित करण्यासाठी व्यापक उत्पन्न विमा देणे आवश्यक आहे. मात्र याबाबत कोणताही विचार दिसून आलेला नाही.

४) शेतीच्या विकासाचा दर वाढविण्यासाठी शेतीमध्ये आज धोरणात्मक बदलाची गरज आहे. केवळ तात्पुरत्या उपाययोजना करून चालणार नाही.

५) आज कृषी क्षेत्रात मोठा बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून दुसऱ्या हरितक्रांतीची गरज आहे. मात्र दुसऱ्या हरितक्रांतीच्या बाबतीत कोणतीही स्पष्ट भूमिका दिसून येत नाही.

६) देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या केवळ ४७% क्षेत्रफळ सिंचनाखाली आहे. त्यामध्ये अधिक वाढ करायची असेल तर केवळ रु.१००० कोटीचा निधी पुरेसा नाही.

वरीलप्रमाणे काही उणिवा कृषीक्षेत्राच्या बाबतीत दिसून येतात.

२०१४-१५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये सरकारने अनेक योजना नव्याने सुरू करून अर्थव्यवस्थेची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. कृषी क्षेत्रासाठी माती परीक्षण, किसान वाहिनी, हेल्थ कार्ड, किसान विकास पत्र, पायाभूत सुविधात वाढ असे काही निर्णय घोषित केलेले आहेत. त्याचा निश्चितच कृषीक्षेत्राच्या विकासावर परिणाम होणार आहे. परंतु आज कृषीक्षेत्रापुढे अनेक आव्हाने आहेत. उदा. संभाव्य दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अन्नधान्याच्या वाढत्या किंमती, घटते उत्पादन इ. यावर उपाययोजना करण्यासाठी कृषी क्षेत्रात खऱ्या अर्थाने धोरणात्मक बदलांची गरज आहे असे धोरणात्मक बदल या अर्थसंकल्पात दिसून येत नाहीत. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या जीवनात 'अच्छे दिन' येण्यासाठी आणखी एक वर्ष वाट पहावी लागते का काय असे वाटत आहे.

**संदर्भ सूची:**


१) मिनिस्ट्री ऑफ फायनान्स (२०१४) इंडियन बजेट २०१४-१५ मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, न्यू दिल्ली.

२) दै. लोकमत, सातारा दि. ११ जुलै २०१४, पृ.१,३.

३) दै. पुढारी, सातारा दि. ११ जुलै २०१४, पृ.१.

४) दि इकॉनॉमिक्स टाईम्स, मुंबई दि. ११ जुलै २०१४, पृ.२,३,४.

# मानव अधिकार आणि भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती

**गजानन भारती**, अमरावती,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ८६०५२६९७३२

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने बरीच प्रगती साध्य केली आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने शेतीक्षेत्र, उद्योगक्षेत्र व सेवाक्षेत्राचा मोठावाटा राहिलेला आहे. विस्तीर्ण भूक्षेत्र, विशाल व उदारमतवादी लोकशाही देश,विशाल लोकसंख्या असलेला देश म्हणून सातत्याने जगाचे लक्ष भारताकडे असते. त्यातच भारताचीआजवरची प्रगती पाहता भारत २०२० मध्ये महासत्ता होणार हे माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचे भाकीत सत्यातही उतरेल याबाबत शंका नाही. भारत हा कृषी प्रधान देश आहे. आज १२२ कोटीच्या वर लोकसंख्या असलेल्या भारतात ५७ प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे, म्हणजे यामध्ये प्रामुख्यान शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. आणि म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात त्यांचा सहभागही मोठा आहे. अशा या जगाच्या पोशिंद्याला सर्वांचा अन्नदाता असलेल्या शेतकऱ्याला नविन आर्थिक सुधारणांच्या काळात १९९१ ते २०१३ पर्यंत म्हणजे गेल्या २२ वर्षाच्या काळात भारतात २.५ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या मग एवढ्या प्रचंड आत्महत्याला सामोरे जावे लागणे हे कितपत न्याय आहे. आणि म्हणूनच म्हणावे लागते की त्याला जीवन जगण्याचा अधिकार नाही का? मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असतांना त्यांच्या मदतीला योग्य वेळी कुणीच कसे धावत नाही. ही बाब किती लाजिरवाणी आणि मानवी संस्कृतीला काळीमा फासणारी ऐतिहासिक घटना आहे असेच म्हणावे लागेल. त्यांनी का कराव्यात आत्महत्या, आपलेच भाऊबंद असलेल्या अन्नदात्याला का असे पाऊल उचलावे लागले? एवढे निष्ठूर आणि निर्दयी आपण झालो आहोत का? यावर सामाजिक न्याय दृष्टीकोनातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न

या शोधनिबंधात केला आहे.

**मानवीहक्क कायदे व शेतकऱ्यांचे अस्तित्व:**

निसर्ग नियमानुसार प्रत्येक व्यक्तीला जन्मताच सर्व मूलभूत अधिकार प्राप्त होतात आणि त्याच्या मृत्यूनंतरच ते संपतात म्हणून व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी. संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ रोजी *मानवी हक्काचा जाहीरनामा* मंजूर केला. भारतात मानवी हक्क आयोगाची स्थापना १९९३ मध्ये झाली. राष्ट्रीय आणि राज्य पातळी वरून त्याची कार्यप्रणाली चालते. पण शेतकऱ्यांच्या बाबतीत हा आयोग हजारो मैल दूर असल्याचे दिसून येते.

भारतीय राज्यघटनेने मानवाला जे मुलभूत अधिकार प्रदान केलेले आहेत त्यापैकी 'जीवन जगण्याचा अधिकार' हा कलम २१ मध्ये अंतर्भूत आहे. मानवी हक्काची सनद सांगणारी घटना असा मान भारतीय राज्यघटनेने मिळविला आहे. मानव अधिकार घोषणेच्या कलम '३' नुसार प्रत्येक व्यक्तिला जगण्याचा अधिकार असेल असे सांगितले आहे. म्हणून माणूस जगला तरच त्याला इतर अधिकारांचा उपयोग घेता येतो. म्हणून जगणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मानवाच्या सर्व हक्कापैकी जगण्याच्या अधिकाराला अनन्य साधारण महत्त्व आहे. मग या ठिकाणी शेतकऱ्यांना आपल्या अस्तित्वाबात व अधिकाराबाबत एवढी अनभिज्ञता का रहावी?

भारतीय राज्यघटनेनुसार कोणत्याही व्यक्तीच्या जीवनाचे किंवा त्याच्या व्यक्ती स्वातंत्र्याचे कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीचा अवलंब केल्या शिवाय कुणालाही हरण करता येणार नाही, असे कलम २१ मध्ये नमूद आहे. तसेच न्यायालयानेही जगण्याच्या अधिकाराचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यानुसार केवळ शारीरिक अस्तित्व टिकविण्यापूरताच जगण्याचा अधिकार मर्यादित नाही, तर हे अस्तित्व सन्मानपूर्वक असले पाहिजे. प्रत्येक माणसाला ज्या किमान सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, तशा पद्धतीने त्याला जगता आले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने जीवन चांगल्या प्रकारे जगता येईल. मात्र शेतकऱ्यांना असे सन्मानाने व योग्य आर्थिक स्थितीत आपले जीवन जगता येईल अशी आज स्थिती राहिली नाही आणि म्हणूनच शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत याची प्रमुख कारणे अशी आहेत. शेतीबाबत शासनाचे अकार्यक्षम व दुर्लक्षित धोरण, बाजारयंत्रणेतील त्रुटी, व्यापारी वर्गाचा फसवा व्यवहार, शेतकऱ्यांचे असंघटन, अज्ञान, माल विकण्याची निकड, कर्जबाजारीपणा, जागतिक स्पर्धा, उत्पादनाच्या तुलनेत अधिक खर्च, निसर्गाचा लहरीपणा, हमी भावाचा अभाव इत्यादी.

इतर व्यवसायात शोधून सापडेल असे आत्महत्या केलेले एकही उदाहरण नाही कारण शेती व्यवसायाच्या तुलनेत इतर व्यवसाय अत्यंत चांगल्या स्थितीत आहेत. म्हणून ते व्यवसाय करणारे व्यावसायिक उत्तम स्थितीत आहेत. जसे उद्योगपती, व्यापारी, डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, आय.ए.एस., आय.पी.एस. किंवा क्लर्क, शिपाई यापैकी कुणीतरी आपल्या आर्थिक हलाखीमुळे आत्महत्या केली असेल तर शपथ, मग शेतकरीच का?

शेतकऱ्यांचे हनन, मानहानी आणि आर्थिक लूट (नुकसान) निसर्गाबरोबरच मानवानेही केलेले आहे. त्यामध्ये ऐतिहासिक शासन प्रणाली जसे मुघल, निजाम, इंग्रज,

सरंजामदार, जमिनदार, तसेच अलिकडे सावकार, व्यापारी आणि अडते यांचा भरणा पाहावयास मिळतो. यासाठीच शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक व त्यांच्या अस्तित्वाशी संबंधित स्थितीचे अध्ययन, चिंतन व संशोधन करण्याची आज खरी गरज आहे.

**शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा:**

मानवी हक्क कायदे व राज्य घटनेनुसार प्रत्येकाला एक विशिष्ट उत्पन्न प्राप्त करण्याचा अधिकार आहे. तोच अधिकार जेव्हा त्याला मिळत नसेल तर त्याने कुणाकडे दाद मागावी. समन्याय, स्वातंत्र्य आणि आपले अस्तित्व टिकवण्यासाठी तो होरपळून निघतो अशा समाज मनाला हेलावून टाकणाऱ्या, शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा हा आढावा-

भारतात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्याचे मुख्य कारण म्हणजे कर्जबाजारीपणा हे आहे. कर्जबाजारी होण्याचे मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या आपल्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी येणारा उपभोग खर्च, हा त्याच्या उत्पन्नापेक्षा अधिक आहे आणि म्हणून शेतकरी कर्ज काढतात. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला मागणी वाढेल, निर्यात वाढेल व उत्पन्नात वाढ होईल असे वाटत होते पण तसे झाले नाही. शेतकऱ्यांना शेती पासून प्राप्त होणारे उत्पन्न व शेतीसाठी करावा लागणारा खर्च यात मोठी तफावत आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी कर्जे काढतात आणि कर्जबाजारी बनतात. जागतिकीकरणात शेतीच्या उत्पादनाला भाव वाढून मिळण्याची अपेक्षा धूसर आहे. मात्र शेतीसाठी लागणारे आदान जसे बी-बियाणे, खते, औजारे, यंत्रसामुग्री, औषधे यांचे भाव मात्र सतत वाढत गेले म्हणून शेतकरी दारिद्र्यात ढकलला गेला व कर्जबाजारी बनला या संदर्भात एन.एस.एस.ओ.ने केलेल्या सर्व्हेनुसार भारतात शेतकऱ्यांचे सरासरी वार्षिकउत्पन्न रु.११,६२८ इतके आहे. त्यात शेतीपासूनचे (४५ प्रतिशत) मजुरी पासून (३९ प्रतिशत) तर पशुधनापासून (१६ प्रतिशत) उत्पन्न मिळते म्हणून शेतीपासूनचे उत्पन्न वजा शेतीचा लागवड खर्च बरोबर निव्वळ उत्पन्न (११६२८ - ८७९१= २८३७) येथे २८३७ निव्वळ उत्पन्न शेतकऱ्यांच्या सर्व गरजा (वार्षिक) कशा पूर्ण होतील आणि म्हणून आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी शेतकरी कर्जे काढतात व कर्जाच्या सापळ्यात अडकतात हीच बाब खरी चिंतनाची आहे. कारण अल्प उत्पन्न, कर्जाचे हप्ते, व्याज यामध्ये गुरफटतो आणि एक वेळ कर्जासाठी कर्ज काढायला सुरूवात करतो व दारिद्र्याच्या महाखाईत ढकलला जातो.

जागतिकीकरणाच्या काळातच भारतात ग्रामीण कुटुंबाची कर्जे वाढली आहेत. सन १९९१ मध्ये ग्रामीण कर्जाचे प्रमाण २२,२११ कोटी रूपये होते ते वाढून २००७ मध्ये १,११,४४८ कोटीवर गेले ही वाढ पाचशे पटीपेक्षाही अधिक होती. त्याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्रात विदर्भातील शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून सर्वाधिक आत्महत्या केल्या आहेत.

अखिल भारतीय पातळीवर निवडलेल्या एकूण शेतकरी कुटुंबापैकी ४८.४६ प्रतिशत शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी आहेत व दरडोई कर्जाची रक्कम रू. १२,५८५ इतकी आहे.

काही प्रगत राज्यातील कर्जाचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे-

| | | |
|---|---|---|
| १) | आंध्रप्रदेश | ८२ % |
| २) | तामिळनाडू | ७५.५ % |
| ३) | पंजाब | ६४.४ % |
| ४) | केरळ | ६४.४ % |
| ५) | कर्नाटक | ६१.६ % |
| ६) | महाराष्ट्र | ५४.८ % |
| ७) | हरियाणा | ५३.१ % |

वरील राज्य हे प्रगत राज्य असून सुद्धा कर्जाचे प्रमाण हे अधिक असल्याचे दिसून येते कारण येथील शेतकऱ्यांचा उपभोग खर्च हा त्यांच्या उत्पन्नापेक्षा अधिक राहिला आहे.

शेतमालाच्या उत्पादन वाढीसाठी आवश्यक वित्तीय व्यवस्था, बी-बियाणे, सिंचन सुविधा मध्ये पर्याप्त बदल केले गेले नाहीत म्हणून कृषी विकास दर घटत गेला. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या अहवालानुसार १९८५ ते १९९५ या काळात भारतात कृषी विकासाचा दर ३.६२ प्रतिशत होता व १९९५ ते २००५ पर्यंत १.८५ प्रतिशत म्हणजे निम्म्यावर आला. याबाबत महाराष्ट्राची स्थिती अधिक गंभीर आहे. कारण १९९५-२००५ या काळात महाराष्ट्रात कृषी उत्पादन वाढीचा दर ०.१० प्रतिशत एवढा होता.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी ज्या आत्महत्या केल्या त्यात विशेषतः विदर्भ व मराठवाड्यात अधिक झाल्यात. इ.स. २००३ मध्ये झालेल्या आत्महत्यापैकी ८२ प्रतिशत विदर्भातील शेतकऱ्यांच्या होत्या. पुढील काळात सुद्धा ७३ प्रतिशत आत्महत्या याच विभागातील शेतकऱ्यांनी केल्या. भारतात २००६ मध्ये १७,०६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी ४४५३ शेतकरी (२७ प्रतिशत) महाराष्ट्रातील होते. यावरून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती किती दयनीय होती हे लक्षात येते. यावरून येथे मानवी अधिकार व सामाजिक समन्यायाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. तो इतर सामान्य माणसासारखा जगू शकत नाही का? त्याला समाजात न्याय देता येत नाही का? असे एक ना अनेक प्रश्न आज उपस्थित होतात याची गांभिर्याने दखल घेण्याची नितांत गरज आहे.

भारतात अल्प व सिमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ६० प्रतिशत आहे, तर मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण ३० प्रतिशत आहे, व मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १० प्रतिशत आहे, यावरून अल्प व सिमांत शेतकरी अधिक संख्येने कर्जबाजारी होतो आणि आपले आयुष्य संपवतो यातच बहुराष्ट्रीय निगम व सेझ सारख्या निर्दयी धोरणामुळे अनेक शेतकरी भूमिहीन होत आहेत.

### शेतीक्षेत्र व उद्योग क्षेत्राची तुलना :

भारतात निसर्गाचा लहरीपणा प्रामुख्याने शेतीला नेहमीच प्रभावित करतो, २०१२-१३ मध्ये मान्सूनच्या अवर्षणामुळे महाराष्ट्रात तिव्र असा कोरडा दुष्काळ पडला तर उत्तर पूर्व राज्यामध्ये अतिवृष्टी झाली. २०१३-१४ मध्ये महाराष्ट्रात जुलै-ऑगस्ट या महिन्यात अतिवृष्टी झाली त्यामुळे शेतीक्षेत्रात (खरीप हंगाम) प्रचंड नुकसान झाले. महाराष्ट्रात २६ फेब्रुवारी ते १९ मार्च २०१४ पर्यंत प्रचंड अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे रब्बी पिकाचे लाखो हेक्टर क्षेत्र उध्वस्त झाले, अशा पद्धतीने शेतीक्षेत्रात मान्सूनचा लहरीपणा दिसून येते, तसा तो उद्योगक्षेत्रात दिसून येत नाही कारण उद्योगक्षेत्र चार भिंतीच्या आत आणि निसर्गावर अवलंबून राहत नाही. शेतीमाल नाशवंत असतो, तसा औद्योगिक माल नाशवंत नाही. शेतीमालास

योग्य किंमत मिळेल याची कुठलीच शाश्वती नाही, मात्र उद्योगमालाला योग्य अशी छापील किंमत मिळते.

शेतीमालाची जाहिरात केली जात नाही, मात्र औद्योगिक मालाची जाहिरात केली जाते. औद्योगिक माल शोरूममध्ये ठेवला जातो. (बूट, चप्पल, कपडे, मोबाईल) मात्र शेतीमाल रस्त्यावर, जमिनीवर विक्रीला ठेवला जातो. निर्यातीमध्ये शेतीमालाला अनुदान मिळेलच याची शाश्वती नाही, मात्र औद्योगिक मालाला अनुदान मिळते. शासनाचे धोरण शेतीला नाही, पण उद्योगाला अनुकूल राहते. शेतकऱ्याला महामान उत्पादनाचा अजिबात लाभ होत नाही मात्र, उद्योगपतीला महामान उत्पादनाचा फायदा होतो. शेतकऱ्यांना योग्य वेळी व योग्य त्या प्रमाणात कर्ज मिळत नाही मात्र, उद्योगपतीला योग्यवेळी व योग्य त्या प्रमाणात कर्ज मिळते. शेतकरी कर्जातच जन्मतो व कर्जातच मरतो, मात्र उद्योगपतीच्या जीवनात असे काही घडत नाही. शेतकरी आपले अस्तित्व आणि पोटासाठी संघर्ष करतो. मात्र उद्योगपती नफा आणि प्रतिष्ठेसाठी संघर्ष करतो. शेतकरी अज्ञानी, अशिक्षित व असंघटित असतो. म्हणून त्याला कुणीही फसवत, मात्र उद्योगपती याबाबत सक्षम असतो म्हणून त्याला कुणीही फसवू शकत नाही. शेतकऱ्यांची विनंती करूनही शासनदरबारी मानहानी होते, मात्र उद्योगपतीची शासनदरबारी मुजरा केली जाते. यावरून शेतीक्षेत्र व उद्योगक्षेत्र यांची वास्तविकता आपल्या लक्षात येते.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे:**

१) शेतीसाठी पर्याप्त वित्तीय व्यवस्था व अंमलबजावणीचा अभाव

२) शासनाचे शेतीविषयक काटेकोर धोरण राबविण्यातील अपयश

३) शेतमालाबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीतील त्रुटी

४) शेतकऱ्यांबाबत व्यापारी, अडत्यांचा गैरव्यवहार व फसवणूकीचे धोरण

५) लागवड खर्चावर आधारित भाव देण्यासंदर्भातील धोरणाचे अपयश

६) अल्प उत्पादकता व शेतीचे वारसा हक्काने होणारे तुकडीकरण.

७) आधुनिक तंत्रज्ञानाचा, व भांडवलाचा अभाव.

८) शेतकऱ्यांचे अज्ञान, असंघटन व समस्यांचा सामना करण्यातील दुबळेपणा

९) उत्पन्नाच्या तुलनेत अधिक उपभोग व लागवड खर्च

१०) शेतीशी संबंधित संलग्न व्यवसायाचा अभाव

११) शेतीबाबत उदार व दुर्दम्य अशा राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

१२) मालसाठवणुकीची पर्याप्त सुविधेचा व पर्याप्त रस्ते वाहतुकीचा अभाव

१३) शेतीबाबत आत्मघाती निसर्गचक्र (मान्सूनचा लहरीपणा) व सिंचनाचा अभाव

**उपाय:**

वरील परिस्थितीत जर खऱ्या अर्थाने बदल व्हावा असे प्रत्येकाला वाटत असेल ना, तर आज शेतकऱ्यांना प्रत्येकाच्या सहानुभूतीची गरज आहे. दुर्दम्य अशा राजकीय इच्छाशक्तीची, पर्याप्त वित्तीय व्यवस्थेची आणि काटेकोर शेतीविषयक धोरण राबविण्याची गरज आहे, तरच शेतकऱ्यांच्या जीवन जगण्याला अर्थ उरेल आणि त्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा

घडेल अन्यथा जे आहे ते चालूच आहे त्यात बदल काय होणार?

**निष्कर्ष :**

शेतकऱ्यांची आजची जी स्थिती निर्माण झाली असेल ना तर त्यासाठी पीक लागवडी पासून ते विक्री पर्यंत सर्वच पातळ्यांवर, शेतकऱ्यांना निसर्ग, शासन व संबंधित व्यक्तीकडून असहकार्य आणि स्वार्थी व्यावहारिक धोरणे कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते. तसेच मानवी हक्क कायदे, न्यायव्यवस्था व शासनही शेतकऱ्यांबाबत हतबल झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची:**


१) थॉमस सरासु इस्थर, २०११, *मानवी हक्क व सामाजिक न्याय* (योजना मासिक), पृ.८.

२) जहागिरदार दि.व्यं.(संपा.),२०१२, *महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा*, पृ.६.

३) अर्थसंवाद (त्रैमासिक), २०१२, खंड ३६, अंक १ व ३.

४) अर्थसंवाद (त्रैमासिक), २०१३, खंड ३७, अंक १.

५) भारती गजानन (२०१३): *अर्थनाद*, मराठी अर्थशास्त्र परिषद, ३७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, अमरावती, पृ.१०.

६) पाटील ए.एस.(२०१२): *अर्थसंवाद*, खंड-३६, अंक१, पृ.१८

७) झामरे जी. एन, २०१०, *भारतीय अर्थव्यवस्था*, पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

# जागतिकीकरणानंतर भारतीय बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हाने व संधी

दिनकर टकले, परतूर,
अर्थशास्त्र विभाग,
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
जिल्हा जालना.
भ्रमणध्वनी : ९४२१३२२६१५.
E-mail : takle.dp@gmail.com

जागतिक उपलब्ध साधनांचा परिपूर्ण वापर करुन उत्पादनात व व्यापारात वाढ करण्यासाठी आणि देशादेशातील व्यापारी बंधने कमी करुन जागतिक मुक्त व्यापार स्थिती निर्माण करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण धोरणाचा स्विकार करीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरु आहे. जागतिकीकरण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. भारताने १९९१ नंतरच्या कालखंडात या प्रक्रियेत सहभाग घेतला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील इतर अर्थव्यवस्थांशी स्पर्धात्मक, नियमन व नियंत्रण, स्वायत्तता व खुलेपणा इत्यादी बाबतीत जुळवून घेण्यासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून एका बाजूने ही एक लोकशाही समाजवादाकडून भांडवलशाही व्यवस्थेकडे चाललेली वाटचाल आहे तर दुसऱ्या बाजूने भारतीय बाजारपेठेला जागतिक स्पर्धेत उतरविण्यासाठी उचललेले एक पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मते, जगातील दारिद्र्य व उपासमार घटविण्यासाठी जागतिकीकरण महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसीत देशाकडून मुक्त व्यापाराचा आग्रह केला जात आहे. मात्र विकसनशील देशांना सदृढ व मजबूत अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

जागतिकीकरण प्रक्रियेअंतर्गत भारताने वित्तीय क्षेत्रातील सुधारणा करण्याच्या हेतूने बँकींग क्षेत्राला स्पर्धात्मक बाजारपेठेत उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. बँकींग क्षेत्रातील आर्थिक किंवा वित्तीय सुधारणा हा जागतिकीकरण प्रक्रियेचाच एक भाग आहे. प्रस्तुत लेखात जागतिकीकरण धोरण राबवितांना

बँकींग क्षेत्रावर काय परिणाम झाला. भारतीय बँकींग क्षेत्रासमोर कोणकोणती आव्हाने व संधी आहेत याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती:**

संशोधनाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी व्दितीय माहिती स्त्रोतांचा आधार घेतला आहे. भारतीय बँकिंग क्षेत्राचा १९९१ नंतरचा झालेला विकास अभ्यासला आहे. व्दितीय माहिती संकलित करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक - अहवाल, बँकिंग संबंधित विविध समित्यांचे अहवाल, विविध संशोधनपर लेख, पुस्तक इत्यादिंचा वापर केला आहे. १९९१ ते २०१२ या कालखंडातील भारतीय बँकिंग क्षेत्रात झालेला बदल, आव्हाने व निर्माण झालेल्या संधीचा अभ्यास केला आहे. जागतिक बँक अहवाल, नरसिंहम समिती अहवाल यासारख्या अहवालाच्या तरतुदींचा विचार केला आहे. प्रस्तुत लेखात फक्त बँकिंग क्षेत्राशी संबंधित जागतिकीकरण धोरणांचा विचार केला आहे.

**भारतीय बँकिंग क्षेत्राचा आढावा:**

भारतीय बँकिंग क्षेत्राचा विकास स्वातंत्र्यानंतर तीन टप्प्यात झालेला दिसतो. बँक राष्ट्रीयकरणापूर्वीचा कालखंड (१९४७ ते १९६९), राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग क्षेत्राचा विकास (१९६९ ते १९९१) आणि आर्थिक सुधारणा व जागतिकीकरण प्रक्रियेतील कालखंड (१९९१ नंतरचा कालखंड) या तीन टप्प्यात बँकिंग क्षेत्राचा विकास झाल्याचे दिसते.

पहिल्या कालखंडात भारतीय बँकिंग क्षेत्राचा विकास खाजगी बँक केंद्रित स्वरुपाचा होता. परंतु या काळात गैरव्यवस्थापन व वित्तीय अनियमितता यामुळे ठेवीदारांचे तसेच बँकींग क्षेत्रातील रोजगाराचे नुकसान झाले. म्हणून भारत सरकारने १९६९ व १९८० या वर्षात खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. राष्ट्रीयीकरणानंतर बँक शाखांचा शहरी व ग्रामीण भागात विस्तार झाला. सरकार नियंत्रणात वित्तीय शिस्त व स्थैर्य प्रस्थापित करुन कर्जपुरवठयाचा विस्तार झाला. राष्ट्रीयीकृत बँकांनी देशाच्या बँकिंग क्षेत्रातील ८४ टक्के व्यवसाय आपल्या नियंत्रणात आणला. याच काळात ग्राहकांचा विश्वास संपादन करुन ग्रामीण, कृषी विकासासाठी वित्तीय कर्जे उपलब्ध करुन दिली. प्रादेशिक ग्रामीण बँकाची स्थापना राष्ट्रीयीकृत बँकाच्या नियंत्रणाखाली झाली. लघु व मध्यम उद्योगांना कर्जपुरवठा व कृषी क्षेत्राला विशेष वित्तीय सहाय्य करण्यासाठी नाबार्डची स्थापना झाली. ग्रामीण सावकारी विळख्यातून सर्वसामान्य शेतकरी वर्गाला बाजूला काढून राष्ट्रीयीकृत बँकांनी या कालखंडात महत्वपूर्ण योगदान दिले. प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाटा ७० टक्के होता.

जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांच्या आर्थिक सुधारणा मापदंडानुसार १९९० नंतर उदारीकरण धोरणाचा विचार सुरु झाला. १९९१ मधील भारताचे नविन आर्थिक धोरण आर्थिक सुधारणांचे पर्व म्हणून ओळखले गेले. भारताने आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण धोरण स्विकारले. याचा परिणाम बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या सुधारणात झाला. भारत सरकारने १४ ऑगस्ट १९९१ ला नरसिंहम समितीची नेमणूक केली. १६ नोव्हेंबर १९९१ ला या समितीने बँक क्षेत्रात

सुधारणा घडवून आणण्यासाठी आपला अहवाल सरकारला सादर केला. समितीने छोट्या बँकांचे विलिनीकरण, प्राधान्य क्षेत्राच्या पतपुरवठयात घट, बँक सेवा भरती मंडळ रद्द करणे, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना प्रशासकीय व वित्तीय स्वायत्तता देणे, RBI चे नियंत्रण कमी करणे इत्यादि सुधारणा सुचविल्या. बहुसंख्य सुधारणा भारत सरकारने स्विकारल्या. यानंतरच्या काळात भारतीय बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी नरसिंहम समिती-II, खान समिती, वर्मा समिती, एस.सी.गुप्ता समिती, रघुराम राजन समिती, अनवरुल होडा समिती या सारख्या विविध समित्यांची नेमणूक करुन जागतिकीकरण धोरणाला पाठबळ देण्यासाठी बँक व्यवसायात सुधारणा धोरण राबविण्याचा प्रयत्न होत आहे.

### भारतीय बँकिंग क्षेत्राचा जागतिकीकरण काळातील विकास:

जागतिकीकरणाच्या काळात अनेक विकसीत देशात (अमेरिका, युरोपीयन देश) आर्थिक मंदी आली. युरोप व अमेरिकेतील बँक व्यवसायावर या आर्थिक मंदीचा विपरीत परिणाम झाला. २००८ व २०११ या वर्षातील आर्थिक मंदीमुळे अनेक बँका दिवाळखोरीत गेल्या. परंतु याच काळात भारतीय बँकिंग क्षेत्राचा वृध्दीदर चांगला होता. उदारीकरण धोरणाचा फायदा घेत भारतातील बँकांनी आपला व्यवसाय जागतिक स्तरावर नेला. आर्थिक मंदीचा वाईट परिणाम भारतातील बँकांना झाला नाही याचे महत्वाचे कारण म्हणजे बहुसंख्य बँक व्यवसाय सरकार नियंत्रित व RBI च्या नियंत्रणात होता. जागतिकीकरण प्रक्रियेत नफेखोरी उद्दिष्ट्य ठेवणाऱ्या विदेशातील खासगी बँका आणि शासकीय धोरणांना सहाय्यभुत अर्थपुरवठा करणाऱ्या भारतीय बँका अशा मुलभूत कार्यातील फरकामुळे भारतीय बँक व्यवसाय मजबूत आर्थिक स्थिती प्राप्त करु शकला.

भारतातील अनुसूचित व्यापारी बँका भारतीय बँकिंग व्यवस्थेच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहेत. जागतिकीकरणानंतर या बँकाची शाखा विस्तार, कर्जपुरवठा, ठेवी, बँकिंग सेवा सुविधा इत्यादी संदर्भातील प्रगती समाधानकारक आहे. व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणाच्या वेळी म्हणजे १९६९ मध्ये भारतात केवळ ८९ व्यापारी बँका कार्यरत होत्या. त्यापैकी ७३ बँकांना अनुसूचित बँकाचा दर्जा होता. नंतरच्या काळात २००४ मध्ये व्यापारी बँकांची संख्या २९१ पर्यंत वाढली. मात्र २०१२ ला ही संख्या १७३ पर्यंत कमी झाली. व्यापारी बँकांची संख्या कमी होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे अनेक प्रादेशिक ग्रामीण बँकाचे झालेले एकत्रीकरण होय. २००४ या वर्षात १९६ प्रादेशिक ग्रामीण बँका होत्या. ही संख्या २०१२ पर्यंत फक्त ८२ वर आली. अनुसूचित व्यापारी बँकांची संख्या कमी झाली असली तरी बँकाची शाखा कार्यालये ८२६२ वरुन ९८३३० पर्यंत वाढल्याचे दिसते. बँकाच्या ठेवीमध्ये ४६.६ रुपये बिलीयन पासून ते ५९०९१ रुपये बिलीयन पर्यंत वृध्दी झाली. १९६९ ते २०१२ या कालखंडातील वृध्दी दराचा विचार करता असे दिसते की, बँकिंग शाखा वृध्दी दर १९४.३८ टक्के, अनुसूचित व्यापारी बँक शाखा वृध्दी २३१.५ टक्के, शाखा वृध्दी दर ११९० टक्के राहीला. बँकातील ठेवी व प्राधान्य क्षेत्राला झालेला कर्जपुरवठा यांच्यातील वृध्दीदर लक्षणीय आहे. जागतिकीकरणानंतर

विशेषत: २००९ ते २०१२ या काळातील बँक व्यवसायातील वृध्दीदर चांगला आहे.

**भारतीय बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हाने:**

भारतातील बँकींग क्षेत्र आज अनेक आव्हानांना सामोरे जात असून त्यातूनच नविन संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा २००९ नंतर तीव्र होतांना दिसत आहे. स्पर्धात्मक वातावरणात नविन तंत्रज्ञान आत्मसात करुन, भांडवल वाढवून, एन.पी.ए.कमी करुन, प्रशासकीय खर्चात कपात आणि संघटनात्मक संरचनेत बदल स्विकारुन भारतातील बँक व्यवसाय विकसीत होतांना दिसतो. मोठ्या स्वरुपाच्या जागतिक बँकिंग क्षेत्राशी स्पर्धा करीत असतांना परिणामकारक व्यवस्थापन, उत्कृष्ट सेवा व नविन तंत्रज्ञान यांची सांगड घालण्यासाठी छोट्या बँकांचे एकत्रीकरण करुन मोठया स्वरुपाच्या बँका निर्मितीसाठी भारत सरकार प्रयत्न करीत आहे. तरी सुध्दा भारतीय बँक व्यवसायासमोर काही महत्वाची आव्हाने विचारात घेणे महत्वाचे आहे.

१) बँक ग्राहकांच्या बदलणाऱ्या गरजा विचारात घेऊन बँकिंग व्यवसायात बदल करणे आवश्यक आहे.

२) स्पर्धेत टिकण्यासाठी उच्च दर्जाचे व्यवस्थापन भारतीय बँकांना आत्मसात करावे लागेल.

३) बँकिंग तंत्रज्ञानात सुधारणा करुन ग्राहकांना त्या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त लाभ द्यावा लागेल.

४) जागतिकीकरणात मोठया स्वरुपाच्या जागतिक बँकांशी स्पर्धा करता यावी म्हणून बँक नियमन सुधारणा करणे गरजेचे आहे.

५) भारतीय बँकांना आपले शेअर्सचे मूल्य वाढवावे लागेल.

६) बँक व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजना ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या पाहिजेत.

७) बँक व्यवसायात सतत नविनीकरण करीत राहणे हे मोठे आव्हान आहे.

८) सध्या ग्राहकांना कोठेही, कोणत्याही वेळी बँकिंग सुविधा मिळावी अशी अपेक्षा वाढत आहे. म्हणून बँकांनी आपली कार्यपध्दती बदलणे क्रमप्राप्त आहे.

९) भारतीय बँकांना ग्रामीण भागात शाखा विस्तार करण्याचे मोठे आव्हान आहे.

उपरोक्त अनेक नविन आव्हाने भारतीय बँकींग क्षेत्राने पार करण्यासाठी स्वत:ला बदलण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी बँकाजवळ मोठे भांडवल व प्रशिक्षित मनुष्यबळ असणे गरजेचे आहे. भारतीय बँकांनी संगणकीकरणाचा स्वीकार जागतिक बँकापेक्षा थोडे उशिराने (१९८०-९०) केला. यामध्ये सुध्दा प्रथम वैयक्तिक संगणकाचा वापर, नंतर संपूर्ण शाखा संगणकीकरण, त्यापुढे नेटवर्क बँकिंग, कोअर बँकिंग अंमलात आणली.

**बँकिंग क्षेत्रातील उपलब्ध संधी:**

भारतीय बँकिंग क्षेत्राने ग्राहकांना अनेक संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये पुढील सेवा / संधी बँकींग क्षेत्राचा विकास करण्यासाठी महत्वाच्या आहेत.

१) ए.टी.एम. सेवा.
२) मोबाईल बँकिंग सेवा.
३) क्रेडीट कार्ड सेवा.
४) डेबीट कार्ड सेवा.

५) इंटरनेट किंवा ऑनलाईन बँकिंग.

६) कोअर बँकिंग सेवा.

७) बँक नेट व इन्फीनेट बँक सुविधा.

८) होम बँकिंग सेवा.

९) स्विफ्ट बँकिंग.

१०) इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर सेवा.

एकंदरीत जागतिकीकरणाच्या युगात भारतीय बँकिंग व्यवसायात सुधारणा करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. ई-बँकिंग सेवा ग्राहकांसाठी वरदान ठरत आहे. या सेवेमुळे ग्राहकाचा वेळ, पैसा व श्रम यामध्ये बचत होऊन बँकांचे व्यवहार सोपे झाले आहेत. भारतात मार्च २०१२ पर्यंत ९५६८६ ए.टी.एम. केंद्र कार्यरत आहेत. एकूण एक लक्षा पेक्षा जास्त खेड्यात बँकींग सुविधा उपलब्ध आहेत.

**बँकिंग क्षेत्राच्या विकासातील काही समस्या व उपाययोजना:**

जागतिकीकरण प्रक्रियेत भारतातील व्यापारी बँकांनी आपल्या कार्यात अमुलाग्र बदल स्विकारले असले तरी विदेशी बँकाच्या तुलनेत आधुनिक तंत्रप्रणाली वापरात या बँकामागे आहेत. निधीची कमतरता व ग्रामीण भागातील शाखा विस्तार बँकिंग क्षेत्राच्या विकासात मोठा अडथळा ठरत आहे. बहुतांश व्यापारी बँकांनी ग्राहकांच्या सोयीसाठी ए.टी.एम. सुविधा दिल्या असल्या तरी आज सुध्दा फक्त ९ टक्के ए.टी.एम.ग्रामीण भागात कार्यरत आहेत. जवळपास ९१ टक्के ए.टी.एम. सुविधा शहरी भागात आहेत. म्हणजेच भारताच्या ६० टक्के लोकसंख्येला फक्त ९ टक्के एकूण ए.टी.एम. सेवा बँकांनी दिली आहे. इंटरनेट बँकींगचा वापर ग्रामीण भागात नसल्यातच जमा आहे. म्हणजेच भारतातील ग्रामीण परिक्षेत्रात ई-बँकिंग सेवा अत्यंत अपूरी आहे.

जागतिकीकरणाच्या काळात भारतीय बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी भारत सरकारने ग्रामीण भागात सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. पहिल्या टप्प्यात २ हजार किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या खेड्यात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी ई-बँकिंगच्या सर्व सुविधा ग्राहकांना पुरवाव्यात. वीज बील, टेलीफोन बील, मोबाईल रिचार्ज, दूरदर्शन रिचार्ज, बँकेतील पैसा ट्रान्सफर इत्यादी सेवांचा लाभ ग्रामीण लोकांना द्यावा. त्यामुळे त्याची वेळ, श्रम व पैशाची बचत होईल. शेती क्षेत्राला योग्य वेळी व पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा होण्यासाठी शाखा विस्तार (राष्ट्रीयीकृत बँकांनी) करावा. आज सहकारी बँकांवरील लोकांचा विश्वास त्या बँकातील राजकीय हस्तक्षेपामुळे कमी होतांना दिसत आहे. एकंदरीत जागतिकीकरण हे एक संधीचे पाऊल समजून भारतीय बँकांनी जगात आपल्या शाखा मोठया प्रमाणात उघडाव्यात. जागतिक बँकांना स्पर्धा करता यावी म्हणून किमान दोन मोठ्या स्वरुपाच्या बँका बँक एकत्रीकरणाच्या माध्यमातून निर्माण कराव्यात. बँक ग्राहकांना ई-बँकिंगचे फायदे व्हावेत यासाठी बँकांनीच ग्राहकांना प्रशिक्षण द्यावे. भारतीय बँका जागतिकीकरण प्रक्रियेत आपली आर्थिक स्थिती मजबूत करतील यात शंकाच नाही.

संदर्भसूची:

1. RBI - *Reports on Trends and Progress of Banking in India*, 2011-12.
2. Srinivasa Rao Chilumuri (2013), *Impact of Globalization on*

*Scheduled Commercial Banks with Reference to Agriculture Sector*, IOSR Journal of Humanities and Social Science, Vol.9, Issue-I, Mar.Apr., pp. 5-10.

3. www.befi/news/impact.
4. Harshad Patel and Vijay Pithadia (2013), *Impact of Globalization on Indian Banking Sector, Abhinav International Monthly Referred Journal of Research in Management and Technology*, Vol.II, Feb., pp.39-46.
5. Indian Banking, *The Engine for Sustaining India's Growth Agenda*, 5th ICC Banking Summit, 18 May 2013.
6. India Economic Survey 2010-11.
7. RBI (1998), *Report of the Committee on Banking Sector Reforms (The Narasimhan Committee)*, Mumbai.
8. Uppak R.K. (2008), *Customer Perception of E-Banking Services of Indian Banks : Some Survey Evidence*, The ICFAI University Journal of Bank Management, Vol.VII, Issue-1, Feb., pp.63.78.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# भारतातील दारिद्र्याचा अभ्यास

मुरलीधर पंडीत गायकवाड, मुरुड-जंजिरा,
अर्थशास्त्र विभाग,
वसंतराव नाईक कला व वाणिज्य
महाविद्यालय, जिल्हा रायगड.
भ्रमणध्वनी: ९४२०८३५९०४.

दारिद्र्य ही एक आर्थिक व सामाजिक घटना आहे हे एक वास्तव आहे. देशाला स्वातंत्र मिळून आता ६७ वर्षाचा काल लोटला आहे, या कालावधीत देशाने प्रगतीचे अनेक टप्पे पार केले असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेसमोर वाढणारी लोकसंख्या, भष्टाचार, आर्थिक विषमता, बेकारी व गरीबी अशा अनेक समस्या आहेत. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून दारिद्र्याची समस्या गंभीर असून ब्रिटीशांच्या काळात ८०% पेक्षा जास्त लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते, आज देशात ३०% टक्क्यापेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली राहत असल्याचे दिसून येत आहे. देशाच्या आर्थिक विकासाबरोबर दारिद्र्याचे प्रमाण कमी होत आहे हे नाकारुन चालणार नाही. असे असले तरी दारिद्र्याचे प्रमाण घटविण्यात शासनाला म्हणावे तसे यश मिळू शकले नाही.

स्वातंत्र्यापूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात ही दारिद्र्याची समस्या आढळते नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलशाही आर्थिक मक्तेदारी वाढत आहे. देशाचा आर्थिक विकासाचा दर वाढत असला तरी उत्पन्नातील विषमतेत वाढ होऊन गरीबाची संख्या वाढत आहे. आजही देशात ३० टक्क्यापेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. भारताच्या जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटचालीत दारिद्र्य हा एक मोठा अडसर आहे. सरकारने दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबवलेले आहेत पण दारिद्र्य सातत्याने वास्तव करुन राहिलेले आहे. त्यामुळे ह्या समस्यांच्या अभ्यासास महत्व आहे.

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारित असून या विषयाशी सबंधित संदर्भ ग्रंथ, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, अर्थसंवादाचे अंक,

मासिके, वर्तमान पत्रे, इ. चा आधार घेवून प्रस्तुत लेख तयार करण्यात आला आहे.

**दारिद्र्याची संकल्पना:**

जे लोक आपल्या दैनंदिन राहणीमानाची किमान पातळी गाठू शकत नाहीत किंवा मुलभूत गरजांची पुर्तता करु शकत नाहीत त्यांना गरीब म्हटले जाते. भारतात सर्वसाधारण दारिद्र्याची जी व्याख्या केली जाते तिचा आधार अन्न, वस्त्र, व निवारा या प्राथमिक किमान गरजांची पुर्तता हा आहे. या गरजांच्या पुर्ततेसाठी जो खर्च लागतो तो गृहीत धरुन किमान दरडोई उपभोग खर्च काढला जातो. ज्या कुटुंबाची उत्पन्न पातळी या उपभोग खर्चापेक्षा कमी आहे. अशा कुटुंबाचा समावेश दारिद्र्य रेषेखाली केला जातो. असे असले तरी दारिद्र्याची सर्वमान्य होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे. दारिद्र्यांच्या बाबतीत अनेक तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले असले तरी त्यात एक वाक्यता दिसून येत नाही. काहींनी किमान जीवनमान ( Minimum Level of Living) तर काहींनी वाजवी जीवनमान (Reasonable Level of Living ) विचारात घेवून आपले विचार मांडले, दारिद्र्याच्या प्रामुख्याने दोन संकल्पना आहेत. त्या म्हणजे सापेक्ष दारिद्र्य आणि निरपेक्ष दारिद्र्य होय. ॲडम स्थिम या अर्थशास्त्राने आपले विचार व्यक्त करतांना म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छा, अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पूर्ण कौशल्याने प्रयत्न करते, पण ज्यावेळी या अपेक्षा पूर्ण होत नाहीत त्यावेळी ती व्यक्ती स्वत:ला गरीब समजते.

**दारिद्र्याचा अर्थ व अंदाज -**

सन २०००-२००१ च्या जागतिक अहवालात *सुस्थिती पासून संपूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.*

प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्याप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.

दांडेकर आणि रथ यांच्या अंदाजानुसार प्रत्येक भारतीयास दररोज किमान २२५० उष्मांक मिळविण्यासाठी १९६०-६१ च्या स्थिर किंमतीनुसार ग्रामीण भागातील व्यक्तीस १८०/- रुपये आणि शहरी भागातील व्यक्तीस २७०/- रुपये इतका वार्षिक खर्च करावा लागेल. ग्रामीण भागातील व्यक्तीस प्रतिमहा १५/- रुपये व शहरी भागातील व्यक्तीस २२.५० रुपये खर्च करावा लागेल. या आधारे असे अनुमान काढले की, १९६८-६९ मध्ये ग्रामीण भागात ४०% टक्के लोक आणि शहरी भागात ५०% टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते.

योजना आयोगाच्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण ६१ व्या फेरीनुसार घरगुती ग्राहक खर्चानुसार निष्कर्ष काढण्यात आले त्यानुसार २८.३ टक्के ग्रामीण, शहर २५.७ टक्के दारिद्र्य २००४-०५ मध्ये आढळून आले एम. आर. पी. नुसार ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण २१.८% व शहरी भागात २१.७% होते तर अखिल भारतीय पातळीवर २१.८% दारिद्र्याचे प्रमाण दिसून आले.

तेंडूलकर समितीने दारिद्र्याचे मापन करण्यासाठी उपभोग खर्च हा निकष वापरला पूर्वीच्या समित्यांनी गरीब कुटुंबाच्या खर्चाची आकडेवारी संकलित करण्यासाठी एकच महिना (३० दिवस) विचारात घेतला कालमानाप्रमाणे उपभोग रचनेत जो बदल होतो त्याचे प्रतिबिंब गरीबी रेषा उपभोग (Poverty Line Basket) यामध्ये फेरफार करुन त्याच्या आधारे गरीबीरेषा

ठरविली या समितीच्या अंदाजानुसार २००४-०५ मध्ये ३७.२% लोक दारिद्र्य रेषेखाली होते. ग्रामीण भागामध्ये ४१.८% तर शहरी भागामध्ये २५.७% एवढे प्रमाण आढळून आले.

भारताच्या नियोजन आयोगाने २०११-१२ साली भारतातील दारिद्र्या विषयीचा अहवाल प्रसिद्ध केला या अहवालानुसार २०११-१२ मध्ये ग्रामीण भारतामध्ये २५.७०% तर शहरी भागामध्ये १३.७% जनता दारिद्र्य रेषेखाली होती, एकंदरीत २१.९२% म्हणजे २६.९७ कोटी भारतीय जनता दारिद्र्य रेषेखाली असल्याचे अनुमान मांडण्यात आले.

जुलै २०११ ते जुन २०१२ या कालावधीत ग्राहकांच्या घरगुती खर्चाचा अहवाल एन. एस. ओ. ने तयार केला त्यानुसार ग्रामीण भागातील सर्वाधिक गरीब दहा टक्के जणाच्या प्रति व्यक्ती दरमहा सरासरी खर्च फक्त ५०३.४९ रुपये होता. याचाच अर्थ प्रतिदिन फक्त १७.०० रुपयांवर त्यांना गुजराण करावी लागत आहे. शहरी भागात ही दहा टक्के जणाच्या प्रति व्यक्ति दरमहा सरासरी खर्च ७०२.२६ रुपये होता म्हणजे प्रतिदिन खर्च २३.४० रुपये आहे. ही आकडेवारी नियोजन आयोगाने आखलेल्या दारिद्र्य रेषेपेक्षाही भयानक आहे.

सन २००८ मध्ये जागतिक बँकेने दारिद्र्या विषयी जागतिक दारिद्र्य रेषा तयार केली. त्यानुसार ज्या व्यक्तीचे उत्पन्न दर दिवशी १.२५ डॉलर पेक्षा कमी आहे. ती व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील होय. या निकषानुसार भारतात दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्यांची संख्या १९८१ मध्ये ५९.८%, १९९० मध्ये ५१.३% तर २००५ मध्ये ४१.६% असल्याचे स्पष्ट केले.

### भारतातील दारिद्र्याची सद्यस्थिती:

भारताने जुलै १९९१ पासून जी प्रचंड प्रमाणात प्रगती केली आहे तिचे प्रमाण व वेग लक्षात घेतला तर भारताच्या इतिहासातील हे एक महत्वाचे पर्व म्हणावे लागेल. सन १९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आपला देश अत्यंत गरीब व दारिद्र्याने पिडलेला होता मात्र गेल्या ६७ वर्षात आपण जागतिक मध्यम उत्पन्न देणाऱ्या मालिकेत दाखल झालो आहोत. १९७३-७४ मध्ये जवळपास ५५% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती परंतु दारिद्र्य निमुर्लन कार्यक्रमामुळे त्यात १९९३-९४ पर्यत ३६% पर्यत घट झाली. तर २००२ पर्यंत २६% घट झाली. २०११-१२ मध्ये २१.९२ म्हणजे २६-९७ कोटी भारतीय जनता दारिद्र्य रेषेखाली असल्याचे अनुमान होते. तर आता रंगराजन यांनी ताज्या अहवालात ते प्रमाण ३०% टक्यांच्या पलीकडे नेले आहे. रंगराजन यांच्या अहवालामुळे देशात साधारण ३६ कोटी ३० लाख नागरिक गरीब म्हणवून घेण्यास पात्र ठरतील. रंगराजन यांच्या अहवालामुळे १० कोटी इतके अधिक गरीब आपल्या देशात मोजले जाणार आहेत. म्हणजेच दर १० नागरिकांतील ३ जण आपल्या देशात आता गरीब म्हणवून घेण्यास पात्र ठरतील याचाच अर्थ आपण विकासांचा विशिष्ट टप्पा गाठला असला तरी त्या प्रमाणात दारिद्र्य कमी होत नसल्याचे दिसून येते.

### दारिद्र्याची कारणे:

भारतात मोठ्या प्रमाणावर दारिद्र्याची कारणे शोधल्यास असे दिसून येते की, देशातील मोठी लोकसंख्या आणि कमी शिक्षण असे आहे. भारताची सामाजिक रचनासुद्धा महत्वाची आहे. त्यात भारतातील जातीय पद्धतीचा व भारतीय

समाजात स्त्रियांच्या भूमिका यावर अवलंबून आहे. भारताची आर्थिक वाढ ही शेती व्यवसायावर अवलंबून होती. २००१ ते २०११ या दशकात शेतकऱ्यांच्या संख्येत ९० लाखांची घट झाली आहे. तर शेतमजुरांच्या संख्येत सुमारे ३ कोटी ८० लाखांची भर पडली आहे. भारतामध्ये सातत्याने वाढणाऱ्या किंमतीमुळे गरीबांना आपल्या उत्पन्नापैकी ६० ते ७० % उत्पन्न अन्नावर खर्च करावे लागते. याशिवाय आर्थिक विषमता, शेती क्षेत्राचा अल्पदर, बेकारी, रुढी परंपरा इत्यादी कारणे आहेत.

भारताने स्वातंत्र्यापासून विकासावर लक्ष केंद्रीत केले त्याचे परिणाम काही क्षेत्रातील विकासाच्या माध्यमातून दिसून आले पण या विकासाचा फायदा सामान्य जनतेपर्यंत पोहोचला का हा खरा प्रश्न आहे ? त्या दृष्टीने विचार करता विकासाची गंगा विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादित राहिली आहे. असे म्हणता येईल.

## दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारी प्रयत्न:

स्वातंत्र्योत्तर काळात गरीबी निर्मूलनासाठी अनेक योजना आखण्यात आल्या त्यात पुढील प्रमुख योजनांचा समावेश होतो.

१) सार्वजनिक वितरण व्यवस्था - दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वितरण प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. १९९७ मध्ये लक्ष्यदर्शी करण्यात आली त्यामुळे ही व्यवस्था केवळ गोरगरीब लोकांना स्वस्त दरात धान्याचे वितरण करण्यासाठी राबविली जाऊ लागली या योजनेचे मुल्यांकन करण्याचे काम नियोजन आयोगामार्फत २००५ मध्ये झाले त्यावेळी या योजनेची अंमलबजावणी अत्यंत ढिसाळ पद्धतीने सुरु असल्याचे दिसून आले, सद्यस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील जनतेला अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन देणे आवश्यक आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - या योजनेनुसार ग्रामीण भागातील कोणत्याही व्यक्तिला ती श्रमाचे काम करण्यास तयार असल्यास तिला किमान वेतन दराने वर्षाला १०० दिवस रोजगार देण्याची हमी केंद्रसरकारने दिली आहे. ही योजना सुरु केल्यानंतर काही कालावधी उलटल्यानंतर त्यांची वेगवेगळया राज्यामध्ये सामाजिक लेखापरिक्षण करण्यात आले तेव्हा ही योजना म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण असल्याची बाब उघड झाली.

३) मध्यान्ह भोजन योजना - केंद्र सरकाराची सर्वदूर व्याप्ती असणारी आणखी एक योजना म्हणजे शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी चालविली जाणारी मध्यान्ह भोजन योजना. या योजनेसाठी लागणारा तांदूळ केंद्र सरकार राज्य सरकारांना मोफत पुरविते. त्या तांदुळापासून खिचडी बनविण्यासाठी लागणारा खर्च राज्य सरकारांनी करावा असे अपेक्षित आहे.

४) अन्न सुरक्षा कायदा - ५ जुलै २००३ रोजी अन्न सुरक्षा कायदा लागू केला होता आणि राज्य सरकारांना तो ३६५ दिवसांच्या आत लागू करावयाचा होता

त्यांची मुदत जुलै २०१४ पर्यंत होती हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र, पंजाब, व छत्तीसगड या राज्यांनी अन्न सुरक्षा कायदा पूर्णपणे लागू केला आहे. तर दिल्ली, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, बिहार आणि चंदीगड ने तो आंशिक रुपात लागू केला आहे. अन्न सुरक्षा कायदा करुन ग्रामीण भारतातील ७५ टक्के लोकांना व शहरी विभागातील ५० टक्के लोकांना दरडोई दरमहा ५ किलो धान्य तांदुळ, गहू आणि भरडधान्य अनुक्रमे ३ रुपये, २ रुपये, आणि १ रुपया किलोदराने देण्याचा निर्णय घेतला या कायद्यात काही त्रुटी आहेत त्या दूर करुन या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

**जन-धन योजना:**

स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट २०१४) पंतप्रधान मोदींनी पंतप्रधान जनधन योजनेची घोषणा केली होती त्याची सुरुवात करण्यात आली. या योजनेंतर्गत देशातील गरीब नागरिकांचे बँक खाते उघडण्यात येतील त्यांना डेबिट कार्ड देण्यात येईल तसेच या कार्डबरोबर प्रत्येक गरीब कुटुंबाला एक लाख रुपयांचा विमा देण्यात येईल यामुळे गरीबांचे सक्षमीकरण होण्यास मदत होईल.

स्वातंत्र्योत्तर काळात गरीबी निर्मुलनासाठी अनेक योजना आखण्यात आल्या केंद्रीय अंदाजपत्रकात पंतप्रधान ग्रामीण सडक योजना अशा शेकडो योजनांची तरतूद असते. याशिवाय प्रत्येक राज्य सरकारांतर्फे गरीबी निर्मुलनासाठी आखलेल्या योजना आहेतच अशा स्थितीत दरवर्षी गरीबांच्या कल्याणासाठी लक्षावधी कोटी रुपये खर्च होत आहेत. तरी देखील गरीबांची देशातील संख्या वाढत आहे.

**निष्कर्ष:**

१) आर्थिक विकास वेगाने होत असतांना दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या वाढत आहे.
२) विकासाची फळे समाजातील तुलनेने मागास आणि उपेक्षित समाज घटकांपर्यंत पोहचायला हवी तशी पोहचली नाहीत.
३) शिधा वाटप दुकानात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होतांना आढळतात.
४) दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने विविध योजना सुरु केल्या असल्या तरी त्यातील अंमलबजाणीत अनेक दोष आहेत.
५) भाववाढीने खरेदी शक्तीत घट होते त्यामुळे दारिद्र्यात वाढ होते.
६) आपल्या देशाचा आजपर्यंत झालेला विकास विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित राहिल्याचे दिसते.
७) श्रीमंत व गरीब यांच्या उत्पन्नात प्रचंड तफावत आढळते.
८) सरकारला दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यात अपयश आले.
९) विविध अभ्यासगट आणि समित्यांचे दारिद्र्य निर्धारणाच्या निकषांमध्ये विरोधाभास दिसून येतो.

**संदर्भ सूची:**

१. Datt & Sundharam, *Indian Economy*, S. Chand 2011 Page 369.
२. महाजन मुकुंद, *आर्थिक आणि जागतिक आर्थिक विकास*, निराली प्रकाशन २०१०.

३. Dandekar, Rath, *Poverty in India Bombay* - 1971 Page 137 & 140.
4. *Economic Survey* - 2008-09 pp. 259 & 260.
5. *Report of The Expert Group to Review the Methodology for Estimation of Poverty,* Government of India Planning Commission, Nov. 27, 2009.
६. अर्थसंवाद - ऑक्टोबर-डिसेंबर २०१२ खंड ३६ अंक ३.
७. दै. पुढारी १३ ऑगस्ट २०१४, पृ. ११.
८. दै. लोकसत्ता दि. ८ जूलै २०१४.
९. दै. सकाळ २९ ऑगस्ट २०१४.

## निवेदन

अर्थसंवाद एप्रिल-जून २०१४, खंड ३८ अंक १ मध्ये काही बाबी नजरचुकीने/तांत्रिक कारणामुळे राहून गेल्या, कृपया सदर मजकूर पुढीलप्रमाणे वाचावा.

१) संतोष दास्ताने यांच्या लेखात पृ.३ वर विषय समजाऊन देण्याची त्यांची हातोटी सुगम आणि ***अर्थवादी*** ऐवजी ***अर्थवाही*** होती असे वाचावे.

२) धनाजी इंगवले यांच्या शोधनिबंधात पृ.५० वर देशातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी **१५१** टक्के या ऐवजी **१३.५** टक्के लोकसंख्या एकट्या महाराष्ट्रात आहे असे वाचावे. पृ.५० वरील तक्ता क्र.१ मध्ये घटक लोकसंख्या महाराष्ट्र ११.२ कोटी, भारत १२१.०१ कोटी, नागरी लोकसंख्या महाराष्ट्र ५.०८ कोटी, भारत ३७.७ कोटी याप्रमाणे वाचावे. तसेच पृ.५१ वरील तक्ता क्र.२ महाराष्ट्रातील नागरीकरणातील प्रवृत्ती यातील सन २०१२ ची माहिती काढून टाकण्यात आली आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# धुळे शहरातील नागरिकांची गुंतवणूक प्रवृत्ती: एक अभ्यास

**कारभारी बबनराव दिवटे, धुळे,**
भ्रमणध्वनी: ९२७००५७३३२,
**हेमंत अनील जोशी, धुळे,**
भ्रमणध्वनी: ९२२६११५२४६
अर्थशास्त्र विभाग,
मा. ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालय.

सद्य परिस्थितीत गुंतवणूक हा अत्यंत महत्वाचा प्रश्न मानला जातो. सामान्य माणसासाठी गुंतवणूक म्हणजे त्याच्या पैशाचा विनियोग बँक, पोस्ट, विमा इ. प्रकारात करून त्यावर उत्पन्न कमविणे व पैसा वाढविणे असा होय. सध्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे गुंतवणूक योग्य प्रकारे करणे अत्यंत महत्वाचे आहे. आज मध्यमवर्गीय व्यक्ती गुंतवणूकीकडे जास्त प्रमाणात वळलेला आहे. त्यातुन गुंतवणूकदारांचा एक मोठा वर्ग उदयाला येत आहे. परंतु असे आढळून आले आहे की गुंतवणूकदार हे संभ्रमात असतात कारण गुंतवणूकदार विविध हेतूसाठी गुंतवणूक करू इच्छितो. तसेच गुंतवणूक करण्यासाठी विविध प्रकारच्या संधी अस्तित्वात आहेत. यात कोण कोणत्या प्रकारच्या गुंतवणुकीला प्राधान्य देतो हा अभ्यासाचा विषय आहे.

आज गुंतवणूकदार विविध हेतूंसाठी गुंतवणूक करतात. ही गुंतवणूक विविध प्रकारे केली जाते. सर्वसाधारणपणे व्यक्ति उत्पन्नातील किती भाग गुंतवतात, तो कोणत्या हेतूने व कोणत्या प्रकारात गुंतवितात हे जाणून घेणे महत्वाचे वाटते. याच हेतूने हा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. हा अभ्यास अनेक व्यक्तिंना दिशादर्शक ठरू शकेल व ते योग्य प्रकारे गुंतवणूक करण्यासंदर्भात निर्णय घेऊ शकतील असे वाटते.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१) विविध वर्गातील गुंतवणूकदारांचा अभ्यास करणे.

२) गुंतवणूकदारांच्या हेतूंचा अभ्यास करणे.

३) गुंतवणूकदारांनी विविध प्रकारात केलेल्या गुंतवणुकीचा अभ्यास करणे.

४) गुंतवणूकदारांनी केलेल्या गुंतवणुकीचे त्यांच्या उत्पन्नाशी असलेल्या प्रमाणाचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१) सर्वच लोक गुंतवणूक करतात.

२) गुंतवणूकदार सर्वच हेतूंसाठी गुंतवणूक करतात.

३) सर्वच गुंतवणूकदार सर्वच प्रकारची गुंतवणूक करतात.

४) गुंतवणूकदारांचे त्यांच्या गुंतवणुकीचे त्यांच्या उत्पन्नाशी असलेले प्रमाण भिन्न असते.

**संशोधन पध्दती:**

या संशोधनाकरीता प्राथमिक माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. प्रश्नावलीच्या सहाय्याने संशोधनाचे हेतू लक्षात घेऊन प्रश्नावली तयार करण्यात आली. नमुना म्हणून धुळे शहरातील १०० नागरिकांची यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली. त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतल्यानंतर मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

**गुंतवणूकदारांचे प्रकार:**

धुळे शहरातील १०० नागरिकांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली त्याचे वर्गीकरण केल्यावर चार प्रकारचे गुंतवणूकदार तक्ता क्र. १ मध्ये दर्शविले आहेत:

तक्ता क्र. १

गुंतवणूकदारांचे प्रकार व संख्या

| | |
|---|---|
| सरकारी नोकरी | १८ |
| खाजगी नोकरी | २५ |
| व्यावसायिक | ३८ |
| व्यापारी | १९ |

तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १०० गुंतवणूकदारांपैकी सर्वात जास्त ३८ गुंतवणूकदार व्यावसायिक वर्गातील आहेत. त्या खालोखाल खाजगी नोकरीतील २५ गुंतवणूकदार आहेत. व्यापारी वर्गातील १९ गुंतवणूकदार असून सर्वात कमी सरकारी नोकरीतील १८ गुंतवणूकदार आहेत.

**गुंतवणूकीचा हेतू:**

व्यक्ति आपल्या भविष्यकाळात उद्‌भवणारे खर्च भागविण्यासाठी उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने गुंतवणूक करतात. सर्वसाधारणपणे मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, करबचत, घर बांधणे, वृध्दापकाळाची तरतूद व इतरही कारणांसाठी गुंतवणूक केली जाते. सदर अभ्यास गुंतवणूकदारांचे -मुलांचे शिक्षण, मुलामुलींचे लग्न, करबचत, वृध्दापकाळाची तरतुद हे मुख्य हेतू विचारात घेऊन केला आहे. या हेतूंसाठी गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांचे प्रमाण तक्ता क्र. २ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता २ नुसार मुलांच्या शिक्षणाच्या हेतूने गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची एकूण संख्या ४८ आहे. त्यापैकी सर्वाधिक ३३.३३% गुंतवणूकदार हे व्यावसायिक वर्गातील आहेत. त्याखालील खाजगी नोकरदार, व्यापारी वर्ग यांचा क्रम लागतो व सर्वात कमी गुंतवणूक सरकारी नोकर करतात. मुलामुलींच्या लग्नाच्या हेतूने गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या २८ आहे. त्यापैकी सर्वाधिक ३२.१४% व्यावसायिक वर्गातील असून सर्वात कमी सरकारी नोकरदार १७.८६% आहेत.

करबचत या हेतूने गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या सर्वात कमी १० आहे. त्यापैकी सर्वाधिक प्रमाण सरकारी नोकर वर्गाचे

तक्ता क्र. २ विविध हेतूसाठी गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार

| | मुलांचे शिक्षण | मुलामुलींचे लग्न | करबचत | वृध्दापकाळासाठी तरतूद | अन्य |
|---|---|---|---|---|---|
| सरकारी नोकरी | ०७ (१४.५८) | ०.५ (१७.८६) | ०.४ (४०) | ०८ (२५.८०) | ०४ (११.११) |
| खाजगी नोकरी | १४ (२०.१६) | ०८ (२८.५७) | ०२ (२०) | ०७ (२२.५८) | ०८ (२२.२२७) |
| व्यावसायिक | १६ (३३.३३) | ०३ (३२.१४) | ०३ (३०) | ०२ (६.४५) | १३ (३६.११) |
| व्यापारी | ११ (२२.९१) | ०६ (२१.४३) | ०१ (१०) | ०४ (१२.८०) | ११ (३०.५५) |
| एकुण | ४८ | २८ | १० | ३७ | ३६ |

असून सर्वात कमी प्रमाण व्यापारी वर्गातील आहे. वृध्दापकाळासाठी तरतूद या हेतूने गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या ३७ आहे. त्यापैकी सर्वाधिक २५.८०% गुंतवणूकदार हे सरकारी नोकरीतील असून सर्वात कमी म्हणजे ०६.४५% गुंतवणूकदार व्यावसायिक आहेत. अन्य हेतूने गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या ३६ आहे. त्यापैकी व्यावसायिकांचे प्रमाण ३६% असून सरकारी नोकरांचे प्रमाण अत्यल्प म्हणजे ११% आहे.

### गुंतवणुकीचे प्रकार:

सामान्यतः लोक बँकांमध्ये, पोस्टात, विम्यात, विमापॉलिसीत, मौल्यवान धातुत, स्थावर मालमत्तेत इत्यादी प्रकारात गुंतवणूक करतात. या प्रत्येक प्रकाराचे फायदे तोटे भिन्न असून त्यातील जोखमीचे प्रमाणही कमी अधिक असते. सदर अभ्यासात वरील सामान्य गुंतवणुकीचे प्रकार विचारात घेऊन त्यात त्या विविध प्रकारात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांचे प्रमाण तक्ता क्र.३ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र.३ नुसार बँकेत गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या सर्वाधिक असून ४३ एवढी आहे. त्यात व्यावसायिक वर्गाचे प्रमाण सर्वाधिक ३७.२०% असून सर्वात कमी व्यापारी वर्गाचे १६.२७% एवढे आहे.

पोस्टात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांचा कल कमी असल्याचे दिसून येते. फक्त १३ गुंतवणूकदार पोस्टात गुंतवणूक करतात. त्यातही खाजगी नोकरीत असणारे ४६.१५% एवढे पोस्टात गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार आहेत. सर्वात कमी व्यापारी गुंतवणूकदार आहेत. विम्यात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या ३८ आहे. त्यात सर्वाधिक ३३.२१% गुंतवणूकदार व्यावसायिक वर्गातील असून सर्वात कमी व्यापारी व सरकारी नोकर वर्गातील १८.४२% गुंतवणूकदार

तक्ता क्र.३ :विविध प्रकारात गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार

| | बँक | पोस्ट | विमा | सुवर्णादी मौल्यवान धातू | जमीन/घर | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|
| सरकारी नोकरी | ११ (२५.५८) | ०३ (२३.०८) | ०७ (१८.४०) | ०१ (७.१४) | ०३ (१२.०५) | ०१ (८.३३) |
| खासगी नोकरी | ०९ (२०.९३) | ०६ (४६.१५) | ११ (२८.९५) | ०३ (२१.४३) | ०४ (१६.६७) | ०५ (४१.६७) |
| व्यावसायिक | १६ (३७.२०) | ०३ (२३.०८) | १३ (३३.२१) | ०५ (३५.७१) | १० (४१.६७) | ०४ (३३.३३) |
| व्यापारी | ०७ (१६.२७) | ०१ (७.७०) | ०७ (१८.४२) | ०५ (३५.७१) | ०७ (२९.१७) | ०२ (१६.६७) |
| एकूण | ४३ | १९ | ३८ | १४ | २५ | १२ |

आहेत.

सोने चांदी इत्यादी मौल्यवान धातूत गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार १४ आहेत. त्यात व्यापारी व व्यावसायिक वर्गाचा कल जास्त आढळून येतो. नोकरी करणारा वर्ग यात फारशी गुंतवणूक करत नाही.

अन्य प्रकारात म्हणजेच म्युच्युअल फंड, शेअर्स रोखे इ. सारख्या प्रकारात गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार अत्यल्प आढळून आले.

## गुंतवणूकीचे उत्पन्नाशी प्रमाण:

सदर अभ्यासात लोक आपल्या उत्पन्नातील किती भाग गुंतवणूक करतात हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या उत्पन्नातील ० ते १५%, १६ ते २५%, २६% ते ३०% व ३०% पेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्यांची माहिती घेण्यात आली. सदर माहिती तक्ता क्र.४ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.४ नुसार, आपल्या उत्पन्नातील २५% पर्यंत गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या ७५

तक्ता क्र.४ : गुंतवणूकदारांच्या उत्पन्नातील प्रमाणानुसार गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार

| | ०-१५% | १६ ते २५% | २६ते ३०% | ३०% पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|
| सरकारी नोकरी | ०४ | १० | ०२ | ०१ |
| खासगी नोकरी | ०६ | ०९ | ०३ | ०६ |
| व्यावसायिक | १७ | ११ | ०६ | ०६ |
| व्यापारी | ०८ | १० | ०० | ०१ |
| एकुण | ३५ | ४० | ११ | १४ |

आहे. चार प्रकारच्या गुंतवणूकदारांपैकी व्यावसायिक वर्गातील गुंतवणूकदार आपल्या उत्पन्नातील जास्त रक्कम गुंतवितात. तर सरकारी व खाजगी नोकरीतील गुंतवणूकदार उत्पन्नातील कमी रक्कम गुंतवितात.

**निष्कर्ष:**

१) सर्वच लोक गुंतवणूक करतात.

२) हेतूंचा विचार करता सर्व गुंतवणूकदार सर्वच हेतुसाठी गुंतवणूक करतात. परंतु विविध हेतूंकरीता गुंतवणूकीचे प्रमाण कमी-अधिक असल्याचे सदर अभ्यासात आढळले की,

अ)सरकारी नोकरवर्गातील गुंतवणूकदार वृध्दापकाळ आणि मुलांचे शिक्षण या उद्देशांकरीता जास्त प्रमाणात गुंतवणूक करतात.

ब)खाजगी नोकर वर्गातील गुंतवणूकदारांमध्ये मुलांचे शिक्षण या हेतूने गुंतवणूक करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

क)व्यावसायिकांमधेही मुलांचे शिक्षण या हेतूने गुंतवणूक करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

ड)व्यापारी वर्गात मुलांचे शिक्षण व अन्य हेतूने गुंतवणूक करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. यावरुन असे लक्षात येते की, सरकारी नोकरांना वृध्दापकाळासाठी निवृत्ती वेतन मिळत असतांनाही ते वृध्दापकाळासाठी जास्त तरतुद करतात. याउलट व्यावसायिकांना वृध्दापकाळाच्या तरतुदीची गरज असतांनाही ते याबाबत जास्त जागरुक नसल्याचे दिसते.

३) गुंतवणुकीच्या प्रकारांचा विचार करता सर्व गुंतवणूकदार सर्वच प्रकारात गुंतवणूक करतांना दिसतात. परंतु त्यांचे प्रमाण कमी-अधिक आढळते. या अभ्यासात असे आढळून आले,

अ)सरकारी नोकर वर्गाचा विचार करता बँकामधील गुंतवणुकीला प्राधान्य देणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

ब)खाजगी नोकर वर्गाचा विचार करता विम्यात गुंतवणूक करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

क)व्यावसायिकांचा विचार करता बँकामध्ये गुंतवणूक करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

ड)व्यापारी वर्गाचा विचार करता बँक, विमा आणि जमीन/घर आदी स्थावर मालमत्तेला समान प्राधान्य दिलेले आढळते.

४) गुंतवणुकीचे उत्पन्नातील प्रमाण विचारात घेता सर्व वर्गातील गुंतवणूकदारांमध्ये सर्व प्रकारच्या उत्पन्न गटात गुंतवणूक केलेली आढळते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) अतुल सुळे, *चक्रव्यूह शेअरबाजाराचा, मार्गदर्शन गुंतवणूक-गुरुंचे.*

२) Gerald Krefetz, *The basics of Investing*, Vision Books.

३) प्रदीप गुंडसूरकर, *अर्थवृक्ष म्युच्युअल फंडाचा*, विद्याभारती प्रकाशन

४) चंद्रशेखर टिळक, *गुंतवणूक पंचायतन*, राजहंस प्रकाशन.

५) The Investment game How to win, Prasanna Chandra, Tata Mcgrowhill Publishing Company, Ltd.

६) Dr.V.A.Avadhani, *Investment Analysis & Portfolio Management*, Himalaya Publishing House.

७) Preeti Singh, *Fundamentals of Investment Management*, HPH.

# ग्रामीण विकासासाठी विविध मंत्रालयांच्या अंदाजपत्रकीय खर्चाचा तपशिल

**धर्मा रानबा धेडे, वारणानगर,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
ता.पहाळा, जि.कोल्हापूर
भ्रमणध्वनी: ९९२२२४४२७३.

ग्रामीण विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या नितीचा एक अविभाज्य भाग आहे. भारतातील ८०% लोकांचे ग्रामीण वास्तव गृहित धरुन ग्रामीण विकासाला अंदाजपत्रकामध्ये झुकते माप देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण विकासासाठी भारत सरकार ज्या विविध घटकांवर जो खर्च करते त्याचा अंदाज प्रथम अंदाजपत्रकाद्वारे व्यक्त केला जातो. परंतु प्रत्यक्षात व्यक्त केलेल्या अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा कमी किंवा अधिक रक्कम खर्च होत असते. या खर्चावर या शोधनिबंधातून एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाचा कालावधी:**

सदरच्या शोधनिबंधामध्ये सन २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४ या तीन वर्षाच्या अंदाजपत्रकीय खर्चाचा अभ्यास करणेत आलेला आहे. सर्व घटकांवरील खर्च हा या तीन आर्थिक वर्षातीलच आहे.

**खर्चाचा तपशिल:**

विविध मंत्रालयांनी विविध घटकांवर जो अंदाजपत्रकीय खर्च केलेला आहे त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे:

कृषी मंत्रालयाच्या खर्चाचा तपशिल:

सन २०११-१२ मध्ये कृषी मंत्रालयाने विविध घटकांवर एकूण १६,१९४ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१२-१३ च्या अंदाज-पत्रकानुसार एकूण १७,६९२ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली परंतु प्रत्यक्षात १५,९७१ कोटी रुपये खर्च केले. तसेच २०१३-१४ च्या अंदाज-पत्रकामध्ये विविध घटकांवर एकूण १८,७७५ कोटी रुपये खर्च करण्याची

तरतूद केली आहे.

भारत सरकारच्या कृषी मंत्रालयामार्फत विविध घटकांवर जो खर्च करण्यात आलेला आहे त्याबाबतचा संक्षिप्त तपशिल असा की, सन २०११-२०१२ मध्ये कृषी मंत्रालयाने पीक व्यवसायासाठी एकूण खर्चाच्या ४९.८१% रक्कम खर्च केलेली आहे. तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकास ५१.०६% खर्च करण्याची तरतूद केली होती. परंतु प्रत्यक्षात ५०.५४% खर्च केलेला आहे. तसेच सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये एकूण खर्चाच्या ५२.६०% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे.

तसेच सन २०११-२०१२ मध्ये कृषी मंत्रालयाने कृषी संशोधन आणि शिक्षण यासाठी एकूण खर्चाच्या १५.८९% रक्कम खर्च केली आहे तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार १६.३८% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. परंतु प्रत्यक्षात १४.१६% रक्कमच खर्च केली. तसेच सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये एकूण खर्चाच्या १६.५८% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे. तसेच सन २०११-२०१२ मध्ये कृषी मंत्रालयाचे इतर कृषी कार्यक्रमांसाठी एकूण खर्चाच्या १२.२२% रक्कम खर्च केली आहे. तर सन २०१२-२०१३ च्या अंदाज-पत्रकानुसार यासाठी ९.९७% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे. तसेच सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण खर्चाच्या ८.१८% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे.

तसेच सन २०११-२०१२ मध्ये कृषी मंत्रालयाने पशुपालन व्यवसायासाठी एकूण खर्चाच्या ४.४७% रक्कम खर्च केली आहे. तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार या कामी ६.००% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. परंतु प्रत्यक्षात ५.३१% रक्कम खर्च केली आहे. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकात एकूण खर्चाच्या ५.९९% रक्कम पशुपालन व्यवसायासाठी खर्च करण्याची तरतूद केली आहे.

सन २०११-२०१२ मध्ये कृषी मंत्रालयाने वनीकरण आणि जंगली जीवन यासाठी एकूण खर्चाच्या ५.६४% रक्कम खर्च केली आहे. तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार या कामी ५.१३% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. परंतु प्रत्यक्षात ४.७३% रक्कम खर्च केली आहे. तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण खर्चाच्या ५.५४% रक्कम खर्च करण्याची तरतूद यासाठी केली आहे.

कृषी मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये एकूण खर्चाच्या ४.३४% रक्कम अन्न आणि साठागृहे यासाठी खर्च केली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार ४.४५% रक्कम खर्च करण्याची तरतूद केलेली असली तरी प्रत्यक्षात ४.५५% रक्कम खर्च केली आहे. तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकात यासाठी ४.२७% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे.

तसेच मृदा आणि जलसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय, वृक्षारोपण, सहकार यासाठीही कमी अधिक प्रमाणात रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

**ग्रामीण विकास मंत्रालयाच्या खर्चाचा तपशिल:**

सन २०११-१२ मध्ये ग्रामीण विकास मंत्रालयाने विविध घटकांवर एकूण ३७,५९९ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण ४०,७६३ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली परंतु प्रत्यक्षात

३५,५८३ कोटी रुपये खर्च केले तसेच २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये विविध घटकांवर एकूण ४२,७७३ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत विविध बाबींवर जो खर्च करण्यात आलेला आहे त्या बाबतचा संक्षिप्त तपशिल असा की, ग्रामीण विकास मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये ग्रामीण विकासाचे विशेष कार्यक्रम यावर एकूण खर्चाच्या १२.५१% रक्कम खर्च केली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी ग्रामीण विकास मंत्रालयाने १५.४८% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. परंतू प्रत्यक्षात १४.०१% रक्कम खर्च केली आहे. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये एकूण खर्चाच्या १९.८९% रक्कम या कामासाठी खर्च करण्याची तरतूद केली.

सन २०११-२०१२ मध्ये ग्रामीण विकास मंत्रालयाने ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी एकूण खर्चाच्या ७७.७०% रक्कम खर्च केलेली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये ग्रामीण रोजगारासाठी ८०.९६% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ८२.५९% रक्कम खर्च केली. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार ग्रामीण रोजगारासाठी ७७.१६% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली.

ग्रामीण विकास मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये जमीन सुधारणेसाठी एकूण खर्चाच्या ०.२८% रक्कम खर्च केलेली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार या कामासाठी ०.३३% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. प्रत्यक्षात ०.२४% रक्कमच खर्च केली. तसेच सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये एकूण खर्चाच्या ०.७९% रक्कम यासाठी खर्च करण्याची तरतूद ग्रामीण विकास मंत्रालयाने केली आहे.

जल संसाधन मंत्रालयाच्या खर्चाचा तपशिल:

सन २०११-१२ मध्ये जलसंसाधन मंत्रालयाने विविध घटकांवर एकूण ५०६ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण १,२७५ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली. प्रत्यक्षात ४२८ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. तसेच २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये विविध घटकांवर एकूण १,२०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

भारत सरकारच्या जल संसाधन मंत्रालयात विविध घटकांवर जो खर्च केलेला आहे त्याचा संक्षित तपशिल असा की, जल संसाधन मंत्रालयामार्फत सन २०११-२०१२ मध्ये मोठे आणि मध्यम सिंचन प्रकल्पासाठी एकूण खर्चाच्या ३७.५५% रक्कम खर्च केली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार ५८.४३% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली. प्रत्यक्षात ४७.६७% रक्कम यावर खर्च केलेली आहे तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये एकूण खर्चाच्या ५३.३३% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे.

तसेच जल संसाधन मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये छोटे सिंचन प्रकल्पावर एकूण खर्चाच्या २७.८६% रक्कम खर्च केलेली आहे. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार छोटे सिंचन प्रकल्पावर २६.४३% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली आहे. मात्र प्रत्यक्षात ३८.०८% रक्कम यासाठी खर्च केलेली आहे. सन

२०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण खर्चाच्या २२.६७% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली होती.

पूर नियंत्रण आणि सांडपाणी व्यवस्थापानासाठी जल संसाधन मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये एकूण खर्चाच्या ३४.५९% रक्कम खर्च केली आहे. तसेच सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार १५.४% रक्कम खर्च करण्याची तरतूद केली होती. मात्र प्रत्यक्षात १४.२५% रक्कमच यासाठी खर्च केली आहे. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार एकूण खर्चाच्या २४% रक्कम पूरनियंत्रण व सांडपाणी व्यवस्थापन यासाठी खर्च करण्याची तरतूद जलसंसाधन मंत्रालयाने केली आहे.

बिगर योजना खर्चाचा तपशिल:

भारत सरकारच्या वतीने विविध घटकांवर अनुदानापोटी जो खर्च केलेला आहे त्याचा संक्षिप्त तपशिल असा की, सन २०११-२०१२ मध्ये भारत सरकारने खत अनुदानासाठी ७०,०१३ कोटी रुपये खर्च केलेले आहेत तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार ६०,९७४ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ६५,९७४ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१३-२०१४ च्या अंदाज पत्रकामध्ये खत अनुदानासाठी ६५,९७२ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

तसेच सन २०११-२०१२ मध्ये अन्न अनुदानासाठी भारत सरकारने ७२,८२२ कोटी रुपये खर्च केलेले आहेत तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये यासाठी ७५,००० कोटी रुपयांची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ८५,००० कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार यासाठी ९०,००० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली होती. याशिवाय सन २०११-२०१२ मध्येच १,१७६ कोटी रुपयांची शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी केली. नंतरच्या काळामध्ये यासाठी काहीही तरतूद केलेली नाही.

सन २०११-२०१२ मध्ये कृषी संलग्न सेवासाठी २,४९१ कोटी रुपये भारत सरकारने खर्च केलेले आहेत तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये यासाठी ३,५५८ कोटी रुपयांची तरतूद केली होती. प्रत्यक्षात मात्र २,९५९ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. तसेच सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये कृषी संलग्न सेवांसाठी ३,००७ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

सन २०११-२०१२ मध्ये सिंचन आणि पुर नियंत्रण यासाठी सरकारने ३७८ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये ३९६ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली. प्रत्यक्षात मात्र ४२४ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये ४५२ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

व्याज अनुदानावरील खर्चाचा तपशिल:

सन २०११-२०१२ मध्ये भारत सरकारने अल्पकालीन पत पुरवठ्यावरील व्याज अनुदानापोटी ३,२८३ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन २०१२-२०१३ च्या अंदाज-पत्रकानुसार याकामी ६,००० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ५,४०० कोटी रुपये खर्च केलेले आहेत तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये अल्पकालीन पत

पुरवठ्यावरील व्याज अनुदानापोटी ६,००० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

भारत सरकारने सह. साखर कारखान्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजावर अनुदान देण्यासाठी सन २०११-२०१२ मध्ये ३५ कोटी रुपये खर्च केले आहेत तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी ३१ कोटी रुपयांची तरतूद केली व तितकीच रक्कम खर्च केली तर सन २०१३-२०१४ च्या अंदाज-पत्रकामध्ये या कामासाठी ३१ कोटी रुपयांचीच तरतूद केली गेली.

तसेच खादी आणि इतर ग्रामीण उद्योगांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजावर अनुदान देण्यासाठी सन २०११-२०१२ मध्ये २७ कोटी रुपये खर्च केलेले आहेत तर सन २०१२-२०१३ मध्ये या कामी काहीही रक्कम खर्च केलेली नाही. परंतु सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकात २७ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केलेली आहे.

इतर अनुदानांचा तपशिल:

सन २०११-२०१२ मध्ये भारत सरकारने डाळींच्या आयातीसाठी अनुदानापोटी २५० कोटी रुपये खर्च केले आहेत. सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकानुसार ३,००० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली. प्रत्यक्षात २,७०० कोटी रुपये खर्च केले आहेत. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकानुसार डाळींच्या आयातीसाठी अनुदान म्हणून २५०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली आहे.

भारत सरकारने खाद्य तेलाच्या आयात अनुदानासाठी सन २०११-२०१२ मध्ये ३६६ कोटी रुपये खर्च केले आहेत तर सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकामध्ये यासाठी ६१५ कोटी रुपये खर्चाची तरतूद केली. प्रत्यक्षात ६१८ कोटी रुपये खर्च केले गेले. मात्र सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकामध्ये या अनुदानापोटी ३१८ कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद केली.

साखरेच्या निर्यातीसाठी अंतर्गत वाहतूकीवरील खर्चासाठी सन २०११-२०१२ मध्ये १५ कोटी रुपये खर्च केलेले आहेत तर सन २०१२-२०१३ मध्ये यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ५ कोटी रुपये खर्च केले गेले.

भारतीय कापूस महामंडळ पणन किंमतीसाठी साहाय्य म्हणून सन २०११-२०१२ मध्ये सरकारने २२ कोटी रुपये खर्च केले गेले तर सन २०१२-२०१३ मध्ये यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केली. प्रत्यक्षात १२१ कोटी रुपये खर्च केले गेले तर सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकात २०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद सरकारने केली आहे. याशिवाय भारतीय ज्यूट महामंडळाला बाजार व्यवस्थापनासाठी अर्थसाहाय्य, साखरेच्या साठागृहाच्या देखभालीचे अनुदान, साखर कारखान्यांच्या वित्तीय सहाय्यासाठीचे अनुदान, नाफेडला सहाय्य इत्यादीसाठी कमी अधिक प्रमाणात अनुदानापोटी रक्कम खर्च केलेली आहे.

निष्कर्ष:

१)कृषी मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये पीक व्यवसायावर एकूण खर्चाच्या ४९.८१% रक्कम खर्च केली तर सन २०१२-२०१३ मध्ये ५०.५४% रक्कम खर्च केलेली आहे.

२)सन २०१२-२०१३ च्या अंदाज पत्रकानुसार पीक व्यवसायावर एकूण खर्चाच्या ५१.०६% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला तर

२०१३-२०१४ मध्ये तो ५२.६०% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला.

३)सन २०११-२०१२ मध्ये इतर कृषी कार्यक्रमांवर एकूण खर्चाच्या १२.२२% तर सन २०१२-२०१३ मध्ये १२.५०% रक्कम खर्च केलेली आहे.

४)सन २०१२-२०१३ च्या अंदाज पत्रकानुसार इतर कृषी कार्यक्रमांवर एकूण खर्चाच्या ९.९७% तर २०१३-२०१४ मध्ये ८.१८% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

५)कृषी संशोधन आणि शिक्षण यासाठी सन २०११-२०१२ मध्ये एकूण खर्चाच्या १५.८९% तर सन २०१२-२०१३ मध्ये १४.३६% रक्कम खर्च केली आहे.

६)सन २०१२-२०१३ च्या अंदाज पत्रकानुसार कृषी मंत्रालयाने कृषी संशोधन आणि शिक्षण यावर एकूण खर्चाच्या १६.३८% रक्कम खर्च करण्याबाबतचा अंदाज व्यक्त केला तर सन २०१३-२०१४ मध्ये १६.५८% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला होता.

७)सन २०११-२०१२ मध्ये मृदा आणि जलसंवर्धन या कामी एकूण खर्चाच्या ०.०९% रक्कम खर्च केली तर सन २०१२-२०१३ मध्ये हे प्रमाण ०.१०% पर्यंत केले.

८)कृषी मंत्रालयाने सन २०१२-२०१३ मध्ये मृदा आणि जलसंवर्धन यासाठी एकूण खर्चाच्या ०.०९% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला तर सन २०१३-२०१४ मध्ये ०.१०% रक्कम खर्च करण्याचे ठरविले.

९)ग्रामीण विकास मंत्रालयाने सन २०११-२०१२ मध्ये ग्रामीण रोजगारासाठी एकूण खर्चाच्या ७७.७०% रक्कम खर्च केलेली आहे तर सन २०१२-२०१३ मध्ये ८२.५९% रक्कम खर्च केलेली आहे.

१०)सन २०१२-२०१३ च्या अंदाज पत्रकानुसार ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी एकूण खर्चाच्या ८०.९६% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला होता तर सन २०१३-२०१४ मध्ये ७७.१६% रक्कम खर्च करण्याचा अंदाज व्यक्त केला.

११)सन २०११-२०१२ मध्ये ग्रामीण विकासाचे विशेष कार्यक्रम यावर ग्रामीण विकास मंत्रालयाने एकूण खर्चाच्या १२.५१% रक्कम खर्च केली आहे तर सन २०१२-२०१३ मध्ये १४.०१% रक्कम खर्च केली आहे.

१२)जल संसाधन मंत्रालयाने मोठे आणि मध्यम सिंचनासाठी सन २०११-२०१२ मध्ये एकूण खर्चाच्या ३७.५५% रक्कम खर्च केलेली आहे तर सन २०१२-२०१३ मध्ये ४७.६७% रक्कम खर्च केलेली आहे.

१३)भारत सरकारने सन २०११-२०१२ मध्ये खते व अन्न अनुदानापोटी अनुक्रमे ७०,०१३ व ७२,८२२ कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

संदर्भ:


१) भारत सरकारचे सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रक.

२) जागतिक कृषी माहिती विभाग अहवाल, आयएन ३०१८, दिनांक ३-४-२०१३.

३) भारतीय अर्थव्यवस्था, दत्त सुंदरम्.

४) मिनिस्ट्री ऑफ फायनान्स (२०१३), इंडिया बजेट २०१३-२०१४, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, न्यू दिल्ली.

५) अर्थसंवाद, एप्रिल-जून २०१३, खंड-३७, अंक-१.

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद ×


डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष
सार्थक, प्लॉट नं.२०, विवेकानंदनगर,
रामानंदनगर जवळ,
जळगाव-४२५ ००१,
भ्रमणध्वनी:९४२१००८७७६

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

# 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## ३८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, अकोला

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अडतिसावे वार्षिक अधिवेशन श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे दि. ७, ८ व ९ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. जळगाव येथील डॉ. श्रीराम जोशी हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.११००/- आहे. जे परिषदेचे सदस्य नाहीत त्यांना साधारण शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. विद्यार्थ्यांना रु.५००/- शुल्क आकारण्यात येईल. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैध्दांतिक विवेचन.

२) जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल.

३) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल सद्यस्थिती व आव्हाने.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेच्या मा. अध्यक्षांनी अधिवेशनापूर्वीच जाहीर केला आहे. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत.

आयत्या वेळेचा विषय: दुष्काळ-कारणे व उपाय.

परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

◆

डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष

प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे,
स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार

डॉ. रामेश्वर भिसे,
स्थानिक कार्यवाह
भ्रमणध्वनी:९९७०१५१३४८

डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक
अर्थसंवाद




(जाहिरात सहकार्य: प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष, म.अ.प.)